(NAVGAN SHIKSHAN SANSTHA RAJURI'S)

PADMABHUSHAN VASANTDADA PATIL

ART'S,COMMERCE& SCIENCE COLLEGE ,PATODA,DIST. BEED (M.S)

NAAC Accradited **B** Grade

PRICIPLE
DR.D.B.AGHAV

Tel : (02444)242067,242667
Fax: 243051
Rest- (02444)242455
E-Mail- pvp_patoda@rediffimaill.com

Ref, No/ PVPCP **Date: -**

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की ,प्रा.डॉ. वाढे रामनाथ गंगाधर मराठी विभाग पद्मभूषण वसंतराव पाटील महाविद्यालय पाटोदा यांनी **मराठी साहित्यातील ऊसतोड कामगारांचे चित्रण : एक अभ्यास** हा लघुशोध प्रबंध यु.जी.सी.च्या अर्थसाहाय्यातुन **मायनर रिसर्च प्रोजेक्ट** च्या साठी लिहिलेला आहे. हा संशोधन प्रकल्प त्यांनी स्वतंत्रपणे लिहिला आहे. करिता हे प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

पाटोदा प्राचार्य

दिनांक

प्रतिज्ञापत्र

मी असे प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो की, **मराठी साहित्यातील ऊसतोड कामगारांचे चित्रण : एक अभ्यास** हा **मायनर रिसर्च प्रोजेक्ट** साठी लघुशोध प्रबंध स्वत: लिहिला असून पूर्णपणे स्वतंत्र आहे. या प्रबंधात आवश्यक तेथे पूर्वसुरीच्या मतांची ऋणनिर्देश पूर्वक नोंद केलेली आहे.

हा लघु शोध प्रबंध मी इतर कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही स्वरूपात पदवी इत्यादी कारणास्तव सादर केलेला नाही.

पाटोदा

दिनांक

प्रा.डॉ.वाढे रामनाथ गंगाधर

संशोधक

ऋणनिर्देश

मराठी भाषेतील पहिला ग्रंथ बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई,येथे लिहिला गेला आहे.परळीचे वैद्यनाथ,अंबाजोगाईची, जोगाई, कपिलधारचे मन्मथ स्वामी, नेकनूरचे श्री.बकंट स्वामी, संत वामनभाऊ , संत भगवान बाबा विठ्ठल कवी बीडकर तसेच शनिचे राक्षस भूवन, पिंपळवंडीचे कार्तीकेश्वर, पुरूषोत्तमपुरी, राक्षस भूवन, या सारख्या सांस्कृतिक स्थळांची परंपरा असणारा बीडचा परिसर, विविध अंगाने नटलेला आहे. ऊसतोडणीच्या 'कोयत्या' च्या बळावर स्वतःचे कुटुंब मुले, व समाजातील सर्वांना सर्वांगिण उन्नतीत सहकार्य करणारे ऊसतोडणी कामगार , भारतातील साखर कारखाना परिसरात हंगामी ऊसतोड कामगार हे बीडच्या भागातील आहेत. हे सर्व गेल्या बावीस वर्षापासून पाहतांना या विषयावर वाङमयीन दृष्टीने लेखन करावे असे मनात आलेला विचार प्राचार्य डॉ. दत्तात्रय आघाव सर यांच्या कडे मांडला तो मूर्तस्वरूपात येत आहे.

लोकनेत्या मा.खा.स्वर्गीय सौ.केशरबाई क्षीरसागर उर्फ सर्वांच्या काकू यांनी संशोधन कार्यात व्यग्र असावे असे त्या सतत मतव्यक्त करत असत. त्यांची संशोधन तळमळ अत्यंत महत्वाची व आठवण ठेवणारी,संशोधन प्रेरणा देणारी आहे.

संस्थेचे मार्गदर्शक व राज्याचे सार्वजनिक बांधकाम उपक्रममंत्री तथा पालकमंत्री बीड मा. ना. जयदत्त अण्णा क्षीरसागर , यांचे संशोधन कार्यात सातत्याने मार्गदर्शन लाभले. त्यांच्या ऋणात राहण्यात धन्यता वाटते.

नवगण शिक्षण संस्थेचे सचिव मा.डॉ.भारतभूषणजी क्षीरसागर व नगराध्यक्ष प्राचार्य डॉ. दीपाताई क्षीरसागर यांच्या प्रेरणा सतत पाठीशी आहेत. संस्थेचे प्रशासक मा.श्री. गोविंदराव मचाले मामा प्रशासकीय अधिकारी डॉ. राजूजी मचाले यांचे ऋण व्यक्त करतो.

आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय आघाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य यांनी संशोधन कार्यत सतत मार्गदर्शन केले. असे नव्हे तर प्रकल्पपूर्ण करतांना मनापासून मार्गदर्शन केले त्यांच्या मुळेच हे प्रकल्प पूर्णत्वास जात आहे. त्यांच्या ऋणात राहणे

सदैव मला आवडते.

माझे गुरूवर्य डॉ. प्रल्हाद जी लुलेकर यांचे ऋण व्यक्त करणे महत्वाचे आहे.

महाविद्यालयातील माझे सहकारी, प्रा.डॉ. मधुकर क्षीरसागर, ग्रंथपाल, प्रा.जगन्नाथ पटाईत, प्रा.डॉ. किशोर मचाले, प्रा.महादेव मुंढे, प्रा.भीमराव राठोड, प्रा.यादव घोडके, कार्यालयीन अधिक्षक श्री विलास कोल्हे, अनिल क्षीरसागर चंद्रकांत पवार, ग्रंथालयातील कर्मचारी, बाबासाहेब नाईकनवरे, बाळकृष्ण गवळी यांच्या सहकारी बद्दल सर्वांचे ऋण व्यक्त करतो.

आधार ग्रंथ संदर्भ ग्रंथ उपलब्ध करण्यासाठी मदत करणारे, साहित्यिक, भास्कर बडे, कैलास दौंड, प्रा.हरिभाऊ बोरूडे, डॉ.आबासाहेब हांगे डॉ.सोपना सुरवसे, या सर्वांचे आभार व ऋण व्यक्त करतो.

माझा यशाचे शिल्पकार आई सौ. रूक्मिणीबाई –वडील गंगाधर वाढे यांच्या आशीर्वाद त्यांच्या कायम ऋणात राहणे मला आवडेल.

माझी पत्नी सौ.रेणूका, मुलगी, कु.प्रेरणा मुलगा प्रणव, यांच्या प्रत्यक्ष अप्रत्यक्ष, सहकार्याबद्दल त्यांचे अभार मानतो.

या शोध प्रकल्पाची अक्षर जुळवणी करणारे नंदा कॉम्प्युटर्सचे प्रा.राहूल पांडव ,लघु शोध प्रकल्पासाठी छायाचित्रकार वर्षा फोटो स्टुडीओचे बिरूटे कायगांव संतोष महाजन पाटोदा यांचे आभार व्यक्त करून सर्वांना धन्यवाद देतो.

विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

पश्चिम विभागीय केंद्र, गणेशाखिंड,पुणे.

११ व्या वित्त योजनेअंतर्गत

लघुशोध प्रकल्प (मायनर रिसर्च प्रोजेक्ट)

मराठी साहित्यातील ऊसतोड कामगारांचे चित्रण : एक अभ्यास

संशोधक

डॉ.रामनाथ गंगाधर वाढे

मराठी विभाग,

पद्मभूषण वसंतदादा पाटील महाविद्यालय,पाटोदा

संलग्नित

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

महाराष्ट्र राज्य

३१ मे २०१४

संशोधक

डॉ.रामनाथ गंगाधर वाढे

मराठी विभाग,

पद्मभूषण वसंतदादा पाटील महाविद्यालय,पाटोदा

संलग्नित

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

महाराष्ट्र राज्य

३१ मे २०१४

प्रकरण – १ प्रस्तावना

१) मराठी साहित्य संकल्पना व साहित्य चळवळीचे स्वरूप

२) समकालीन साहित्याची भूमिका

३)आधुनिक वाङमयातील नवे प्रवाह

४) ऊसतोड कामगार अर्थ– संकल्पना

५)मराठी साहित्यातील ऊसतोड कामगारांचे विविध वाङमयप्रकार

६)ऊसतोड कामगारांच्या साहित्य स्वरूप समस्या चे चित्रण

७) साहित्यातील ऊसतोड कामगार संघटनेचे स्वरूप

८)अभ्यास विषयाची आवश्यकता

९)संशोधन विषयाची आवश्यकता

१०) लघुशोध प्रकल्प विषयाचे महत्व

११) अभ्यासाची उद्दिष्टे

प्रस्तावना :

समकालीन मराठी साहित्य हे समाजातील सर्व घटकांचा साहित्य विषय झाले आहे. समाजातील सर्व सामान्य शेतकरी शेतीसंबंधीत विविध क्षेत्रावर अवलंबून असणारा समाज साहित्याचा विषय झाला आहे.भारत शेतीप्रधान देश आहे.स्वातंत्र्यानंतर शेती व्यवसायावर विविध उद्योग अवलंबून आहेत.शेतीतील यांत्रिकीकरणामुळे शेतीत विविध पिकांचे उत्पादन वाढले आहे. ऊस उत्पादक शेतकरी प्रमुख पीक म्हणून ऊस उत्पादन मोठ्या प्रमाणात करीत आहे. स्वातंत्र्यानंतर मोठ्या प्रमाणात साखर कारखाने निर्माण झाले आहेत. ऊस उत्पादक शेतकरी नगदी पीक म्हणून ऊस उत्पादन करीत आहे.ऊस तोडणीसाठी कामगार वर्ग निर्माण झाला आहे. ऊस उत्पादक शेतकरी साखर कारखाने ऊस तोडणी कामगार यांचे परस्पर संबंध आहेत. ऊस तोड कामगार अल्पभूधारक भूमीहिन शेतकरी आहे. स्वत:ची शेतीतील कामे संपल्या नंतर विविध साखर कारखान्यांच्या परिसरात मुकादमाच्या वतीने ऊसतोड कामगार म्हणून ऊसतोडणीसाठी जातो. या ऊसतोड कामगारांच्या अनेक समस्या असून त्यांची असंघटीत चळवळ आहे.या ऊसतोड कामगारांची मराठी साहित्यात काही प्रमाणात चित्रण आलेले आहे. त्याचा अभ्यास या प्रकल्पात करण्यात येणार आहे.

ऊसतोड कामगारांना साखर कारखाना, परिसर व ऊस उत्पादन परिसर ६ ते ८ महिने स्वत:चे गाव घरदार, मुले–मुली, वृद्ध आई वडील यांना सोडून रहावे लागते. ऊसतोड कामगारांवर अवलंबून असणाऱ्या सर्वांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. ऊसतोड कामगारांना आर्थिक सामाजिक, कौटुंबिक समस्या आहेत. ऊसतोड कामगारांच्या कामगार जोडपे म्हणजे एक कोयता या प्रमाणे मुकादम ऊसतोकड कामगारांना 'उचल' म्हणजे आगाऊ पैसे देतात त्यातून ऊसतोड कामगार व मुकादम एकमेकांची आर्थिक फसवणूक करतात. मुकादम हा साखार कारखाना व ऊसतोड कामगारांना जोडणारा दुवा आहे. साखर कारखाना मुकादमास व मुकादम कामगारांना पैसे देतो.अशा पद्धतीने आर्थिक व्यवहार चलतो. ऊसतोड कामगार मुकादम हे यांचे परस्पर संबंध आहेत. प्रसंगी यांच्यात संबंध दुरावले जातात. त्याच प्रमाणे ऊसतोड कामगार स्त्री,तरूण मुले, वृद्ध यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षण, वृद्धांचे आरोग्य स्त्रियांचे सौरंक्षण असे विविध प्रश्न ऊसतोड कामगारांचे गंभीर स्वरूपाचे असल्यामुळे त्यांच्या या व्यथा–वेदना मराठी साहित्यात काही प्रमाणात आलेल्या आहेत. त्याचा विचार या प्रकल्पात केला जाणार आहे.

मराठी साहित्यातून ललित लेखन, कथा,कविता,कादंबरी, दिवाळी अंक, नियतकालिके विविध दैनिके, रविवारच्या पुरवण्यामधून ऊसतोड कामगारंच्या भाव–भावना व्यक्त झालेल्या आहेत. या साधन ग्रंथाच्या आधारे ऊसतोड कामगारांचे मराठी साहित्यातील चित्रण पाहिले जाणार आहे.

१) मराठी साहित्याची (संकल्पना) चळवळीचे स्वरूप

मराठी वाङमयाच्या जडण घडणीचा काळ म्हणजे १२ व्या शतकापासून प्रारंभ झालेला आहे. मराठी वाङम व संस्कृतीत महानुभाव वारकरी संप्रदायाच्या चळवळीनी मराठी भाषा, साहित्य, संस्कृती, यांची जडण घडण केलेली आहे. १२ व्या शतकात मुस्लीम आक्रमणांचा व जातीभेद तीव्र होण्याचा कालखंड असून याच काळात उदारमतवादी धर्म मांडणारे चक्रधर व ज्ञानेश्वराचा छळ झालेला आहे. जीवनाची नव्याने मांडणी या दोन संप्रदायातून झालेली आहे. त्यांचा हेतू म्हणजे समाजाच्या सर्वस्तराची उन्नती घडली पाहिजे व बहुजन समाजाला आध्यात्मिक उन्नतीसाठी जीवनाची नव्याने मांडणी केली आहे. या मधूनच वाङमयात नवचैतन्य सळसळू लागले. त्यानंतर संत वाङमय पंडितांचे पंडिती वाङमय त्यानंतर शाहिरांचे शाहीरी साहित्य निर्माण झाले.

१८१८ ला इंग्रजी सत्येचा उदय झाला विविध प्रकारांचा उदय विकास होऊन समाज प्रबोधन करणारे लोकहितवादी म.फुले, चिपळूणकर यांनी वैचारिक निबंध लेखन निर्माण केले. परिणामी मराठी साहित्यात निबंध, कादंबरी, नाटक, कविता ,कथा या वाङमय प्रकाराचा उदय ,विकास होऊ लागला. विविध समाजातील व्यक्ति शिक्षण घेऊ लागले व तत्कालीन सामाजिक समस्या, साहित्याच्या माध्यमातून मांडू लागले मराठी साहित्यातील कथा, कादंबरी, निबंध कविता,नाटक, वाङमयप्रकार या संकल्पना आकार घेऊ लागल्या असे दिसते तत्कालीन सामाजिक समस्यांची मांडणी साहित्याच्या माध्यमातून झालेली आहे. माणसाच्या जीवनाचे प्रश्न, गंभीरपणाने मांडले जावू लागले. विविध वर्गातील लेखक त्यांच्या समस्या साहित्याच्या माध्यमातून नंतरच्या कालखंडात मांडू लागला होता.

साहित्य या संकल्पने कडे शास्त्रीय दृष्टीने पाहू लागल्यामुळे साहित्यामध्ये समाजीवनाचे प्रतिबिंब उमठू लागले हाते. त्यातून विविध वाङमयप्रकारांचा उदय होऊन . वाङमयप्रकारांना त्यात कथा,कादंबरी, नाटके, कवितांचे प्रकार तथा वाङमय प्रकारांचे विविध प्रकारे , उदा: कविता, मध्ये, प्रेकमकविता, भावकविता, निसर्ग कविता, प्रवाहानुसार असे बहुविध वाङमय प्रकारांचा उदय होऊन समाजातील सर्वच घटक स्वअनुभव

,समस्या , साहित्याच्या माध्यमातून व्यक्त करू लागले आहे. १९२० च्या नंतर मं गांधी ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रभावातून साहित्य निर्माण होऊ लागले. तत्पूर्वी १९४८ साली अस्पृश्य मुलांची शाळा १८५१ मुलींची शाळा काढून म.फुलेनी स्त्री प्रश्नाकडे लक्ष वेधले. १८६० ते १९६० या काळात महाराष्ट्रात विविध गोष्टी घडल्या चळवळीचा उदय झाला त्याहून साहित्य चळवळीना आकार प्राप्त झाला आहे.शोषितांच्या बाजूचा पहिला लिखित हुंकार आधुनिक काळात म.फुले यांच्या वाङमयात येतो. दलित, ग्रामीण, स्त्री, शोषितांचे जीवन येते याचा अर्थ महाराष्ट्रआच्या मागील शंभर दिडशे वर्षात सामाजिक वाङमयीन पर्यावरणामध्ये असंख्य चळवळीनी आकार घेतला आहे ज्यातून सामन्य माणसाच्या शोषणा विरूद्ध हुंकार प्रकट झाले . नागनाथ कोत्तापल्ले यांच्या 'साहित्याच्या अन्वयार्थ ' ग्रंथात ते लिहितात ''वाङमयाची किवा कुठल्याही कलेची निर्मिती होताना काही एक काळ जाणे आवश्यक असते. ज्या काळात प्रश्न निर्माण होतात त्याच काळात ललित लेखन होते. असे पुष्कळदा दिसत नाही त्याचे कारण म्हणजे ललित निर्मिती मध्ये कलावंताचे व्यक्तिमत्व प्रधान असते. हे खरे असले तरी इतर असंख्य गोष्टी कारण असतात. या असंख्य गोष्टी कलावंताच्या निर्मितीत पूष्कळदा निमंत्रित करीत असतात, उदा. भोवतीचय समाची अभिरूची पुष्कळदा लेखन क्षेत्रावर नियंत्रण ठेवत असते.अभिरूची जशी जशी बदलत जाईल तस तसे लेखनाचे –निर्मितीचे स्वरूपही बदलू शकते. आणि अभिरूचीच्या बदलामध्ये समाजातील असंख्य चळवळी सहभागी होत असतात. अशा प्रकारे अभिरूची बदलत गेली किंवा बदलण्याची शक्यता असली की हळुहळु चलवळींचा उदय होण्याची शक्यता असते'' [१] वाङमयीन चळवळीचा उदय आणि विकास अशा पद्धतीने होतो.

१९४५ च्या सुमारास साहित्यावर त्याचा परिणाम होऊन वाङमयीन चळवळीत 'नव' असे लागून नव्या वाङमयीन चळवळीहून माणसाच्या मनाचा वेध वाङमयातून घेतला जावू लागला त्याहून मनोविश्लेषण साहित्याहून येतू लागले. स्वतंत्र्य चळवळ व दुसऱ्या महायुद्धाचा परिणाम जगातील समाज मनावर झालेला होता. १९४७ ते १९६० याकाळात समाजातील वंचित घटक, शिक्षण घेऊन स्वत:चे अनुभव, समाजजीवन विविध वाङमय प्रकारांच्या आधारे अभिव्यक्त करू लागे. शिक्षण आधुनिकीकरण उद्योगीकरणातून शेती व समाजावर यांत्रीकी–करणाचा परिणाम झाला. समाज घटकातून शेती, उद्योग, शिक्षण, व्यवसायानुरूप समाज निर्माण झाला दलित शहारकडे वळला शेतीच्या विविध व्यासायानुरूप कामगारांची गरज निर्माण झाली शेती बरोबर पूरक व्यवसाय साठी कामगार वर्गाची निर्मिती झालेली आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर जलसिंचन वाढले ऊस उत्पादन

होऊ लागले त्यासाठी साखर कारखाने वाढीस लागले ऊसतोडणी करणारा एक कामगारवर्ग शेतकरी वर्ग उदयास आला. ग्रामीण भागातील अल्पभूधारक ,शेतकरी भूमिहिन शेतकरी, ऊसतोड कामगार म्हणून उदयास आलेले आहे. त्याचप्रमाणे शेतकरी शेती पूरक व्यवसाय करू लागले. ग्राम व्यवस्थेवर याचा परिणाम झाला. त्यातून वाङमयीन चळवळीचा उदय आणि विकास झाला. 'मराठी साहित्य चळवळीचे स्वरूप' या लेखात डॉ. वैशाली भालसिंग यांनी चळवळीच्या स्वरूपा संबंधी म्हणतात लेखात '' प्रस्थापित व्यवस्था आणि नव्या गरजा यांच्या मध्ये जेव्हा विसंवाद निर्माण होतो तेव्हा चळवळीचा जन्म होतो. प्रचलित किंवा प्रस्थापित व्यवस्थेमध्ये जेंव्हा नव्या वृत्ती–प्रवृत्तींचा कोंडमारा होऊ लागतो. तेंव्हा जीवनाच्या गतीला अवरोध होऊ लागतो. तो दूर करून पून्हा एकदा जीवनाचा प्रवाह खळखळून वाहावा म्हणून उठाव करावा लागतो. चळवळीचा जन्म अशा व्यवस्थेतून होत असतो तिच्यामागे विद्रोहाची धुरा असते बंडखोरीची भावना असते.''[२]

याच ग्रंथात त्यांनी आनंद यादवांचे चळवळीच्या सबंधी विचार मांडले आहेत आनंद यादव चळवळी संबंधाने म्हणतात ''एखाद्या ध्येय विचाराचाचा प्रसार करणे त्यासाठी प्रचार साधने निर्माण करणे किंवा मिळविणे समाजात तो खोलवर रूजविण्यासाठी स्थिर होण्यासंठी आणि विकसत होण्यासाठी संस्था रूपाने तिच्या शाखाउपशाखा काढणे त्यांच्या द्वारे संघटन निर्माण करून तो विचार प्रत्यक्षात आणणे किंवा आणण्यासाठी उपाय उपक्रम योजने असे कोणत्याही चळवळीचे स्वरूप असते.''[३] जीवनाच्या संदर्भातील या चळवळीचे स्वरूप समाजातून घेण्यास उपयुक्त असते .

साहित्याचे क्षेत्र पविर्तनाचे क्षेत्र असून लेखकाचा त्याच्याशी घनिष्ट संबंध असतो त्यामुळे बदलत्या समाज जीवनाचा ठसा साहित्यात असतो.नव्या साहित्य चळवळी बंडाच्या निशाणी घेऊन परिवतनासाठी उभ्या असतात. साहित्य चळवळी एकेमेकींना सहकार्य करतात. साहित्य व समाज साहित्य व संस्कृती साहित्य व जीवन वास्तव यामध्ये अंतर पडून ते वाढत जाते. अशा वेळी त्यांच्यात परस्पर सुसंवाद निर्माण करण्यासाठी संघटित व सामूहिक प्रयत्न केले जातात. त्यातूनच साहित्यिक चळवळी निर्माण होतात. कोणतीही वाङमयीन चळवळ ही केवळ वाङमयीन नसते. तिच्या पाठीमागे जीवन शोधाच्या प्रेरणा असतात.

साहित्य चळवळी सबंधी डॉ. सुधीर रसाळ म्हणतात '' कुठलीही नवी वाङमयीन चळवळ दोन गोष्टीवर उभी राहत असते एक म्हणजे वास्तवाबद्दलच्या तिच्या स्वत:च्या वेगळ्या जाणीवा असल्या पाहिजे आणि दूसरे म्हणजे त्या वेगळ्या जाणीवांच्या अभिव्यक्ती गरजा मधून नवे रूप घटक नवी तांत्रिक अंगे घडविणे

आणि प्रस्थापित रूप घटकांन ा नवी परिणाम देणे ही प्रक्रीया जन्माला आली पाहिजे '' [४] जीवनात योग्य वातावरण मिळाल्यास साहित्य चळवळीचा जन्म होतो. विशिष्ट तात्विक अधिष्टान स्विकारले जाते. बदलते जीवन वास्तव साहित्यातील रूप घटकांना साहित्यिक चळवळी परिवर्तन घडवून आणतात.

२. समकालीन साहित्याची भूमिका :–

समकालीनतेच्या सबंधाने मराठी मध्ये मागील काही वर्षापासून चर्चा होऊ लाली आहे. समकालीन साहित्य म्हणजे लेखकाच्या जन्मापासून त्याच्या शेवटपर्यंतच्या कालखंड त्याकाळातील साहित्य अशा सबंधाने समकालीनता कडे पाहिले जाते. मराठी मध्ये समकालीनते संबंधी गंभिरतेने चर्चा झालेली नाही. डॉ. यशवंत मनोहर यांनी 'समाज आणि साहित्य समीक्षा ' ग्रंथात समकालीनता आणि मराठी साहित्य व समकालीन ही संकल्पना स्पष्ट करतांना '' भोवतीच्या समस्याच्या धुभचक्रीमधून मराठी साहित्य विश्वात जन्माला आलेल्या आणि प्रभावी ठरलेल्या नव्या वाङमयीन चळवळी या नव्या वाङमयीन आंदोलना मधून मुख्यत्वे समाकालीनता हा स्वभाव जन्माला आला आणि या आंदोलनामुळे अत्यंत तीव्र स्वरूपात तो अविष्कृत झाला समकालीनता हा स्वभाव आधुनिक महाराष्ट्रात प्रथम लोकहितवादी, फुले आणि आगरकर यांच्या वैचारिक लेखनातून अत्यंत ज्वलंत पद्धतीने व्यक्त झाला.'' [५] असे विवेचन केलेले आहे परंतु मराठी साहित्यातून सर्वच समाजाचे चित्रण होणे गरजेचे होते पण तसे झालेले नाही असे वाटते.

यशवंत मनोहर यांची समकालीन साहित्याकाच्या सबंधाने पुढे असा विचार मांडला आहे तो असा ''समकालीन हा स्वभाव जीवनातील मध्यवर्ती वाद–संवादात त्यांच्या सूक्ष्मतिसूक्ष्म गहनात उतरतो. जीवनात मुक्त करू पाहणाऱ्या जीवनाच्या उर्जेला सर्व वाटा मोकळ्या करून देणाऱ्या शक्तीच्या बाजूने साहित्यिक उभा राहतो जीवन थांबवून पाहणे म्हणजे विकृती ते पाहते करू धजणे म्हणजे प्रकृती त्याला अधिक सौदंर्यपूर्ण आणि अर्थपूर्ण करण्यासाठी धडपणे म्हणजे संस्कृती तो साहित्यिक विकृतीचा बळी ठरत नाही आणि प्रकृती व संस्कृती यांच्या प्रकाश मार्गावरून स्वत:ला चाळवित नेतो तो साहित्यिक समकालीन साहित्यक असतो.'' [६] समकालीन साहित्य व साहित्यकासंबंधी विचार या सबंधात येतो

समकालीन साहित्याच्या स्वरूपा संबंधी विचार करतांना डॉ. राजन खान यांनी 'समाकलीन साहित्य स्वरूप या लेखात समकाललीन साहित्यातून मराठी साहित्याच्या निर्मिती विषयी ते लिहितात ''पून्हा एका लेखकाच्या समकालीन साहित्यात काय काय येऊ शकते ? तर त्याला ज्ञात असलेल्या मानवी सामाजाचा

भूतकाल लेखक स्वत: जगत असलेला वर्तमान काळ आणि मानवी समाजा बद्दलची लेखकाच्या डोक्यातील भविष्याची स्वप्न एवढ सगळ समकालीन साहित्यात येऊ शकते.''[७] लेखक जे त्याच्या हयातीत जगतो हेच मांडतो व्यापक जीवनाकडे तो जात नसतो वैयक्तिक जीवना पलीकडे जगणे म्हणजे खऱ्या अर्थाने जीवन चित्रित करणे होय.

डॉ.गोविंद काजरेकर यांनी समकालीन मराठी कविता या लेखात, समकालीन समाज वास्तवाच्या विषयी पुढील विचार मंडले आहेत. '' आजचा काळस्वर अनेक घटितांना कवेत घेणारा अहे. आज साठ, सत्तर च्या दशकात सुरू झालेल्या सामाजिक चळवळीचे पीळ विसविशीत झाले अहेत. चळवळ चालविणाऱ्या म्होरक्याची नैतिकता बदलली .चळवळी आर्थिक राजकीय तसेच भावनिक हितसबंधाचे राजकारण सुरू झाले. जागतिकी –करणाच्या रेट्यामुळे व्यक्ती–व्यक्ती आणि व्यक्ती समाज यातील अंतर संबंध विस्कळीत होऊ लागले. त्यामुळे चळवळीच्या भितींची मोठी पडझड झाली.''[८] समकालीन साहित्यामधून समाज वास्तवाचे भान कमी प्रमाणात झालेले आहे अशी भावना त्यांनी व्यक्त केलेली आहे.

समकालीन समाज वास्तवाचे भान विविध पक्ष संघटना चळवळ चालवणाऱ्याची नैतिकता बदललेली आहे. समाजव्यवस्था ही निकोप मानवी सबंधाना पोखरू लागली आहे. व्यक्तीचे सर्वांगिण शोषण करणे बेकारी नैसर्गिक आपत्ती भ्रष्ट आचारणातून सृजनाची मानसिकता सर्वसामान्य माणूस जगण्यासाठी भय बाळगू लागला आहे. धर्म जात राजकारणाचे विषय झालेले असून विविध समस्यानी प्रत्येक घटक छळला गेला आहे त्यामुळे समाजातील सर्व घटक भाव–भावना व्यक्त करू लागले आहेत.

१९९० नंतर जागतिकीकरणाची प्रक्रीया गतीमान झालेली असून प्रसार माध्यमे. संपर्क साधनाची विपूल प्रमाणात उपलब्धता वाढली आहे.ग्रामीण भागातील सर्वांवर त्याचा प्रभाव पडला आहे. समकालीन साहित्यातून शेतकरी, बेकारी,भूक फसवणूक,उपासमार,शेतकरी आत्महत्या धरणग्रस्थाचे विविध प्रश्न ग्रामीण शहरी राजकारण प्रसिद्धी लोलूप्ता दहशतवाद, आधुनिकीकरणाचा परिणाम झालेला असला तरी स्त्री शोषण वाढू लागले आहे. समकालीन मराठी साहित्यामधून आजपर्यंत वचिंत असणारा समाज घटक स्वत: च्या 'व्यथा, वेदना, दु:ख, अनुभवाच्या माध्यमातून व्यक्त करू लागला आहे. माणसाला स्वत:च्या आस्तित्वाची जाणीव झालेली आहे. ती जाणिव समकालीन साहित्याच्या माध्यमातून कथा कादंबरी कविता ललित लेखन आत्मकथनाच्या माध्यमातून व्यक्त होऊ लागली आहे.

३.आधुनिक वाङमयातील नवे प्रवाह : –

१९४५ नंतर नवा सौंदर्यशास्त्रीय नवसाहित्याच्या समार्थ्यनार्थ नव समीक्षा विचारा बरोबर बहुजन समाजातील तरूण पिढी शिक्षण घेऊन लेखन करू लागली. समाजाच्या सर्वच स्तरावरचे लेखन होऊ लागले. लोकशाहीने प्रत्येकास अभिव्यक्ती स्वातंत्र्यदिले सर्वांचा समान दर्जा, समान संधी त्याचे प्रतिबिंब सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रात दिसणे गरजेचे होते. तत्पुर्वी मराठी साहित्य लेखन व वाचन करणारे वर्गाच्या त्यांच्याच समस्या,दुसऱ्याच्या समस्या केवळ रूची पालट म्हणून येत असत. आधुनिक काळात धर्मभेद जातीभेद वाढले औद्योगीकरणामुळे शहरे वाढली त्यातून शहरी, ग्रामीण भेद अस्तित्वात आले. स्त्री–शिक्षणामुळे स्त्री–पुरूष भेदवाढू लागले. दलित सवर्ण भेद विकोपाला जावू लागले. दलित शिवाय त्याच्या पलीकडे असणारा भटका, आदिवाशी जागृत होऊ लागला.

लोकशाही मुळे स्वातंत्र्य समता बंधुत्व सर्वधर्म समभाव, धर्म निरपेक्षता,समान संधी तसेच शिक्षणामुळे बहुजन समाजात नवा अशावाद जागृत होऊ लागला. अभिव्यक्त होण्यासाठी साहित्य क्षेत्राच्या आधाराने विविध साहित्य प्रवाहाचा उदय आणि विकास होऊ लागला. १९६० जे काही प्रवाहाचा उदय झाला त्या दलित, ग्रामीण, स्त्रीवादी ,आदिवासी प्रवाह ही प्रमुख होय. याच काळात लघु अनियतकालीकांची चळवळ ,कामगार साहित्य चळवळ विज्ञान साहित्याप्रवाह अशा प्रवाहानी मराठी साहित्य विकसित केले. धर्म घटक मानून मुस्लिम ,ख्रिस्ती, मराठी साहित्य प्रवाह विकसित झालेले आहेत. या प्रत्येक प्रवाहानी स्वतंत्र स्वत:ची संमेलने भरवली.

या परिवर्तनवारी साहित्य चळवळीचे संदर्भ १९२० पासून महाराष्ट्रात मध्यम वर्गीयाचे नेतृत्व व्यापक सामाजिक धारेपासून आलिप्त राहिलेले आहे. या सांस्कृतीक परिणामाच्या आधारे सांस्कृतीक राजकीय परिणाम विषयी 'मराठी साहित्य चळवळीचे स्वरूप' या लेखात डॉ. वैशाली भालसिंग यांनी गं.बा.सरदार यांचा विचार पुढील प्रमाणे मांडला आहे. '' महाराष्ट्रातील उच्चवर्गीय मध्यमवर्ग जेव्हा जनआंदोलनापासून दूर गेला तेव्हा पासून आपल्या साहित्य विचारात तंत्रवादाचे तुणतुने सुरू झाले. पुढे १९५२ पासून येथील राजकीय नेत्रत्वात बदल घडून येण्याच्या प्रक्रियेला प्रारंभ झाला आणि याच वेळी आत्यंतिक व्यक्तीवाद आणि निखल कलवाद यांचा पक्ष हिरीरीने पुढे आला.'' [९] यामुळे मध्यमवर्गीय व नागरी मराठी साहित्य हे एकांगी बनले त्याहून एकाकी पणाची भावना निर्माण झाली या साहित्यामुळे मराठी साहित्यातून बहुजन समाजाला सामावून घेतले नाही मराठी वाङमयाची निर्मिती थांबली असे वाटते. या संबंधाने डॉ.वैशाली भालसिंग यांची पुढे वरील लेखात डॉ.र.बा.मंचरकर

यांचे विधान दिले आहे. '' मौखिक युगातून मुद्रित युगात येतांना मराठी साहित्याने सर्व स्पर्शीत समावेशकता आणि देशी संवेदनाचे बनले होते. परवा परवा पर्यंत आपल्या आधुनिक साहित्याचे लेखक व वाचक बुहुतांशी उच्चवर्णियच होते. त्यांच्या वर्गाच्या व जातीच्या मर्यादा त्यांना क्वचितच ओलांडता आल्या त्याच त्यांच्या साहित्यतील जीवन चित्रणाच्याही मर्यादा ठरल्या ह्या साहित्याचे आस्था विषय प्रश्न मुल्ये जीवनदर्शन भाषा ही तेवढ्यापुरती सीमित राहिली. मध्यमवर्गीय पांढरपेशा नागरी मनोवृत्तीचे रिंगण हीच स्थूलता त्यांची भ्रमणकक्षा रहिली. त्याचे आधुनिकतेशी नाते होते पण भारतीयतेशी, ग्रामीणतेशी नाते नव्हते. आपल्याच समाजातील उपेक्षताशी नाते नव्हते त्यामुळे मराठी समाजाची मानसिकता त्यात प्रतिबिबिंत होऊ शकत नव्हती.''[१०]

मध्यवर्ती मराठी साहित्याची अशी संवेदना ऐकेरी होती त्याची जाणिव होत नव्हती कारण ते दोन्ही घटक एकच होते. या वाङमयीन प्रवाहाच्या उदया संबंधी याच लेखात डॉ. वैशाली भालसिंग यांनी १९६० नंतर उदय व विकसित प्रवाहांच्या संबंधाने मत व्यक्त केले ते पुढील प्रमाणे'' १९६० नंतर वाचक वर्गाचे हे एकजिनसी स्वरूप बदलत गेले. मध्ययुगातून आधुनिक युगात आपण जो प्रवेश केला तो स्वाभाविक क्रमाने केलेला नाही. येथल्या जड, स्थितिशील, धर्मनिष्ठा, कृषिप्रधान ग्रामकेंद्रीत संस्कृतीवर गतीमान विज्ञानोन्मुख उद्योगप्रधान व व्यक्तीप्रधान अशा पाशात्य संस्कृती चा आघात झाला. या दोन संस्कृतीचा संघर्ष व समन्वय होताना जो ताण आपण अनुभविले त्यातून आपल्या जीवनाची जडण घडन झाली स्वातंत्र्य पूर्व अर्वाचीन कालखंडाचे प्राणतत्व मुक्तीची प्रबळ प्रेरणा हेच होते त्यामुळे राजकीय पारतंत्र्य धार्मिक अंधश्रद्धा,आर्थिक शोषण, सामाजिक विषयता या सगळ्यातून भक्तीची मुक्तता व्हावी हाच या कालखंडाचा ध्यास होता. ब्रिटीश राजसत्तेने दिलेले राजकीय स्वातंत्र्याचे आव्हान आणि महात्मा फुले यांनी केलेले व्यापक समाज परिवर्तनाचे आवाहन यांना सात–प्रतिसाद देत आपले जीवन आणि साहित्य वाढत घडत गेले. स्वातंत्र्य चळवळीने दिलेले स्वातंत्र्याचे भान सामाजिक प्रबोधनातून लाभलेले आत्मभान याहून सुधरकांची अस्मिता जागृत झाली लोकशाहीवादी जीवनप्रणाली आणि वाढता शिक्षण प्रसार यांनी तिचे पोषण केले वैज्ञानिक प्रगती यांत्रिकीकरण शहरीकरण आर्थिक विकास यामुळेही तिचे पोषण झाले.त्यामुळे बहुजनांना आपल्या सामाजिक व राजकीय हक्कांची रास्त जाणीव झाली. जीवन समृद्धीच्या त्यांच्या आकांक्षा चालवल्या त्याचा परिणाम म्हणून वर्ग जाती परिसर याहून आलेल्या नवशिक्षितांचा साहित्य व्यवहारात नव्योन प्रवेश झाला. ''[११] १९४५ च्या नव साहित्याच्या रूपाने जगातील सर्वच साहित्यावर मनोविश्लेषणत्मक सर्वच घटक साहित्याच्या रूपाने येऊ लागले. स्वातंत्र्याच्या लोकशाही

प्रणालीमुळे समाजातील सर्वच घटक लेखन करू लागले शिक्षण घेऊ लागले त्याहून दलित साहित्य ग्रामीण साहित्य स्त्रीवादी साहित्य ,आदिवासी साहित्य जनवादी साहित्य भटका–विमूक्तांचे साहित्य धर्म,जातीच्या अनुषंगाने मुस्लिम ख्रिस्ती साहित्य येऊ लागले या सर्व नव प्रवाह मधून भाषा, मध्ये योगदान झाले. या नवसाहित्यातून सर्व घटकांना अभिव्यक्ती करण्याची संधी प्राप्त झाली.या नव्या प्रवाहामध्ये समाजव्यवस्थेचे जे चित्रण झालेले आहे त्यात ग्रामीण भागातील समाजजीवनाचे चित्रण आलेले असल्यामुळे ग्रामीण साहित्य प्रवाहातून शेतकरी जीवनाचे चित्रण प्रामुख्याने आलेले आहे.

स्वातंत्र्योत्तरकाळा नंतर शेती सुधारणा, करण्यासाठी कृषी विद्यापीठे ,शेतकरी शाळाची स्थापना झाली तसेच भाक्रा नांगल, जायकवाडी, कोयना सारखे मोठी धरणे, पाण्याच्या मुबलकतेचा परिणाम शेतीला भरपूर पाणी मिळू लागले ऊस मालाची लागवड , साखर कारखानांची भरपूर वाढ झालेली आहे. औद्योगिकरण, शिक्षणाचा परिणाम शेतीचे यांत्रिकीकरण याचा परिणाम ग्रामीण समाजजीवनावर पडला १९६० आधुनिक वाङमयीन नवे प्रवाहातील प्रमुख लेखकामध्ये शंकरराव खरात, रा.रां.बोराडे, आनंद यादव, अण्णाभाऊ साठे, या लेखकांनी समाजजीवन साहित्याच्या माध्यमातून व्यक्त केला. आनंद यादव नागानाथ कोत्तापल्ले, भास्कर चंदनशिव,वासुदेव मुलाटे, हे ग्रामीण साहित्याचे प्रभावी भाष्यकार या काळातील प्रमुख आहेत. या सर्वांनी ग्रामीण साहित्याची भूमिका स्पष्ट करतांना आधुनिकतेचा संदर्भ असल्याचे स्पष्ट केले आहे.

ग्रामीण साहित्याची संकल्पना स्पष्ट करण्यासाठी त्यांच्या व्याख्या व स्वरूप पाहून ग्रामीण संकल्पना स्पष्ट केली आहे. 'ग्रामीण समाजजीवन व साहित्य' या डॉ. गणेश देशमुख यांच्या ग्रंथातील ग्रामीण संकल्पनेच्या तीन व्याख्या पुढील प्रमाणे .

'' प्रभाकर बागले

'' ज्या साहित्यात ग्रामीण संवेदना अविष्कृत झाली असेल आणि शहरी संवेदनाचा अभाव असेल हे ग्रामीण साहीत्य ''

'' मधु मंगेश कर्णिक

'' ग्रामीण कथा ग्रामीण कादंबरी ही सारी मराठी साहित्याचीच अंगे आहेत, फक्त त्यांच्या पृथगात्मक प्रादेशिक वैशिष्ट्यामुळे त्यांचा वेगळा प्रकार आपण मानतो या वेगळ्या प्रकाराला आपले ठसठसीत व्यक्तिमत्व आहे. या ठसठसीत रूपाची ओळख नीट राहावी यासाठीच त्याला वेगळेनाव दिले.एरवी सर्व साहित्याच्या निर्मितीचा

मूळस्त्रोत एकच असतो.''

''आनंद यादव

''संकुचित अर्थाने ग्रामीण साहित्य या शब्द प्रयोगातील 'ग्रामीण' हा शब्द वापरलेला नाही ते ग्रामीण समाजव्यवस्थेशी एकूणच भारतीयांच्या ग्रामीण जीवनाशी निगडित आहे. या समाजव्यवस्थेत ब्राह्मणांपासून ते अस्पृश्य आदिवासीपर्यंतची सर्व जाती–जमातीची समाजरचना अभिप्रेत आहे.

ग्रामीण हा शब्द 'ग्राम' पासून आलेला असतला तरी हा शब्द प्रयोग फक्त ग्रामातील व्यवस्तेशी निगडित नाही, हे ही स्पष्ट केले पाहिजे. त्याचा अर्थ शहरी व्यवस्था व्यतिरीक्त जी भारतीय जीवन व्यवस्था आहे. त्या सर्व व्यवस्थेला व्यापणारा असा अर्थ अभिप्रेत आहे.म्हणजे असे की ग्राम व ग्रामाच्यालगत राहणार पूर्वास्पृश्य तसेच रानावनात राहणारे आदिवासी भारतीय आणि त्यांचे जीवन हे ही ग्रामीण या विशेषणाला अभिप्रेत आहे. या सर्वांची संवेदना ज्यात व्यक्त होते. ते ग्रामीण साहित्य असा ग्रामीण साहित्य या शब्दाचा अर्थ आहे.'' [१२]

या सर्व भाष्यकारांनी ग्रामीण साहित्याच्या संकल्पनेतून ग्रामीण साहित्य चळवळीच्या स्वरूपाची चर्चा त्यांनी केली आहे.

ग्रामीण साहित्याचा विचार करतांना शेतकरी ग्रामीण लोकजीवनात शेती संबंधीच्या प्रश्नाना घेऊन साहित्यातील निर्मिती झाली पाहिजे. अशी भावना व्यक्त करणारा असा होतो. सर्व प्रथम शेतकऱ्याची व्यथा म.फुले यांनी मांडलेली आहे.

शेतकरी साहित्याच्या अनुषंगाने डॉ.गणेश देशमुख यांच्या 'ग्रामीण समाजजीवन व साहित्य' या ग्रंथातील ग्रामीण साहित्याची संकल्पना या ग्रंथात भास्कर चंदनशिव यांचे शेतकरी साहित्य एकनोदं मध्ये कृषी हे जीवनाचे मूळ असून शेतीतील अतिरिक्त उत्पादनावर ताबा मिळविण्याचे अनेक प्रकार इतिहास काळात व आजही कसे होत अहेत. हे स्पष्ट करून म.फुलेंच्या वैचारिक तत्वज्ञानाच्या आधारे शेतकरी साहित्याची गरज नोंदवली आहे. शेती,शेतकरी व साहित्याचा परस्पर संबंधाची चिकित्सा ते लिहितात '' या देशाचे दारिद्रय हे मूळ कोडरवाहू शेतीमध्ये आहे. आणि शहरी भागाचे दारिद्र हे ग्रामीण भागातील दारिद्रयाचाच परिणाम आहे. शेतीच्या शोषणातून निर्माण झालेल्या औद्योगिक करणाचा पहिला फटका स्वाभाविकपणे शेतीवर कष्ट करणाऱ्या शेती व्यावसायिकांना बसला पोट हाती घेऊन शेतकरी शहराकडे धावू लागले. या सगळ्या विपरिततेला साहित्यात स्थान दिलेले दिसत नाही. आणि जे जे काही साहित्य लिहिले,त्यातील लेखकाची मानसिकता प्रमाण मानल्या गेलेल्या व्यवस्थापुढे

आणि पारंपारिक साहित्याच्या तथाकथित मूल्यभावाशी परभृतपणे सामोरी झालेली दिसते प्रचलित ग्रामीण साहित्य खेड्याकडे चला या आदेशी मानसिकतेतून आललेली आहे हे नाकारता येणार नाही ''[१३] शे त क री साहित्या सबंधीचा हा भास्कर चदंनशिव याचे विश्लेषण अत्यंत महत्वाचे आहे.शेतकऱ्याचे प्रश्न केंद्रस्थानी मानून साहित्य लेखन झालेले नाही.

शेतीतील सुधारणेतून ग्रामीण अर्थव्यवस्था राजव्यवस्था, समाजव्यवस्थेत परिवर्तन घडलेले आहे.वीज,पाणी, उद्योगी करणातून शेतीत सुधारणा घडल्या ऊस उत्पादन वाढले त्याहून साखर कारखाने भरपूर प्रमाणात वाढले ऊसउत्पाक शेतकरी,ऊसतोड करणारा कामगार, अल्प भूधारक शेतकरी, यांच्या व्यथा वेदना भास्कर चदंनशीव,नागनाथ कोत्तापल्ले ,श्रीराम गुंदेकर, भास्कर बडे यांच्या सारख्या लेखकांनी ऊसतोड कामगारांचे साहित्याच्या मध्ये केलेले आहे.

४.ऊसतोड कामगार अर्थ –संकल्पना :

भारतात विविध व्यवसायिकांच्या प्रबळ कामगार संघटना असून त्यांना कायद्याप्रमाणे वेतन व इतर भत्ते निर्वाह निधी पेन्शन विमा या सारख्या सवलती असतात. परंतु महाराष्ट्रात ऊसतोड कामगारांची संख्या विपूल असून त्यांना कोणत्याही प्रकारचे कामगाराचे संरक्षण नाही ,शासन पातळीवर यांच्यावर अभ्यास करणारा एखादा आयोग नाही.

प्रत्येक वर्षी ऊसतोड हंगाम प्रारंभ करतांना ऊसतोड कामगार, मुकादम ,वाहतूक संघटना काही काळ संप करतात. परंतु तात्पुरती तडजोड केली जाते. या समस्यांना यश आलेली नाही.

किमान १९३५ पासून साखर उद्योग म्हणून उदयास आलेले आहे. दुसऱ्या क्रमाकंचा उद्योग म्हणून या उद्योगाकडे बघीतले जाते. भारतात किमान ५०० च्या वर सारखकारखाने आहेत, परंतु त्यासाठी ऊसाचा पुरवठा करणारा ऊसतोड कामगारांची राष्ट्रीय पातळीवर प्रमुख कार्य करणारी संघटना अस्तित्वात नाही. विविध पक्षाचे नेते, कामगारांचे नेते, सामाजिक कार्यकर्ते दयेच्या भावनेतून काही काळ त्यांचे नेतृत्व करतात. थोड्या प्रमाणात आंदोलने करतात. महाराष्ट्रात पूणे, अहमदनगर, इस्लामपूर,सांगली,बीड या परिसरात ऊसतोड कामगार मुकादम, मालवाहतूक करणाऱ्यांचा संघटना आहेत. या जिल्ह्यात सामाजिक, कार्यकर्त्यांचा भरणा भरपूर आहे. काही प्रमाणात आंदोलन ,संप करतात शासनाकडे आरोग्य ,शिक्षण,वेतनाचे प्रश्न मांडतात.

जगात भरपूर प्रमाणात ऊसतोड कामगार असून भारतात किमान ३० लाख ऊसतोड कामगार असावेत.

पाच लाखाच्या पुढे बीड जिल्ह्यात ऊसतोड कामगार आहेत. हे कामगार महाराष्ट्र,कर्नाटक प.महाराष्ट्रात ऊसतोडणीसाठी हंगामी कामगार म्हणून जातात.

महाराष्ट्रातील ऊसतोड कामगारांची संख्या व महत्व या सबंधी प्रा.डॉ. आबासाहेब हींगे यांनी '' बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास '' डिसेंबर२००५ मध्ये पीएच.डी.च्या प्रबंधात केला अहे. महाराष्ट्रातील ऊसतोड कामगारांची संख्या व महत्व संबंधी हे लिहितात ''स्वतंत्र्यात्तर कालखंडात दूसऱ्या क्रमांकाचा उद्योग म्हणून साखर उद्योगाचा विकास झालेला आहे. १९६० मध्ये २७ साखर कारखान्यात ४५२० ऊसतोड कामगार असल्याची नोंद आहे. १९८४ ला ११८३०० ऊसतोड कामगार होते पैकी बीड जिल्ह्यातील ३७% अहमदनगर जिल्ह्यातील ८% जळगांव ,सोलापूर जिल्ह्यात ७% महाराष्ट्रातील कामगार कर्नाटक ,गुजरात, आंध्र प्रदेशात ऊसतोडणीला जातात. ऊसतोड कामगारांस महत्वाचे स्थान असून शेतातील ऊसतोडून बैलगाडी, ट्रकचय साह्याने कारखान्यापर्यंत पोहचवण्याचे काम हे ऊसतोड कामगार करतात. ऊसत उत्पादक शेतकऱ्या प्रमाणे ऊसतोडणाऱ्या कामगारांना महत्वाचे स्थान आहे. ''[१४] या ऊसतोड कामगारांचे प्रतिवर्षी साखर कारखाने प्रारंभ होण्यापुर्वी ऊसतोड कामगार व मुकादम तसेच मालवाहतूक ट्रकचे मालक प्रतिवर्षी संप करतात. परिणामी ऊसतोडणीस उशीर झाल्यास त्याचापरिणाम ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसावर होऊन ऊस शिल्लक राहणे, अल्पभूधारक ऊसउत्पादक शेतकरी कर्जबारजी होऊन ऊस उत्पादनापासून दूसरे उत्पन्न चांगले आहे असे म्हणू लागला आहे. त्यामुळे या ऊसतोड कामगारांना या उद्योगामध्ये अत्यंत महत्वाचे स्थान आहे.

ऊसतोड कामगारांच्या व्याख्या –

ऊस तोडकामगार ज्या परिसरात आहेत. त्या परिसरातील सामाजिक कार्यकर्ते संशोधक यांनी ऊसतोड कामगारांच्या कामाच्या स्वरूपावरून काही व्याख्या केलेल्या आहेत. या ऊसतोड कामगारांच्या व्याख्या प्रा.डॉ.आबासाहेब हंगे यांनी बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास या प्रबंधात दिलेल्या आहेत.

व्याख्या :

१)त्रिबंक वाघा :

'' जी व्यक्ती साखर कारखान्यास लागणाऱ्या ऊसाची तोडणी व ऊसाची वाहतूक करण्याच्या

कामात प्रत्यक्ष सहभागी होते त्यांना ऊसतोडणी कामगार असे संबोधता येईल.''

२)संभाजी शिंदे :

'' साखर कारखान्याच्या शेतीखात्या मार्फत ऊसतोडणीचे आदेशपणा घेऊन येणाऱ्या व्यक्तीने निर्देशित केलेल्या ऊस पिकाची तोडणी करून तो साळून मोळ्या बांधून त्या बैलगाडीत ,ट्रक मध्ये भरून साखर कारखान्याच्या पर्यंत वाहतूक करण्याच्या कामात सहभागी होणाऱ्या कामगारांना ऊसतोडणी कामगार किंवा ऊसतोडणी व वाहतूक कामगार असे म्हणतात.

३) मधुसूदन साठे :

'' ऊस तोडणे साळणे त्याचे वाढे बाजूला काढून मोली बांधणे या प्रकाराचे काम करणाऱ्या कामगारांना ऊसतोडणी कामगार म्हणतात ''

४)संजीव लाटे :

'' ज्या कामगारांची भरती मुकादमा मार्फत हंगामी स्वरूपाची होते व जे कामगार ऊसतोडणी साठी विविध भागातून एकत्र येतात व कोयत्याद्वारे ऊसतोडणी साळणे, मोळ्या बांधणे ट्रक–ट्रॅक्टर मध्ये भरणे करतात किंवा बैलगाडीने कारखान्याच्या पर्यंत वाहतूक करतात व ज्या कामगारांची कारखान्यावर कोणतीही जबाबदारी नसते अशा कामगाराना ऊसतोडणी कामगार म्हणणे अधिक योग्य होईल.

५) डॉ. आबासाहेब हांगे :

'' स्थलातंर करणारा एक विशिष्ट हेतूने ऊसतोडणीचे काम स्वीकारलेली प्रत्यक्ष साधनाने ऊसतोडून तो बैलगाडी,ट्रक,ट्रक्टर अशा साधनात भरणाकरून वाहतूक करणारा व अंशत: जबाबदारी कारखाण्यावर भावनिक व सामाजिक जबाबदारी मुकादमावर टाकून स्वत:च्या कुटुंबाच्या कौटुंबिक व पशुपालकीत गरजा भागविण्यासाठी जे अविरत काम करतो त्या कामगारास ऊसतोड कामगार म्हणता येईल.''[१५]

या सर्व व्याख्या परिपूर्ण आहेत असे सांगता येणार नाही.पण अभ्यासकांनी काही महत्वपूर्ण बाबीकडे लक्ष दिलेले आहे. ऊसतोडणी , वाहतूक , त्यांची साधने, कामाच्या स्वरूपाना अशा एक एका प्रमाण घटकाकडे लक्ष दिलेले आहे बऱ्याच व्याख्यात उणीवाची जाणीव होते. ऊसतोडणी कामगारांच्या संबंधाचे व्याख्या पुढील प्रमाणे करता येईल. '' शेती व्यावसायावर अवलंबून असणारा भूमिहीन तथा अल्पभूधारक कोरडवाहू

शेतीवर हंगामी स्वरूपात मुकादमाच्या मध्यस्थीने ऊसतोडणी साठी हंगामी स्वरूपात बैलगाडी सह तथा संपूर्ण कुटुंबाला घेऊन जाणारा कामगार म्हणजे ऊसतोड कामगार होय.''

या ही व्याख्योतून उणीवा दिसतील. परंतु एकंदरीत ऊसतोड कामगाराचे स्वरूप लक्षात येते

ऊसतोडणी कामगारांचे प्रकार पाडता येणार नाही परंतु त्यांच्या कामाच्या स्वरूपावरून काही प्रकार पाडता येतील पूर्व सुरीच्या अभ्यासकांनी त्याचे काही प्रकार पाडलेले आहेत.

१)डोकी सेंटर –

ऊसतोडणी कामगार ऊसतोडणी, साळणी, मोळ्या बांधल्या नंतर डोक्यावर मोळी घेऊन रस्त्याच्या बाजूस किंवा बांधावर ज्या ठिकाणी वाहन ट्रक–टॅक्टर उभे असेल त्या कडापासून शंभर–दोनशे फुटापर्यंत डोक्यावर वाहून नेणारे म्हणजे डोकी सेंटर होय,

याच कामगारांना प्रत्यक्ष तोडणीचे काम करीत असल्यामुळे कोते ,टोळी, असेही म्हणतात.

२) गाडी सेंटर :

गाडी सेंटर कामगार हे गाडीवान कोयते या नावाने संबोधले जातात. बैलगाडी च्या साह्याने रस्त्यापर्यंत गाडीने ऊसाची वाहतूक करतात सलगक्षेत्र असेल किंवा रस्ता दूरपर्यंत नसेल अशा प्रसंगी बैलगाडीच्या सहाय्याने गाडीने वाहतूककरून ट्रक,ट्रॅक्टर भरतात. त्यांना गाडीसेंटर असे म्हणता येईल.

३) डायरेक्ट गाडी सेंटर :

ऊसतोडणी कामगार स्वत:च्या बैलगाडीच्या माध्यमाने तथा साखर कारखाण्याचय टायर गाडीने शेतातून थेट कारखानापर्यंत गव्हाणीत ऊस पोहचते करावे लागते. या बैलगाडीच्या साह्याने केलेली वाहतूक तुलनेने कमी खर्चाची असते.असे डोबळ मानाने तीन प्रकार पडतात.

४) मराठी साहित्यातील ऊसतोड कामगारांचे विविध वाङमय प्रकार :

साहित्य समाजाचा आरसा असतो. या विचारधारे प्रमाणे मराठी साहित्यातून समाज जीवनाच्या परिवर्तनाचा स्विकार केला आहे. समाजातील सर्वच घटक साहित्याचे विषय झालेले आहेत. मराठी साहित्यातून उद्योग क्षेत्रातील कामगार, यांत्रिकी करणामुळे शेतकरी, जीवनातील परिवर्तन साहित्यातून आलेले आहे. लोकशाहीच्या नव्या मूल्यामुळे लेखन,शिक्षण, भाषण, स्वातंत्र्यामुळे सर्वच घटकांनी आजपर्यंत वंचित असलेले

सर्व घटक त्यात दलित,ग्रामिण, आदिवासी स्त्रीवादी जनवादी यांनी जीवन साहित्यातून व्यक्त केले आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात साखर उद्योग, वाढला वीज,पाणी,जलव्यवस्थापनाच्या सुधारणामुळे शेतीत ऊसलागवड वाढल्यामुळे ऊसतोडणीसाठी साखर कारखानदारांना कामगाराची गरज निर्माण होऊन भूमिहीन,शेतकरी, अल्पभुधारक शेतकरी, ऊसतोड कामगार म्हणून अस्तित्वात आले. जे तरूण शिक्षण घेऊन या परिसरातील लेखक कवी निर्माण झाले त्यांनी ऊसतोड कामगारांच्या जीवनामध्ये कविता,ललित लेखन, आत्मकथनाच्या माध्यमातून साहित्य लेखन केले हे लेखन १९७० नंतर होऊ लागले.

ऊसतोड कामगारांच्या सबंधी मराठी कथालेखन श्रीराम गुंदेकर यांनी प्रथम केले 'उचल'कथा संग्रहातून ऊसतोडकामगारांच्या व्यथा त्यांनी प्रारंभी मांडली प्रसिद्ध साहित्यिक भास्कर बडे यांनी 'वावर' कवितासंग्रह कथा वाङमय व 'पाणकणस ' कांदबरी लेखन केलेले आहे. ऊसतोड कामगारांच्या व्याथा वेदना मांडणारी प्रमुख कलाकृती मध्ये सरदार जाधव यांनी 'कोयता' दिनकर जायभाये, यांनी 'हिरवा डोंगर' , रामचंद्र दवंगे यांनी 'प्रहार' कैलास दौंड, यांनी 'पाणधुई' तसेच योगीराज वाघमारे यांनी 'धुराळा' कादंबरी लेखन केले आहे. शांता जोशी यांची 'गव्हानी' कादंबरी असून या लेखनातून ऊसतोडमजूरांचे जीवन चित्रण केलेले आहे.

कविता लेखन भास्कर बडे, 'वावर' कविता संग्रह कैलास दौंड यांचा ऊसाची कविता प्रा.रामचंद्र दवंगे यांची 'तांडा' सय्यद अल्लाऊद्दीन यांचा 'उचल कोयता तोडीला' हे प्रमुख कविता संग्रह मधून ऊसतोड कामगारांच्या भावभावना व्यक्त केलेल्या आहेत.

या शिवाय डॉ.नारायणराव मुंढे यांनी 'मागेफिरा पतंगानो ' हे ललित जीवन चित्रण करणारे अत्यंत महत्वाचे पुस्तक असून योगीराज बागूल यांनी 'पाचट' हे आत्मकथन लेखन केले आहे.

ऊसतोड कामगारांच्या जीवन चित्रण करणारी स्फूट कथा कविता, वैचारिक लेखन केले जावू लागले आहे. ऊसतोड कामगारांच्या संबंधी समकालीन लेखकामध्ये बालासाहेब गर्कळ यांची 'उचल' कादंबरी लक्षणीय आहे तसेच साहित्यिक , विठ्ठल जाधव यांचे कथा, कविता, लेखन, एकबाल पेन्टर यांची स्फूट कविता लेखन करीत आहे.

या शिवाय विविध मासिके दिवाळी अंक , वर्तमानपत्राहू ऊसतोड कामगारांच्या विविध समस्या त्यांचे प्रश्न सातत्याने लेखन होऊ लागले आहे.मराठी साहित्यामध्ये ऊसतोडणी करणारा कामगार वर्ग असून हा कामगार वर्ग शेती व्यवसायावर अवंलबून असणारा आहे.त्यातील काहीन अल्पभूधारक तर काहींना भूमिहीन

म्हणून हंगामी कामगार म्हणून ऊसतोडणीस जाते लागते त्यांच्या व्यथा वेदना, दु:ख साहित्याच्या माध्यमातून व्यक्त करणार एक लेखक वर्ग निर्माण होऊ लागलेला आहे. ऊसतोडणी कामगाराचे चित्रण या वरील वाङमय प्रकारात होत आहे.

६) ऊसतोड कामगार साहित्याचे स्वरूप, व समस्यांचे चित्रण :

ऊसतोड कामगारांचे साहित्यातून त्यांच्या जीवनाचे अंतरंग व्यक्त झालेले आहे. या साहित्या मधून शेतकऱ्यांचा कर्ज बाजारीपणा, मुकादमा कडून सातत्याने उचल घेणे, तसेच एकदा घेतलेली उचल अनेक वर्षे फिटत नही. शेतकऱ्यांना सातत्याने नैसर्गिक संकट येतात. ऊसतोड कामगार रोज विविध समस्यात अडकलेला असतो. त्याचा प्रत्यय कथा,कादंबरी कविता सारख्या लेकनातून येतो. ऊसतोडी साठी जाणारे ऊसतोडणी कामगारांना सतत मुकादमाडून उचल घ्यावी लागते. सरदार जाधव त्यांच्या कोयता कादंबरीत शेतात पिके नाही गरजवंत शेतकऱ्यांना मुकादमाच्या मदतीने उचल देवून ऊसतोडणीसाठी कसे नेतात या संबंधीचे दर्शन घडते ते असे

'' भाईर गावाचा एक माणूस मुकादम बनून गांवात हिंडायाला लागला. बेलापूर कडच्या येका साखार कारखान्याला ऊसतोडणार लेभर पूरविण्याच कंत्राट तोडल्याल होत म्हणे. दिसेल त्याल हो माणूस ऊसतोडीला जाण्याबद्दल पटवून सांगत होता या कामासाठी लोकांनी तयार व्हाव म्हणून त्या लोकांच्या अडीअडचणी पाहून आगाऊ पैसे वाटत होता '' [१६] गरजा बघून शेतकरी असे मुकादमाच्या मध्यस्तीने अल्पभूधारक शेतकरी ऊसतोड कामगार म्हणून जाण्यासाठी निघाले .

मुकादमाच्या स्वरूपा संबंधी 'हिरवा डोंगर' कादंबरीत दिनकर जायभाये यांनी मुकदमा बद्दल लिहीतात '' भानदास मुकादम दिसायला गायीचय वानाचा व्हता, पण आतून लई कावेबाज होता. सकीच्या लग्नाला पैसे दिले हाते पण त्याच्यावर व्याजापेक्षा जादा खाल्ल व्हंत हरीतात्या पडला इमानदार येळेला मदत केली ना ? मग त्याला धोखा ध्यायचा नाही'' [१७] ऊसतोड मजूरांचा सावकार म्हणजे मुकादम अडनी ऊसतोड मजूरांची सातत्याने आर्थिक फसवणूक करणारा म्हणून साहित्यातून आलेला आहे.

ऊसतोड मजूरांच्या मुला–मुलींच्या शिक्षणाचा गंभीरप्रश्न साहित्यातून व्यक्त झाला आहे. शांता जोशी यांनी 'गव्हानी' ही ऊसतोडकामगारांच्या मुलांच्या शिक्षणाच्या समस्या केंद्रबिंदू मानून लेखन केलेली कादंबरी आहे. या कादंबरीच्या मनोगता मध्ये शांता जोशी लिहितात.

'' दसऱ्याला निघालेले कामगार पाडव्याला घरी परतात. तो पर्यंत शाळेच्या परीक्षा आटोपलेल्या असतात पुन्हा मुलांना शाळेत प्रवेश देणे कठीण होते. माग ही मुलं अर्धा कोयत्याच्या कामाला लागली जातात. किंवा कच्चा कामगार म्हणून काम करतात '' [१८]

ऊसतोड कामगारांच्या स्त्रियांची सातत्याने छळ विविध प्रकारे होतो.कुटुंबातील नवऱ्या कडून सतत अपमान मारहाण याचे चित्रण जवळपास सर्व कादंबरी कथा ललित वाङमयात येतात. त्या शिवाय ऊसतोडकामगारंच्या तरूण मुली, तरूण स्त्रियांच्याकडे सातत्याने वाईट बोलणे, पहाणे, प्रसंगी प्रत्यक्ष बलत्कारासारखे प्रसंग मराठी साहित्यात चित्रित झालेले आहेत. रामभान दवंगे यांच्या 'प्रहार' कांदबरीमध्ये विचार लावतो.

'' तशा त्या अंधारात सुशी उभी होती. तेवढ्यात तिच्या तोंडावर एकहात पडला व दुसऱ्या हातानं तिला उचलले तोंडावर हात असल्याने सुशीला ओरडातही येईना.ती फक्त हातपाय हालववत होती. सुशिलेला उचलून कुणीतरी नेल. ''[१९] या ऊसतोड कामगारांच्या साहितयतून स्त्रियांचा बाळंतपणाचे चित्रण, त्यांना पैशाच्या बळावर कब्जा करण्यासारखे प्रसंग आलेले आहेत. ऊसतोड कामगारांच्या या साहित्यातून सातत्याने संकटे येतात. त्यात झोपड्या जाळणे अपघातात माणसे बैल यांचा अंत होणे.

नवा मुकादम ऊसतोड कामगार झाल्यापासून त्यांची बुडवणूक करणे दुष्काळामुळे सातत्याते शेतकऱ्याचा भूकेचा, दारिद्रत्याचा समस्यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे या ऊसतोड कामगारांना माणसाच्या आरोग्याबरोबर प्राण्याचे आरोग्य सांभाळणे कठीण जाते तसेच दारू सारखे व्यसन त्यांना लागली जातात.परंतु कर्ज करून प्रसंगी कोणत्याही प्रकारचे काम करवून मुलांना शिकविले पाहिजे याचे आशावादी चित्रण येते. ऊसतोड कामगार सारखकारखाण्याकडे ऊसतोडणीसाठी निघण्यापासूनचे भावनिक प्रसंग काव्यातून आलेले आहेत.मराठी साहित्यातील ऊसतोड कामगारांचे विविध प्रकाच्या समस्या संकटे व फसवणूक याचे भावनिक चित्रण साहित्यातून येत आहे.

जागतिकीकरणामुळे ऊसतोडणीच्या यांत्रिकीकरणामुळे ऊसतोड मजूरांच्या व्यवसायावर संकटे येतात काय ? अशा विचार साहित्यात येतो. ऊसतोड कामगार आणि साखर कारखाने याच्या संबंधीच्या संप आंदोलनाचे ऊसतोड कामगार व ऊस उत्पादक शेतकरी यांच्या परस्पर सबंध या सारखे विविध विषय ऊसतोड कामगारांच्या साहित्यात येतात.

७)साहित्यातील ऊसतोड कामगारांच्या संघटनांचे स्वरूप

मराठी साहित्यातील कादंबरी वाङम व ललित वाङमयातून ऊसतोड कामगारांचा मुकादम वाहतूक चालक मालक यांच्या संघटना आहेत ऊसतोड कामगार व मुकादम यांच्या संयुक्त संघटना अस्तित्वात असून विविध पक्षाचे नेते यांचे नेतृत्व करतात. प्रत्येक वर्षी ऊसतोड हंगाम प्रारंभ होण्यापुर्वी दसरा, दिपावलीच्या काळात विविध वर्तमान पत्रे, ऊसतोड कामगारांच्या हक्कासाठी, बंदची हाक देतात .सामाजिक कार्यकर्ते, व राजकीय नेते यांचे नेतृत्व करतात. साहित्यामधून त्यांचे संघटन स्वरूप कामगारांच्यावर होणारे अन्यायाचे दर्शन साहित्यात घडते.डॉ.नारायणराव मुंढे यांचे 'मागेफिरा पतंगानो' या ललित वाङमय मध्ये ऊसतोड संघटना, मुकादम,यांच्या विषयी चित्रण केलेले आहे. साखर कारखान्याचे चेअरमन प्रशासन,मुकादम ऊसउत्पादक शेतकरी आणि ऊसतोड कामगार यांच्या सबंधीचे चित्रण येते.

कैलास दौंड यांच्या 'पाणधुई'मध्ये ऊसतोडीसाठी येणारा यंत्रिकीकरणाचा व ऊसतोडकामगारांच्या हक्का साठीचे विविध लढे आलेले आहेत.' हिरवा डोंगर' दिनकर जायभये 'प्रहार', रामभान दवंगे 'पाणकणसं' भास्कर बडे ,या प्रमुख कादंबरी वाङमययात ऊसतोड संघटनाच्या लढे, त्यांच्यावर होणारे अन्याय, ऊसतोड कामगारांची दिशाभूल,त्याची पिळवणूक सातत्याने त्याची विविध पक्षाचे नेते मंत्री, आमदार, खासदार ,मंत्रीपदे मिळवली परंतु त्यानी केवळ ऊसतोड कामगारांचे आंदोलनाच्या फायदा ऊसतोड कामगारं पेक्षा स्वत:ला घेतलेले आहे.

ऊसतोड कामगारांमध्ये शिक्षण घेतलेले उच्चशिक्षण घेतलेले तरूण बेकारीमुळे ऊसतोडणी कामगार म्हणून काम करू लागले आहेत.या कामगारांचे मराठी साहित्य व विविध वर्तमानपत्रात, सामाजिक, राजकीय कार्यकर्ते न्याय अन्यायायाचे चित्रण करतात.

८) अभ्यास विषयाची आवश्यकता :

समकालीन मराठी साहित्य समाजातील सर्व घटक विषयाचे प्रतिनिधीत्व करते. भारत कृषी प्रधान देश असून शेती उद्योग यांचा परस्पर संबंध आहे. स्वातंत्र्तोतर कालखंडामध्ये जलव्यवस्थापन, वीज यांत्रिकी–करणाचा परिणामपाहून शेती मध्ये नगदी पिक म्हणून ऊसउत्पादनाकडे पाहिले जावू लागले आहे. ज्या परिसरात शेतीला पाणी मिळले तेथील परिसरात साखर कारखाने निर्माण झाले. परिणामी ज्या भूप्रदेशात शेती कोरडवाहू होती तेथील शेतकरी कोरडवाहू शेतीतच काम संपल्याने नंतर दुसरा पुरक व्यवसाय शोधू लागला. त्यांना

जनावरांना चारा व माणसांना काम जेथे मिळू लागले ते परिसर त्यांनी शोधला.श्रीरामपूर जवळ बेलीपूर साखर कारखाना असून त्या ठिकाणी मराठवाडा खानदेतातील अल्पभूधारक कोरडवाहू भूमिहीन शेतीत काम करणारा प्रारंभी ऊसतोडणीसाठी जावू लागला. हा परिसर इतका सुपरिचित झाला की आज भारातातील कोणत्याही प्रदेशात ऊसतोड मजूर जर गेला तरीही तो बेलापूर गेलो असे म्हणतो.प्रारंभी मुकादमाच्या मध्यस्थीने ऊसतोड कामगार कामाच्या पूर्वी आगाऊ रक्कम म्हणजे उचल घेऊन करार करून ऊसतोडणी कामावर उपलब्ध झाले.

या ऊसतोडणी कामगारांना काम मिळाले असले तरी त्यांना गुलामाप्रमाणे वागणूक मिळू लागली. परिणामी ज्या परिसरामध्ये लोक या कामासाठी जाऊ लागले तेथील प्रथितयश लेखक, कवी, यांनी त्याच्या व्यथा, वेदना दु:ख, कथा कादंबरी, ललित लेखन, कविता, आत्मकथनातून अभिव्यक्त केले. मराठी साहित्यातील ग्रामीण शेतकरी शेतमजूर यांच्या दु:खाचे चित्रण, कसे झाले हे तपासण्यासाठी या लघुशोध प्रकल्पात अभ्यास करण्याचा हेतू आहे.ऊसतोड कामगाराना सहा ते आठ महिने पावसाळ्या पर्यत ऊसतोडणी साठी जावे लागते. या कालखंडात त्यांना वृद्ध आई वडील लहान मुले यांना गावी ठेवावे लागते ऊसतोडणी करणाऱ्या स्त्री पुरूषांना विविधसमस्यांना सामोरे जावे लागते.

मराठी साहित्यातील ऊसतोड कामगारांचे चित्रण त्यांचे समाज जीवनातील व्यथा, त्यांच्या जीवनातील ताणतणाव, त्यांची फसवणूक त्यांच्याशी होणारे वर्तन व्यक्ती म्हणून त्यांचा होणारा छळ, त्यांचे सर्वांगिंन शोषण हे सर्व समाजावून घेणे महत्वाचे आहे.

ऊसतोड कामगार स्त्रियांचे दु:ख भयानक असून घरातील, कुटुंबातील लोकांबरोबर बाहेरील चंगळवादी लोकंचा सातत्याने होणारा त्रास आरोग्य, बाळंतपण, आंघोळ करताना कामे करातंना बाळास पाजतांना त्यांच्याकडे वाईट हेतू नजरेन बघून त्यांची सातत्याने अवहेलना होते त्यांची मराठी साहित्याने दखल घेतलेली आहे. त्यांचा विचार अभ्यास करणे गरजेचे आहे.

या लघुशोध प्रकल्पामधून ऊसतोड कामगारांच्या साहित्याचे मुल्यमापन व्यक्ति–स्थळ प्रसंग घटना, वैचारिकता प्रदेशी भाषा विशेष निसर्ग पाहणे आवश्यक आहे. कथानक संवाद भाषाशैलीच्या संशोधन केले जाणार आहे.

ऊसतोडणी करणारा असंघटीत कामगार असून त्यांचे नेतृत्व मुकादम राजकीय पक्षाचे कार्यकर्ते करतात.

त्यामुळे ऊसतोडकामगारांचे कारखाना ,त्यांचे अधिकारी, तर कधी–कधी त्या परिसरातील हे कामासाठी जातात. त्या प्रदेशातील लोक त्यांना विविध प्रकारचे त्रास देतात या सर्वांचा अभ्यास संशोधन होणे गरजेचे असल्यामुळे या विषयावरचे प्रकल्प लेखन करण्याचा हेतू आहे.

९) संशोधन पद्धतीचे उपयोजना :

प्रस्तुत प्रकल्पाच्या लघुशोध प्रकल्प लेखनासाठी विविध संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. त्याचा विचार पुढील प्रमाणे करता येतो.

१) ऐतिहासिक पद्धती :

भारतीय शेती शेतकरी त्यांच्या जागतिकी करणामुळे यांत्रिकी करणाहून साखर कारखाने त्यावर अवलंबून असणाऱ्या ऊसतोडणी कामगारांची व साखर उद्योगाचा अभ्यास सामाजिक शास्त्रातील विविध प्रबंध आधारे केला आहे. पूर्व सुरींचे अध्यायन प्रकल्प संशोधन प्रबंधाचा आधार घेतलेला आहे.

२)विश्लेषणात्मक , वर्णनाथ्मक संशोधन पद्धती :

आधार ग्रंथाच्या आधारे कथा, कादंबरी,ललित लेखन, आत्मकथन, कवितासंग्रह विविध सामाजिक कार्यकर्ते यांच्या कलाकृतीच्या आधारे विश्लेषण केले जाणार आहे.

पाहणी :

ऊसतोडणी कामागार ज्या परिसरातील आहेत त्यांचे गाव,घर परिसर, त्यांचे आई वडील मुले यांच्या जीवनानुभव समजून घेणे, ऊसतोड कामगार ऊसतोडणीसाठी जाता– येता, अनुभवाची पाहणी करणे, ज्या परिसरात ते काम करतात व त्या परिसरात त्यांचे राहणे , ऊसतोडणी ,पहाणी यांचा विचार या अभ्यास पद्धतीत केला गेला आहे.

चर्चा पद्धत :

ज्या परिसरात हे लोक ऊसतोडणी करतात त्या परिसरातील लोकांशी चार्च करणे अभ्यास दौऱ्या मधून माहिती गोळा करून लघुशोध प्रकल्प पूर्ण केला जाणार आहे.

१०) लघुशोध प्रकल्प विषयाचे महत्व :

मराठी साहित्यातील ऊसतोडणी कामगारांच्या विषयी चित्रण करणारे मराठी साहित्य अभ्यासासंबंधी विषयाची निवड करतांना शेतकरी,शेतमजुर, त्यांचे बदलते लोक जीवनपद्धती, ज्या परिसरात हे लोक राहतात

तेथील सामाजिक,राजकीय,संस्कृतिक अंगाचा अभ्यास महत्वाचा आहे.खानदेश,मराठवाडा या प्रदेशातील कोरडवाहू भुमिहीन शेतकरी त्यांची मुले,आई–वडील स्त्रियां त्यांच्या जीवनासंबंधी गैरसमज आहेत.याचा विचार करणे गरजेचे आहे. उद्योगधंदे नौकरीची संधी नाही.कष्टाशिवाय दुसरे या लोकांच्या नशिबी नाही.आज भरभपूर शिक्षण घेतलेले पदवीधर तरूण पदवी घेवून नौकरी नसल्यामुळे घरच्या परिस्थितीमुळे ऊसतोडणी करतात. अल्पवयात लग्न करणे भ्रण हत्या करणे, सातत्याने होत असल्याने त्यांच्यात व्यसनाचे प्रमाण जास्तीचे आहे.

ऊसतोडणी करणारे त्यांच्या मुलांना शिक्षण देवून प्रगतीकडे हे या लोक येवून विविध व्यवसाय करू लागले आहेत. ऊसतोडणी कामगारांच्या समस्या व्यथांचे चित्रण असणारे कथा –कादंबरी ललित लेखन, आत्मकथन,कविता, ज्या परिसरातील दिवाळीअंक,दैनिके, मासिके, या मधून येते. या सर्वांचा अभ्यास ज्या लघुशोध प्रकल्पामधून महत्वाचा आहे. त्यामुळे हे लघुशोध प्रकल्प विषय महत्वाचे आहेत.

उद्दिष्टे :

१) मराठी साहित्यातील ऊसतोड कामगारांच्या जीवनावरील वाङमय लेखनाचा आढावा घेणे.

२) ऊसतोड तोडणी कामगारांच्या जीवनाचे सर्वांगिण चित्रण झाले का ? हे तपासणे

३)मराठी साहित्यानी ऊसतोडणी कामगारांची दखल घेतली आहे का ? ते तपासणे

४) मराठी साहित्य संशोधन अभ्यासकांचे या विषयाकडे लेक्ष वेधणे

५) शासन ऊतसोडणी कामगारांच्या समस्याकडे लक्ष देते काय ? याचा विचार करणे

६)ऊसतोडणी कामगार लेखक,कवी यांच्या लेखनाचा विषय होवू लागला आहे का ?

७) समकालीन मराठी साहित्यिकांचे योगदान तपासणे

८) मराठीतील दैनिक,मासिके,माध्यमांनी याची दखल घेतली आहे का ? ते तपासणे

कथा ,कादंबरी,ललित लेखन आत्मकथन, कविता,विविध दैनिके यांचा साधन ग्रंथ संदर्भ ग्रंध म्हणून वापर करणे हे उद्दिष्ट घेवून लघुशोध प्रकल्प पूर्ण केला जात आहे.

समारोप :

मराठी साहित्यात ऊसतोडणी कामगारंचे साहित्यातील ऊसतोडणी कामगारांच्या स्वरूपाचा विचार केलेलाा आहे. ऊसतोडणी कामगारांच्या वाङमय प्रकारानुसार या साहित्यातील समकालीन मराठीचे चिंतन अभिव्यक्त झालेल्या समस्या,समाजजीवन साहित्यातील वास्तवता ,वाङमयीन चवळवळ, साहित्याची भूमिका

आणि १९६० नंतरचे नवे वाङमयीन प्रवाहाचे स्वरूप त्यातील ग्रामीण समाज जीवण शेतकरी साहित्य चळवळ ऊसतोडणी कामगारांचे जीवनाचे स्वरूप,ग्रामीण साहित्याचे स्वरूप, ऊसतोडणी कामगारांचे वर्गीकरण संकल्पना,व्याख्येचे स्वरूप मराठी साहित्यातील ऊसतोडणी कामगारांचे विविध वाङमयीन प्रकार, त्यांच्या साहित्याचे स्वरूप, समस्यांचे चित्रण ,ऊसतोड कामगारांच्या संघटना , त्याच प्रमाणे ऊसतोडणी कामगारांच्या साहित्याची अभ्यासाची आवश्यकता याचा विचार करावा लागतो. संशोधन पद्धतीचे उपयोजन करून या प्रकल्प विषयाचे महत्व बघीतले आहे. या प्रकल्पाची उद्दीष्ट्ये स्वरूपाची चर्चा या प्रकणात केलेली आहे. या सर्व बाबींचा विचार करून हे प्रकरण पूर्ण केले आहे.

पुढील प्रकरणामध्ये कथनात्मक साहित्याचे स्वरूप त्यात कथा–कांदबरी ललित साहित्य–आत्मकथन, गद्य लेखनाचे विषय त्यांचे स्वरूप व वैशिष्टे ही आधार ग्रंथाच्या आधारे याचा विचार करणार आहे.

संदर्भ :

१. नागनाथ कोत्तापल्ले 'साहित्याचा अन्वय अर्थ स्वरूप प्रकाशन औरंगाबाद १९९६ पृष्ठ क्र.७६

२.जयद्रथ जाधव संपा.१९८० नंतरचे मराठी साहित्य स्वरूप आणि समिक्षा,अरूणा प्रकाशन लातूर, प्र.आ.२०१२ पृष्ठ क्र.२६

३.तत्रवे पृष्ठ क्र. २७

४.तत्रैव पृष्ठ क्र. २८

५. यशवंत मनोहर,समाज आणि साहित्य ,समिक्षा ,सुगावा प्रकाशन पुणे, प्र.आ.१९९२ पृष्ठ क्र. ४

६. तत्रैव प्रष्ठ क्र. ६

७.जयद्रथ जाधव संपा. १९८० नंतरचे मराठी साहित्य स्वरूप आणि समिक्षा,अरूणा प्रकाशन लातूर ,प्र.आ. २०१२ पृष्ठ क्र. ४३९

८.तत्रैव पृष्ठ क्र.४४८

९.तत्रैव पृष्ठ क्र. ३२

१०. तत्रैव पृष्ठ क्र. ३२

११. तत्रैव पृष्ठ क्र. ३३

१२. गणेश देशमुख – ग्रामीण समाज जीवन व साहित्य,स्वरूप प्रकाशन औरंगाबाद,प्र.आ.२००८ पृ.क्र.२६३

१३. तत्रैव – प्रष्ठ क्र. २८०

१४. आबासाहेब हांगे – बीड जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास – डिसेंबर २००५ पीएच.डी. चा प्रबंध

१५.तत्रैव पृष्ठ क्र. २३

१६. सरदार जाधव –कोयता , जनशक्ती वाचक चळवळ औरंगाबाद ,प्र.आ. १९९४ ,पृष्ठ क्र. २१

१७. दिनकर जायभाये – 'हिरवा डोंगर ' सुमेरू प्रकाशन डोंबीवली,प्र.आ.२००० पृष्ठ क्र. ९

१८. शांता जोशी – 'गव्हाणी ' स्वरूप प्रकाशन औरंगाबाद प्र.आ.२००२ पृष्ठ क्र. ८

१९. रायभान दवंगे 'प्रहार' सुदिन प्रकाशन पुणे प्र.आ.२००४ पृष्ठ क्र. १०९

प्रकरण दुसरे

ऊसतोडणी कामगारांचे कथनात्मक साहित्य

(कथा, कादंबरी, ललित, वाङ्मय, आत्मचरित्र)

प्रकरण दुसरे

ऊसतोडणी कामगारांचे कथनात्मक साहित्य

(कथा,कादंबर,ललित लेखन, आत्मकथन)

१) ऊसतोडणी कामगारांचे वेगळेपण.

२)ऊसतोडणी कामगारंचे कुटूंब जीवन.

३)ऊसतोड कामगारांच्या कथनात्मक साहित्यातील निसर्ग.

४)तयारी बेलापूरची (ऊसतोडणीसाठी जाण्याची) .

५)कथनात्मक साहित्यात मुकादमाचे चित्रण.

६)ऊसतोड कामगारांच्या साहित्यातील आंदोलने–राजकारण.

७)ऊसतोड कामगारांचे साहित्यातील विद्रोह –अवहेलना.

८)ऊसतोड कामगारांच्या कथनात्मक साहित्यातील भाषा वैभव.

९)ऊसतोड कामगारांच्या साहित्यातील लोकवाङमय .

१०)ऊसतोड कामगारांच्या कथनात्मक साहित्यातील समस्या.

११)ऊसतोड कामगारांच्या कथनात्मक साहित्यातील बालकांचे चित्रण.

१२)ऊसतोड कामगारांच्या कथनात्मक साहित्यातील अंधश्रद्धा.

१३)ऊसतोड कामगारांच्या कथनात्मक साहित्याचे मुल्यमापन

१४)समारोप.

प्रकरण दुसरे

ऊसतोडणी कामगारांचे कथनात्मक साहित्य

(कथा, कादंबरी, ललित, वाङ्मय, आत्मचरित्र)

आज मराठी साहित्यामध्ये ग्रामीण जीवनात सहकारी संस्था बरोबर शेतकरी, शेतमजूर, खेड्यातील सर्वसामान्य घटक साहित्याचा विषय झालेले आहेत. साहित्याच्या क्षेत्रात परिचित नसणारे मानवी जीवनाचे विविध प्रकारचे जीवन अनुभव ग्रामीण समाज व्यवस्थेत प्रतिभा सामर्थ्याने घडविले जात आहे.साहित्यातून अपरिचीत समाजजीवन साहित्याचा विषय झालेला आहे.स्वातत्र्योत्तरकाळात ग्रामीण भागात शेती आधारित उद्योगधंदे निर्माण झाले तर तेथील लोकांना त्याचा फायदा होवून त्याचा शेतकरी, शेतमजूर यांना रोजगार वाढवा म्हणून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात साखर कारखाने स्थापन झाले.

ज्या परिसरात जलसिंचन उपलब्ध झाले तेथे प्रारंभी साखर कारखाने सहकारी तत्वावर उभारले गेले. त्यामुळे आर्थिक विकासात भर पडून त्याचा फायदा शेतकरी व त्या परिसरात शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतमजुरांना सुरूवातीस झाला. ग्रामीण भागातील लोकांना त्यातून रोजगार निर्माण होवून शेतीचे आधुनिकीकरण, यांत्रिकीकरण व पूरक व्यवसायाचे रोजगार निर्मितीमध्ये भर पडलेली आहे.

ग्रामीण भागात आर्थिक उन्नतीत भर पडल्यामुळे सामान्यातील अतिसामान्य घरातील मुलांना उच्च शिक्षण मिळू लागले आहे. या शिक्षणामुळे शेतमजूर, शेतकरी, सामान्य कामगारांमध्ये जागृती झाली. त्यांना आपल्या हक्क, अन्याय, अत्याचार समजू लागले आहे. या सर्वांची अंमलबजावणी साहित्याच्या द्वारे अभिव्यक्त करण्याची संधी आता होत असल्यामुळे अभिव्यक्त होऊ लागली आहे. राजकारणासाठी सहकारी संस्था, बँका, साखर कारखाने, सत्तेच्या राजकारणासाठी वापर केला जावू लागला.ऊसासारखे पीक घेण्यासाठी विविध ठिकाणी सहकारी साखर कारखाने उभारले जावू लागले. या सर्वांमधून राजकारणी लोकांनी शेतकऱ्यांपेक्षा स्वत:च्या विकासाचा विचार केला. शेती विकासाऐवजी शेतकऱ्याच्या माथी कर्ज घेतले जावू लागले. कारखान्याच्या राजकारणात शेतकरी पिळला जाऊ लागला. जास्त प्रमाणात पाणी, रासायनिक खतांमुळे जमिनीत क्षार वाढून शेतीच्या उत्पादनावर त्याचा परिणाम होऊ लागला. या सर्वांचा परिणाम समाजावर झाला.

समाजाच्या उन्नतीसाठी साक्षरतेचे प्रमाण वाढले. ग्रामीण भागात उच्चशिक्षण मिळू लागले. या शिक्षणातून व्यावसायिक शिक्षणाऐवजी पारंपारिक शिक्षण घेवून काही ग्रामीण भागातील तरुण विविध क्षेत्रात नौकरी करू

लागले आहेत. या तरुणांनी ते ज्या परिसरातून आलेले आहेत किंवा नोकरीच्या निमित्त ग्रामीण भागाशी त्यांचा संबंधआलेला आहे त्यांनी या समाज जीवनाचा कलात्मक विचार करून साहित्याच्या क्षेत्रात निर्मिती केली आहे. साखर उद्योग क्षेत्रात ऊस लागवड करणारे ज्या प्रमाणात शेतकरी आहेत तसे त्या ऊस तोडणारे शेतकरी, शेतमजूर, कामगार म्हणून काम करू लागले आहे. त्यांच्या व्यथा, वेदना, दु:ख, समस्यांची मांडणी १९७० नंतर करणारे लेखक उदयास आलेले आहेत. त्यातील श्रीराम गुंदेकर यांनी 'उचल' कथा (संग्रह) यातून ऊसतोडीच्या काम करणाऱ्या मजुरांच्या समस्या प्रथम त्यांनी मांडल्या आहेत. ऊसतोडणी कामगारांचे शोषण कसे होते याचे दर्शन त्यांच्या कथामधून येते. तसेच डॉ.भास्कर बडे यांनी कथा साहित्यातून पांढर, चिकाळा, खिलाऱ्या, कथासंग्रहातून व विविध मासिकात त्यांच्या अनेक ऊसतोडणी मजुरांच्या समस्या मांडणाऱ्या कथा आलेल्या आहेत. 'पाणकणसं' कादंबरी, अंजीमाय बाल कादंबरी यासारखे कथात्मक साहित्याची निर्मिती करणारे डॉ.भास्कर बडे ऊसतोड कामगार संबंधाने लेखन करणारे प्रमुख साहित्यिक आहेत मराठी साहित्य विश्वात.

ऊसतोडणी कामगारांच्या जीवनावर लेखन करणारे प्रमुख लेखक त्यात सरदार जाधव यांची कोयता कादंबरी, शांता जोशी यांची बालकांच्या प्रश्नावरची 'गव्हाणी' तसेच दिनकर जायभाये यांची हिरवा डोंगर, प्रा.रायभान दवंगे 'प्रहार' , कैलास दौंड यांची 'पाणधुई', योगिराज वाघमारे यांची 'धुराळा', बाळासाहेब गर्कळ यांची 'उचल', 'मागे फिरा पतंगांनो',हे ललित साहित्य डॉ.नारायणराव मुंढे आणि आत्मकथन 'पाचट' योगिराज बागूल यांनी लिहिले आहे.

ऊसतोडनी कामगारांवर कथनात्मक साहित्य त्यात कथा, कादंबरी, ललित साहित्य, आत्मकथन हे वाङमय प्रकार लेखन करून ऊसतोडणी कामगारांचे अंतरंग चित्रित झालेले आहे. या कथनात्मक साहित्यातून ऊसतोडणी करणारा कामगार वर्ग त्यांच्या समाजजीवन, कौटुंबिक समस्या, निवेदन, निसर्ग, भाषा शैली, संवाद, शब्दकला म्हणी, त्यांच्या व्यथा, वेदना, विद्रोह, आंदोलने त्यांच्यावर ओढवणाऱ्या विविध आपत्ती, पुरूष–स्त्री, बालके या वरील वाङमयाचा विविध पैलूने विचार करावा लागतो.

१) ऊसतोडणी कामगारांचे वेगळेपण

ऊसतोडणी कामगारांचे समाज जीवन स्थिर नाही. कारण पावसाळा प्रारंभ होण्यापूर्वी शेतीची मशागत करणे हे शेतकरी स्वत:ची कोरडवाहू शेती किंवा दुसऱ्याच्या शेतात या काळात मजुरी करतात. शेतीमध्ये पुरेसे उत्पन्न नसल्यामुळे पावसाळ्यानंतर काम नसल्यामुळे पिके कमी झालेली असल्यामुळे सतत शेतकऱ्यांच्या घरात

तंगाई असते. याचं वर्णन सरदार जाधव यांच्या 'कोयता' कादंबरीत येते ते असं.

''पल्हाटीवर काय इघन पल्डं कुणास ठाऊक? पऱ्हाटीच्या कैऱ्या फुल, पानं गळायला लागली. पल्हाटीची खोडं, मुळ्या उचकायला लागल्या. मायला अन् दादाला तोंडात मारल्यावाणी झालं. ज्वारीच्या अशेवर दिस काढू लागले. चार चार दिस हुरड्यावर जगू लागले.''[१] शेतकरी काम करतो. बियाणे उधारीवर घेतो. कोणतंही पीक पूर्ण शेतकऱ्याला मिळतच नाही. कापसाच्या पिकावर रोग पडला, ज्वारीच्या आशेवर जीवन जगावे लागते. परंतु ते ज्वारीचेही पीक पुरेसे होईल असं सांगता येणार नाही. ज्वारीचे पीक तयार झाल्यावर तंगाईमुळे विकणे व गरजेच्याप्रसंगी त्यांना पुन्हा दुप्पट भावाने विकत घेणे हे शेतकऱ्यांना सतत करावे लागते. शेतकरी धान्य पिकले की कर्जमुळे विकतो आणि गरजेपोटी तेच धान्य दुप्पट भावाने त्यांना परत विकत घेणे आवश्यक वाटते.

कर्जबाजारी शेतकरी ऊसतोडणी करणाऱ्या मजुरांना शोधणारा मुकादम गरजवंत शेतकऱ्यांना ऊसतोडणी कामासंबंधी सतत पटवून देतो. परंतु ज्या मजुरांना या कामाची माहिती नसते ते कामासाठी जाण्यास प्रथम तयार होतात व पुढे या कामाची सवय लागते. 'कोयता' शेतीत पिके नसल्यामुळे शेतकऱ्यांना मजूर म्हणून शोधणारा मुकादमाच्या सबंधी सरदार जाधव कोयता मध्ये लिहितात

''गाव पुढे येगळ्याच येढणीच्या वळणावर आलं. भाईर गावचा माणूस मुकादम बनून गावात हिंडायला लागला. बेलापूर कडच्या येका साखर कारखान्याला ऊस तोडणारा लेभर पुरविण्याचं कंत्राट तोडल्यालं व्हतं. म्हणे दिसेल त्याला तो माणूस ऊसतोडीला जाण्याबद्दल सांगत व्हता.''[२] मुकादम गरजवंत शेतकरी शेतमजुरांना ऊसतोडणीसाठी नवे असणाऱ्या शेतमजुरांना शेतकऱ्यांना प्रथम कामाची गोडी, त्यांच्या गरजानुसार पैसे देवून त्यांना ऊसतोडणीसाठी तयार करणारे चित्रण बहुतेक कथनात्मक साहित्यात येते.

जेव्हा कोरडवाहू शेतकरी, अल्पभूधारक शेतकरी, दुसऱ्याच्या शेतीत काम करणारे शेतमजूर साखर कारखाने असणाऱ्या परिसरात खरीपाची पेरणी काढणी केल्यानंतर तथा रब्बीच्या पेरणीनंतर स्वत:ची जनावरे त्यात गायी, म्हशी, बैल यांची सोय व स्वत:ला रोजगार मिळावा म्हणून प्रथम अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर जवळ असणाऱ्या कारखान्यावर लोक सुरूवातीस येऊ लागले. त्या कारखान्याचे नाव बेलापूर साखर कारखाना असून त्यानंतर महाराष्ट्र किंवा परप्रांतात कोणत्याही ठिकाणी ऊसतोडणीसाठी गेले तरी ते बेलापूर असं म्हणतात. प्रत्यक्ष ऊसतोडणी म्हणजे बेलापूर जाणं असं ऊसतोड कामगार व इतर लोक समजतात. आई–बाप ऊसतोडीला गेले की मुलेही जातात आणि त्यामुळे अर्धी शाळा बुडते. त्यामुळे मुलांचे शिक्षण होत नाही. हीच मुले पुढे ऊसतोडणी

कामगार होतात. या संबंधी कैलास दौंड 'पाणधुई' मध्ये लिहितात.

''आई–बाप ऊस तोडायला जायचे. दिवाळीपर्यंत राम्या दररोज शाळेत जायचा. पुढे कारखाने सुरू होते. ऊसतोड कामगारांना कारखान्याचे पोट भरण्यासाठी ऊसतोडणीचे वेध लागत असत. गावात ट्रक येऊन उभा राही. त्याचे आई–बाप ऊस तोडायला निघाले की, त्यालाही सोबत घेवून जायचे असे हे बेलापूरला जाणे. प्रत्यक्षात ऊसतोडणीच्या कामासाठी ही माणसं आपण बेलापूरला जात आहोत असे म्हणत.'' [३] ऊसतोडणी करणाऱ्या कामगारांचे या समाजाचे हे वेगळेपण आहे. शेतकऱ्यांना पुरेसे उत्पन्न होत नाही. त्यामुळे त्यांच्या सामान्य गरजा पूर्ण होत नाही. पोटाला पोटभर मिळत नाही. आई–बाप, मुले ऊसतोडणीला तर म्हातारे आई–वडील किंवा लहान मुले शिक्षणासाठी गावाकडे असतात. म्हातारे आई–वडील व लहान मुलांचा सांभाळ करणे त्यांच्या सामान्य गरजा पूर्ण करणे या ऊसतोड कामगारांना शक्य होत नाही हे समाजाचं वेगळेपण आहे. ज्या परिसरात निसर्गावरची शेती आहे त्यांची हीच समस्या आहे. जलसिंचन नाही पर्जन्यमापन कमी असल्यामुळे यांना शेती पुरक व्यवसाय म्हणून ऊसतोडणीला जावे लागते.

२) ऊसतोड कामगारांचे कुटुंबजीवन

ऊसतोड कामगारांच्या साहित्यामध्ये ऊसतोड कामगारांच्या कुटुंबाच्या समस्या येतात. ऊसतोडणी हंगाम सहा महिन्याचा असतो. जून ते ऑक्टोबर/नोव्हेंबर पर्यंत ऊसतोडणीसाठी हे लोक जातात. स्वत:ची जबाबदारी पूर्ण करण्यासाठी मुलींचे विवाह कमी वयात होतात व मुलांचे लग्न केले की ऊसतोडणीला एक कामगार वाढतो. त्यासाठी मुलांचे विवाह बहुतेक प्रसंगी लवकर होतात. ऊसतोडणी कामगार लवकर आई–वडील झाल्यामुळे लहान मुलांना शाळेत पाठवण्याची सोय होत नसल्यामुळे ते मुलांना ऊसतोडणीसाठी बरोबर घेवून जातात. अल्पवयात मुलींचे विवाह होत असल्यामुळे मुलींना विविध प्रकारचे त्रास कुटुंबातून घडतात आणि त्यामुळे स्त्रियांवर पुरूष मंडळी संशय घेवून, दारूचे व्यसन करून मारहाण करतात. त्यामुळे कौटुंबिक जीवन अस्थिर होते. दिनकर जायभाये यांना 'हिरवा डोंगर' कादंबरीत मुकादमाकडून 'उचल' घेवून लग्न केलेल्या नव विवाहितेला दुसऱ्याच्या सांगण्यावरून सकुला मारलं जातं सखू भाऊ भावजय समोर सासऱ्याला सांगते.

''मामा आतापतुर ऐकून घेतलं. मी कुणासंग निघून गेले नवते. जनाराला तरी येका टायमाला जीव लावतं असं मव्हं केलं. त्यो निपुत्रीक सरपंच आलापासून सगळं बिघडलं. मला त्यांनी थळात मारलं होतं. मव्हं काय चुकलं होतं ? बिन गुन्याचं मारलं. ढोरासारखं मारलं असं मारणं असतं का '' ? [४] नवविवाहित मुलींच्या लग्नाचे

कर्ज फिटत नाहीत. तरी त्यांना मारहाण केली जाते. ऊसतोडणी करणाऱ्या स्त्रियांना विविध समस्यांना तोंड द्यावं लागतं.

स्थलांतरित ऊसतोड कामगार हे विविध राज्यात जातात. त्यांची ओळख केवळ कोणत्या मुकादमाने आणलेले आहेत अशीच असते. त्यांची नोंद कारखाने, शासन घेत नाही. त्यामुळे त्यांना कोणत्याही प्रकारच्या शासकीय सवलती मिळत नाही. ऊसतोड कामगारामध्ये मुलींचा घटता जन्मदर चिंतनाचा विषय झालेला आहे. 'प्रणाली' या विशेष अंकामध्ये डॉ.अशोक घोळवे यांनी 'ऊसतोड कामगारांचे हंगामी काम जूनपासून गावातच चालू असेत. ऑक्टोबर/नोव्हेंबर मध्ये हे लोक ऊसतोडणीच्या कामाला निघतात. या काळात या स्त्रिया गरोदर असतात. तीन–चार महिन्याचं गर्भ त्यांच्या पोटात असतो. वैधक शास्त्रानुसार या स्त्रियांना आराम व सकस आहाराची गरज असते.''[५] या महिलांना ऊसतोडणीमध्ये पुरूषांना सहकार्य, कष्टाची कामे करावी लागतात. त्यामुळे त्यांना आरोग्य सांभाळणे शक्य होत नाही. त्यातून गर्भपात होण्याचे प्रमाण खूप वाढलेले आहे. त्यामुळे निरोगी कुटुंब ठेवणे ऊसतोडणी कामगारांना शक्य नाही.

भास्कर बडे हे पाणकणसंमध्ये ऊसतोडणी कामगारांना कुटुंबाच्या कामासंबंधी ते लिहितात.

''महारिला पाणी जेमतेम म्हणून लोक बाजरीची काढणी झाली की ऊस तोडायला बेलापूरला जातात. बेलापूरला जाणाऱ्यात बहुधा अशिक्षितांचे प्रमाण जास्त. त्यांच्यासोबत लहान मुले वाढे गोळा करायला किंवा कोपी राखायला घेवून जातात.ज्या मुलांचं वय शाळा शिकण्याचं त्यांना अशी कामं करावी लागतात. बेलापूरला एकदा का तरणी जोडपी गेली की गावात म्हातारी माणसं उरतात.''[६] कोरडवाहू शेतीमुळे उत्पन्न नाही ऊसतोडणीला गेल्यामुळे मुलांच्या शाळेचा प्रश्न निर्माण होतो.त्यामुळे ऊसतोडणी कामगारांच्या मुलांची, आई–वडील यांचे प्रश्न, स्त्रियांचे प्रश्न यामुळे उद्ध्वस्त कुटुंब झालेले आहेत.

३) ऊसतोड कामगारांच्या कथनात्मक साहित्यातील निसर्ग

ऊसतोडणी कामगारांचे साहित्य हे शेतकरी जीवनाचे साहित्य आहे. ऊसतोडणीचे काम हे निसर्गाच्या सानिध्यात होते. त्याचे ऊसतोडणीचे काम करताना भावणारे निसर्ग,लेखकाच्या समोर येते. कैलास दौंड यांच्या 'पाणधुई' मध्ये ऊस तोडणारे कामगार कसे सकाळीच कामाला लागले त्या वातावरणाचे दर्शन ते असे घडवितात. ''सूर्य मव्हारायच्या आधीच ऊसाच्या शेतात खाट खाट असा ऊस तोडण्यासाठी मारलेल्या कोयत्याचा आवाज होऊन त्या आवाजानं रानात जाग यायची. झाडावरील पाखरांच्या पंखांची फडफड व्हायची. कोहक्या पक्षी 'कुही

ऽ कुही ऽ सुरू करायचे. सकाळच्या वाऱ्याची अंगावरून गेली म्हणजे शिरशिरी भरणाऱ्या हिवानं अंगावर काटा उभा रहायचा. तरीही तोंड सुरूच रहायची. रोज पुढे पुढे सरकारचा ''[७] ऊसतोडणी कामगार सकाळीच ऊसतोडणीच्या कामाला लागतात. ते सकाळीच निसर्गाच्या सानिध्यात पक्षाच्या आवाजाने मन खुलून निघतं याचं वर्णन येते.

योगीराज वाघमारे यांच्या 'धुराळा' कादंबरीमध्ये कादंबरीचा नायक सुदामाचे वडील शेतात जातात. त्या शेतातील निसर्ग वर्णन योगीराज वाघमारे करतात. शेतात एक विहीर आहे त्यांच्या आजोबाने खोदली होती. तिला पावसाळ्यात तेवढं पाणी असत. पुन्हा कोरडीठाक, विहिरीच्या कडेला दोन जांभलांची दोन आंब्याची अन् एक काट शिवारीचं झाड आहे. काट शिवारीचं झाड मोठंझालं असून फांद्या मात्र अशा तशा पसरल्या आहेत. शिवाय पिंपळाचं झाड ओढ्याच्या काठाला आहे. नाना झाडाखालून जाताना पानांची सळ सळ होतेय जणू झाड विचारतात कसं हाय नाना' किंवा पुढे लगेच योगीराज वाघमारे लिहितात.''एरव्ही गप्पाची गप्प असलेले नाना बांधावर आले की थोडे बोलके होतात. सात बायांच्या गलका त्यांना सहन होत नसतो म्हणून एक ढेकूळ हातात घेवून हलकेच भिरकावतात. बायली ; काय भाडंत्यात. सात बाया उडून जातात जांभलीला होला टोकटोक करीत असतो. पिंपळावरचं घुबड उगंच फडफडतं''[८] योगीराज वाघमारे शेतीतील निसर्ग दर्शन घडवतात.

ऊसतोडणी कामगार ग्रामीण निसर्गातील आहे. निसर्गाशी त्यांचा नातं आहे. त्या नात्यातून सातत्याने मन मोहरून टाकणाऱ्या निसर्गातील घटना प्रसंग याचा वेध ऊसतोडणी कामगारांचे लेखक ऊसतोडणी कामगारांचे जीवन यातनामय आहे. तरी त्यांना निसर्गाच्या सानिध्यात निसर्गाशी एकरूप व्हावं लागलते. शांता जोशी यांनी 'गव्हाणी' मध्ये सुशिलाच्या चालण्याचे वर्णन पुढीलप्रमाणे करतात. ''झाडाच्या सावली सावलीनं ती रस्ता पार करीत होती. बांधा–बांधानं ती रस्ता काढत होती. अखेर शेताचा बांध लागला. आंब्याला मोहोर आला होता काही फांद्याला छोट्या छोट्या कैऱ्या लागल्या होत्या. सणाला एखादी बाई नय सरी झुबे घालून सजावी तसं ते आंब्याचं झाड सजलेलं दिसत होतं.''[९] असं मनमोहक निसर्ग वर्णन त्या करतात.

ज्या निसर्गाच्या सानिध्यात ते रमतात तेथील निसर्ग झाडे त्यांच्यातील बदलतं निसर्ग हा त्यांच्या जीवनाचे अंग आहे.

ऊसतोडणी कामगारांच्या संबंधाने विविध प्रकारचे लेखन करणारे साहित्यीक भास्कर बडे यांनी सातत्याने निसर्ग चित्रण केलेले आहे. त्यांच्या लेखनातून सतत परिसर वास्तवातील निसर्ग त्याचा मानवी मनाशी असणारा

संबंध भास्कर बडे यांनी 'पाणकणसं' मध्ये पहिला पाऊस आणि पेरणीच्या वातावरणाचे दर्शन घडविले आहे. ते लिहितात.

''मिरूग निघाला चांगला धो–धो पडला. सगळ्या शिवाराला त्याने आंघोळ घातली. त्यामुळे सर्व शिवारभर पाळ्या सुरू झाल्या. शिवार यावं ऽ यावं ऽ नं गर्जू लागला.''[१०] मिरगाच्या पावसामुळे शेतकऱ्यांना शेतीची मशागत करून पेरणीची तयारी करावी लागते. पावसामुळे शेतकऱ्यांना आनंद होतो व ते पेरणीची तयारी करतात. परंतु पुर्वीसारखं खात्रीचं बियाणं नाही. पेरणीपासूनच शेतकरी फसवला जातो आहे. याचं प्रत्यक्षकारी चित्रण त्यांनी केलं आहे निसर्ग बियाने शेतकऱ्यांची फसवणूक करतात.

योगीराज बागूल यांनी 'पाचट' आत्मचरित्रातून ऊसतोड कामगारांचे अनुभव व्यक्त केले आहेत. लेखक, गाव परिसरात आई–बहिणीसोबत अनेकदा निसर्गाच्या सानिध्यात आला त्यांनी सांगितलेला अनुभव असा.

''आवंदा दादा ऊसतोडीला गेला नव्हता. कारण भिंगीच्या काकाचा मळा बटईनं धरला होता. नदीच्या कडाला मळा असल्यामुळे विहिरीला पाणी मुबलक होतं. दिवसभर मोटर चालली तरी विहीर उपसत नव्हती. खंडाळा ते भिंगीचा अर्धा रस्ता पांदीचा होता. शाळेला होळीची एक दिवस सुट्टी होती. गावात गनगन करीत फिरण्यापेक्षा दादानं मलाही भिंगीच्या मळ्यात आणलं. दादानं भाऊनं आई–बहणींना रक्त ओकेपर्यंत मेहनत करून मळ्याला बहरवलं होतं. गाजर, मिरच्या, मेथी, टमाटे, लसून, वांगे आणि आणखी बरंच काही माळवं केलं होतं.''[११] शेतीतील माळवं मनाला मोहरणारे चित्र ते उभे करतात.शेती निसर्ग यांचं नातं योगीराज बागूल यांनी खंडाळ्याचा परिसर निसर्ग वर्णन या आत्मकथनात केले आहे. जीवन व निसर्ग यांचा परस्पर संबंध आत्मकथनात येतो.

४) तयारी बेलापूरची (ऊसतोडणीला जाण्याचा निरोप)

ऊसतोडणी कामगारांची ऊसतोडणीसाठी कोणत्याही साखर कारखानासाठी जाणार असले तरी त्या जाण्याला किंवा कोणत्याही कारखाना हा बेलापूरला जाणे असे समजतात. कैलास दौंड यांनी 'पाणधुई' मध्ये या बेलापूर संबंधी ते लिहितात.

''खरं तर ऊस तोडायला कोणत्याबी कारखान्याला गेलं तरी लोक त्याला बेलापूरलाच गेला असे संबोधतात. कारण या भागातील लोकांची ऊसतोडणीची सुरूवात बेलापूर कारखान्या पासूनची आणि तो शब्दच मनात तोंडात तसाच घट्ट झालेला.''[१२] या ऊसतोडणीसाठी दरवर्षी दसऱ्याच्या ते दिपावलीच्या मधी ऊसतोड

कामगार हे तयारी करतात. मुकादम उचल देण्यासाठी व विविध गावांना भेटी देतात. ऊसतोडणी कामगार नव मुकादम किंवा जुन्या मुकादमापासून पैशाच्या स्वरूपात उचल किंवा मागील कर्ज आणि नवं कर्ज अन मुलींचे विवाह, बैल खरेदी, शेतात विहिर, नवं शेत घेण्यासाठी, मुलांच्या शिक्षणासाठी कर्ज घेतात.ऊसतोडणी कामगार तेच कर्ज वर्षानुवर्षे फेडतात. बैलगाडी घेवून जाणारे, जी तयारी करतात त्याचे चित्रण कथनात्मक साहित्यात आलेले आहे. सरदार जाधव यांनी 'कोयता' मध्ये या तयारीसंबंधी लिहितात, ''अजून उजाडलेलं नव्हतं, मायनं मले हलवून जागं केलं. मी भुताडावाणी उठून तिच्या तोंडाकडे पाह्यला लागलो. ति नं बोलताच पुना आपल्या कामाला भिडली. संगे जे जे घ्यायचं व्हतं ते ते भाईर गाडीत नेऊन ठेवीत व्हती.' समदे आपापल्या गडबडीत व्हते न बोलता मुक्यामुक्याच काम करीत व्हते. तोंड शिवल्यावाणी. दारी गाडीचा तट्याला कंदील टांगल्याला होता. वाऱ्यानं फडफड करीत व्हता. आमी बहीण भावंडं कुडकुडत वसरीत उभं ऱ्हावून किलकिल्या डोळ्यांनी पाहत व्हतो. म्हाताऱ्यानं मायला इच्चारलं. झाली का समदी वारसार गाडीत भरून पारबत्ती ?

माय घरात गेली. म्हाताऱ्याच्या पाया पडली. मंग म्हातारीच्या पाया पडली. मंग दादाच्या पाया पडली. तवर चंदरभागा काकू घरात डबलं घेवून आली. येकमेकींना हळद कुंकवाची बोट लावून झाल्यावर त्या दोघी बी एकमेकींच्या गळ्यात पडून रडाया लागल्या.''[१३] असं धीर गंभर वातावरण बेलापूरला जाताना सातत्यानं होतं. कारश किमान सहा महिन्यासाठी म्हातारे आई–वडील, शाळेत जाणारे मुले गावीच ठेवून हे ऊसतोडणी कामगार पर मुलखात जातात. अनेक संकटांना तोंड ऊसतोडणीसाठी निघणारे सर्व वेगवेगळ्या प्रकारचे होते. या संबंधाने 'कोयता' मध्ये लेखक लिहितो.

''कुणी लहान व्हतं. मह्या येवढं सहा सात वर्षाचं. कुणी तरणं ताठं कुणी म्हातारं. कुण्या पोरीचं नेमकं लग्न झालेलं, कुणी बाई पोटुशी त कुणी लेकुरवाळी''[१४] ऊसतोडणीसाठी विविध प्रकारचे लहान मुले, तरुण–म्हातारे, गरोदर, लहान मुलावाले असे सर्व प्रकारचे ऊस तोडणीसाठी निघाले होते.

'धुराळा' मध्ये योगीराज वाघमारे यांनी बेलापूरला निघालेल्या ऊसतोडणी कामगारांचे चित्रण पुढीलप्रमाणे करतात.

''होता होता सर्व गाड्या निघाल्या. पोर सोरं गाडीत बसली होती. मोठी माणसं एका बाजुनं चालत होती. दुसऱ्या बाजुनं बाया चालत होत्या. गावातली एकदाच एवढी माणसं कुठं तरी निघालेली पाहून कुत्रीही गाडी खालून चालू लागली. प्रत्येकाच्या घरात एखाद दुसरं माणूस मागं राहिलं होतं. बाकीच्या घराला कूलूपं लावलेली होती.

मोठ मोठं वाडे बंद झाले. उरली सुरली माणसं शिवेपर्यंत येऊ लागली.''[१५] ऊसतोडणीसाठी निघालेले लोक त्याची तयारी कशी होते याचं चित्रण त्यांनी केलं आहे.

दिनकर जायभाये यांच्या 'हिरवा डोंगर' हरितात्याचे दोन मुलं बेलापूरला निघाली होती. त्यांचा मोठा मुलगा जिजाबा हरीतात्या बरोबर बोलत होते. याचं चित्रण पुढील प्रमाणे.

''दादा मधी येखादा येळंस येईन. मधी कुणी आलं तं त्याच्याजवळ निरूप पाठून कमी जास्त कळवा. कोठ्यात पडून राह्याचं. तक् तक् करीत जाऊ नका. सकीची गाडी बेलापूरला गेली. जमलं तं तिच्याकडं जाऊन येईन. सवडीनं बघन येऊ का? सुकासुकी या परत. गुण्यागोविंदानेऱ्हा बुवा. हरीतात्यानं पोरं वाटं लावले.पिपरपहाडीच्या बरगाड्यानं दोघांच्या गाड्या निघाल्या. म्हाताऱ्या हरीतात्याचं डोळं वले झाले. म्हातारं येकटंच राहणार व्हतं. गाडीच्या मागं म्हैस, गाय जिजाबा, आन्सा हाकीत व्हती.''[१६] बेलापूरला जाणारे ऊसतोड कामगार अशा भावनिक नात्याने बांधले जातात. म्हातारी माणसं, लहान मुलं गावाकडे घर सांभाळणं लहान मुलांच्या शाळेसाठी थांबतात. तरणी, सुना, मुलं ऊसतोडणीसाठी पावसाळा सुरू होईपर्यंत जातात.

मराठी साहित्यात ऊसतोड कामगारांच्या अशा विविध प्रसंगी भावना प्रधान वातावरण तयार होतं. बेलापूरला वाटं लावणारे आई–बाप, मुलं–सुना एकमेकांची अशी काळजी घेतात, निरोप देतात. हंगामी कामगार म्हणून सहा महिन्यासाठी जातात.

५) मुकादमाचे साहित्यातील चित्रण

ऊसतोडणी कामगारांच्या कथा, कादंबरी, ललित लेखन व आत्मकथनामध्ये मुकादमाच्या संबंधी आलेले चित्रण हे ऊसतोड कामगारांना सातत्याने फसवणारा, स्वत:ची श्रीमंती दाखवून पैशाच्या बळावर मुजोर भाषा, कामगारांची सातत्याने फसवणूक करणे, राबवून घेणे हेच दाखवलेले आहे. साखर कारखानासाठी ऊसतोडणी मजुरांची भरती करणारा त्याच्या विविध अंगाने व्यक्तीमत्वाचे दर्शन घडते. भास्कर बडे यंच्या पाणकणसं मध्ये मुकादमाच्या व्यक्तीमत्वाचाचे दर्शन पुढीलप्रमाणे घडते.

''सगळेच मुकादम सारखे असत. पांढरं शुभ्र धोतर. पांढरा सदरा, डोक्यात टोपी, आत बंड्या त्याला चार चार खिसे. सदऱ्याच्या खिशात जाड डायरी. त्यात पेन, बोटात अंगठ्या, पायात बूट असा पेहरावा अन् ऐटीत बोलनं.''[१७] अशा पद्धतीचं राहणीमान म्हणजे कामगारांना श्रीमंती दाखवायची आणि त्यांना पाहिजे त्या पद्धतीनं राबवून घ्यायचं.

दिनकर जायभाये यांच्या हिरवा डोंगरमध्ये मुकादमाच्या संबंधी ते लिहिता.

''भानुदास मुकादम दिसायला गायीच्या वाणाचा व्हता.'' पण आतून लई कावेबाज व्हता. सकीच्या लग्नाला पैसे दिले व्हते पण त्याच्यावर व्याजापेक्षा जादा खाल्लं व्हतं. हरी तात्या पडला इमानदार. येळंला मदत केली ना? मग त्याला धोका द्यायचा नाही''[१८] मुकादमाच्या सांगण्याप्रमाणे वाघणारे ऊसतोड कामगार सतत कर्जात असतात.

ऊसतोडणी कामगार म्हणजे इमाने इतबारे काम करणारा पण आर्थिक अडवणूक करणे हे काम या मुकादमाचे सर्व सामान्यांची पिळवणूक करणे हे काम त्यांचे आहे.

शांता जोशी यांच्या 'गव्हाणी' मध्ये मुकादमाचे चित्र पुढीलप्रमाणे आलेले आहे. ''पांढरी शुभ्र पौरण, पांढुरा कुरता, डोक्यावर पांढरी टोपी, हातात घड्याळ, बोटात अंगठी, तोंडात पान, मध्यम उंचीचा अंगात लठ्ठ भिरभिरती नजर असलेला मुंकीदा मुकादम दहा वर्षापासून हे काम करत होता. कारखान्याकडून एकदम एक लाख रूपये घेऊन दहाच्या गटाला उचल देवून कामातून पैसे वजा करून घेत होता. शिक्षण सातवी पास पण अनुभवानं तो हिशोब आपल्याला पाहिजे तसे बरोबर करत होता. ग्रामीण भागातून येणारे हे ऊसतोड कामगार जवळ जवळ निरक्षर भाबडे अगतिक होवून आलेले. दुष्काळामुळे जमीन सोडून आलेले, कोणी लग्नासाठी कर्ज झाले म्हणून आलेले, डोक्यात कर्ज फेडीचे स्वप्न घेवून आलेले, परत गावी जाताना स्वप्नभंगाचे दु:ख घेवून परतणारे हे कामगार मुकादम मुकिंदा मात्र वरचेवर पैसेवाला झाला होता. मोटरसायकलवरून फिरत होता. कुठं नवं पाखरू दिसलं की जाणं येणं वाढवत होता. पैसे दिल्यासारखं ढिल दिल्यासारखं दाखवत होता.'' [१९] अशा पद्धतीने ऊसतोड कामगारांना गुलामाप्रमाणे वागवणारा मुकादम चित्रीत झालेला आहे. अशिक्षीत कामगारांना सतत लुबाडणारे मुकादम आहेत. रामभान दवंगे यांच्या 'प्रहार' कादंबरीत विविध प्रकारचे गुन्हे करणारा किळसवाणे पात्र चित्रीत झालेले आहे.

ऊसतोड कामगाराने मुकादमकी केलेली असेल तर त्यांना मात्र अपयश आलेले आहे. कारण सामान्य ऊसतोड कामगार मुकादमकीमध्ये स्वत:चीच फसवणूक बडवणूक झालेली आहे असे दिसते. सरदार जाधव यांच्या 'कोयता' तील निवेदक म्हणतो.

'दादा गावी गेले, माणकू घरीच होता. बायको नांदायला येत न्हाई म्हणाला. बायको येत नाही मंग मी येकटा कसा करणार? म्हून ऊसतोडीला येत नाही म्हणला. मग दादा म्हणाले की, घेतलेले अगाऊ पैसे तरी दे.

तं बहाद्दर म्हणाला त्या पैशाचे बायकोला दागिने केले होते ती हे दागिने घेऊन गेलीया. तवा मझ्याजवळ काई सध्या पैसे न्हाईत जवा येतील तवा थोडे थोडे करून देऊन टाकीन.''[२०] ऊसतोडणी कामगारातून निर्माण होणाऱ्या नव्या मुकादमाची फसवणूक ऊतसाड कामगार करतात. ऊसतोड कामगारांची मुकादम होताना फसवणूक होते याचे दर्शन साहित्यात घडते.

६) कथनात्मक साहित्यातील आंदोलने / लढ्याचे स्वरूप

ऊसतोड कामगारांचे कथा, कादंबरी, ललित लेखनातून ऊसतोड कामगारांची आंदोलने, लढे, राजकीय नेते यांची भाषणे व शिकलेला ऊसतोड कामगार जागृत झालेला आहे. ऊसतोड कामगारांना आपल्या मागण्या, हक्क, अन्याय, अत्याचार, फसवणूक याची जाणीव होऊ लागली आहे. ऊसतोडणीचा हंगाम सुरू होण्याच्या पुर्वी प्रत्येक वर्षी ऊसतोड कामगार, मुकादम, वाहतूक, मालक आपल्या मागण्यासाठी चक्का जाम, कोयता बंद असे प्रत्येक वर्षी आंदोलने होतात. परंतु कोणत्याही प्रकारचा फायदा न होता राजकीय हस्तक्षेपाने ही आंदोलने संपवली जातात. कादंबरी वाङमयातून या आंदोलना अभिव्यक्ती मिळालेली आहे. आंदोलनाचे नेतृत्व करणारे नेते हे साखरसम्राट, आमदार, खासदार, साखर कारखान्याचे अध्यक्ष झालेले आहेत. हार्वेस्टरच्या माध्यमातून ऊसतोडणी झाली तरी या नेत्यांना त्याचे काहीही वाटणार नाही. कारण ते ऊसतोड कामगारांचे खरे नेते नाहीत. कैलास दौंड यांच्या 'पाणधुई' मध्ये या संबंधीचे चित्रण येते ते असे.

''ऊसतोडणी कामगारांचे नेतृत्व करता करताच त्यांनी स्वत:चा कारखाना उभा केला होता. इतकेच नव्हे तर दोन–चार मुकादमांना पहिल्याच वर्षी किरकोळ कारणावरून एका खोलीत कोंडून मारलं होतं. तेव्हापासून त्यांच्या ऊसतोडणी कामगारांचे पुढारी हे बिरूदही गेल्यासारखंच झालं होतं. ''[२१] ऊसतोडणी कामगारांवरचा विश्वास आता कमी होऊ लागला आहे.

ऊसतोडणी कामगारांचे नेतृत्व करणारे दुसरेच असल्यामुळे ऊसतोड कामगारांचा केवळ आंदोलन करणे, त्यांच्याकडूनच वर्गणी गोळा करणे, त्यांनाच फसवणे, त्यांच्यावर आलेले संकट, झोपड्या जाळणें, बैल–माणसांचा मृत्यु होणे याचे केवळ राजकारण होते. केवळ भाषण देणे थोड्या दिवस बंद आणि कामगारांचा अगतिकता म्हणून पुन्हा त्यांना काम करावे लागते.अशा प्रसंगी हे नेते काही वाईट घडल्यास नंतर येतात. दिनकर जायभाये यांच्या 'हिरवा डोंगर' मध्ये अशा पुढाऱ्याच्या आगमनसंबंधी पुढील वर्णन आलेले आहे.

''कोप्या जळाल्यानं दोन दिवसाच्या अंतराने येक जिपकार थळातून गटात आली. त्यातून पांढऱ्या फॅक

कपड्यावाले पुढारीवानाचे लोक खाली उतरले. त्यांच्यातला मुकादम आणि गवळवाडीचा सरपंच दोघंच ओळखू आले. भानदास मुकादमानं साऱ्या गाडीवानाला येका ठिकाणी बोलीलं'' [२२] ऊसतोडणी कामगारांकडे आलेले स्वयंघोषित नेत्याचे स्वागत होते. त्यांची भाषणं होतात. येणाऱ्या नेत्यांचा परिचय होतो. दिनकर जायभाये यांच्या हिरव्या डोंगर मधील नेते पुढीलप्रमाणे भाषण देतात.

''माझ्या ऊसतोड कामगार बंधुंनो, मला दु:ख होतंय त्ये तुमच्याकडं आणि तुमच्या मुलाबाळाकडं बघून. कोप्या जळाल्या त्यात तुमचं नुकसान झालं. संसार उघड्यावर पडल्ये. त्यात तुमचे लेकरं जळाली तरी कारखानदारानं बघितलं न्हायी, तव्हा मी आपल्या इनंती करतो की, जोपर्यंत आपुण आपला विळा–कोयता बंद करत नाही तव्हर या साकर सम्राटाला आपलं ध्यान यायचं न्हायी, मला माहितंय खात्रीय की तुम्ही मागण्या मान्य होवूस्तर विळा–कोयता बंद ठेवताल.'' [२५]

ऊसतोड कामगारांच्या भावनांचा विचार करून सर्वांनी बंदमध्ये सहभागी होण्याचं सांगून काही मागण्या मांडल्या जातात. ऊसतोड कामगारांचा या पुढाऱ्यावर भरवसा नाही. कारण ते सर्व पैसे घेऊन शांत होईल व ऊसतोड कामगारांची फसवणूक होईल आसं या ऊसतोड कामगारांना खात्री असते. कामगारांमधील सामान्य कामगारांना आपला काही तरी फायदा होणार अशी अशा धरतात. यानंतर पुढारी हॉटेलमध्ये घुसतात त्यांचं चित्रण पुढील प्रमाणे

''जीप निघाली बघता बघता दिसेनाशी झाली. लोक नव्या उभ्या कोप्यात आपल्या चिल्या–पिल्यासह खुशीत पडली व्हती. कारण आपला आता लई फायदा व्हणार, एकदाच पैसा आल्यावर काय करायचं? याचा विचार करीत व्हत्ये.

बऱ्याच अंतरावर जीप आल्यावर ऊसतोड कामगार नेत्यानं जीप येका आलीशान हाटलात पुढं लावली. हाटलात सारी सोय व्हती मुकादम, सरपंच नेता आत घुसले.

हॉटेलवाल्यानं नमस्कार केला. साहेब आपली काय सेवा करू कोणती ब्रॅण्ड पाठवू''

साऱ्यात स्टॅण्डर्ड आसन ती पाठव आज खूपच थकलोयत. जेवण पेशल चिकन पाठवा जरा चमचमीत बनवा. ''[२४]

ऊसतोड कामगारांचे नेते असे ऊसतोड कामगारांच्या पैशावर मजा करतात. त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेवून त्यांच्या भावनाशी खेळतात. ऊसतोडणीच्या संप, बंद यावरून ऊसतोडणी कामगार यांचे आपसात वैर

भांडण होतात.

डॉ.नारायणराव मुंढे यांच्या मागे फिरा पतंगांनो या ललित वाङमयाच्या पुस्तकामध्ये त्यांनी असंख्य विषय घेतलेले आहेत. या पुस्तकातून ऊसतोड कामगारांच्या सर्वांगीण प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला आहे. 'पाहणी दौरा' या प्रकरणात कारखान्याच्या मजुरांच्या वस्त्यांना भेटी देणे, मिळणारे मजुरांचे पे बिल पाहून काय मजुरी मिळते हे तपासणे. त्यांना कारखान्याकडून घरे, पाणी, शाळा, दवाखाने, स्वस्त धान्य दुकान इ. सर्व सोयी उपलब्ध आहेत काय ? या सर्व प्रश्नाची पाहणीतून ऊसतोड कामगारांच्या वास्तवाचे चित्रण त्यांनी केले आहे. त्यातील काही भाग पुढीलप्रमाणे. नेत्यांची भाषणे होतात.

''मित्रहो, गेल्या पन्नास वर्षापासून ऊस तोडणारे तुम्ही तुम्हाला कायद्याचे काही संरक्षण आहे काय ?'' ''तुम्हास एकाच वेळी २५ हजार रूपयाचे आमिष दाखवून तुम्हाला सहा महिन्यासाठी गुलाम केले जाते. हे पैसे दहा दहा वर्षे फिटत नाहीत. जन्मभर तुम्ही गुलाम होतात. एकदा ऊस तोडणारा मजूर मरेपर्यंत ऊसच तोडतो ते तुम्हास अनुभवास येते.''

''मित्रहो, रोजगार हमीत फक्त ६ तास काम करावे लागते. तेथे १८ तास काम करूनही तुम्हास त्यांच्या इतकी रोजंदारी पडत नाही. गाडी, बैल त्यावर असणारे ४ माणसे यांना कमीत कमी ५०० रूपये रोज पडावयास पाहिजे तो पडतो काय ?'' [२५] मागे फिरा पंतगानों मधून डॉ.नारायण मुंढे यांनी या ललित लेखनातून ऊसतोड कामगारांच्या विविध समस्यांचा वेध घेतलेला आहे. सामान्य ऊसतोड कामगार याठिकाणी गुलामाप्रमाणे कसा वागवला जातो. ऊसतोड कामगारांच्या स्त्रिया, मुले, शेतकरी, त्याचे आई–वडील यांच्या समस्या विविध अंगाने त्यांनी मांडल्या आहेत. बीड परिसरातील कामगार इतरत्र गेला आहे त्यांचे संशोधनाबरोबर वाङमयाच्या पातळीवर त्यांनी संशोधन केलेले आहे.

७) ऊसतोड कामगारांचा साहित्यातील विद्रोह, अवहेलना

ऊसतोड कामगारांना त्यांचा संताप, अपमान, नकार, विद्रोहातून त्यांची अवहेलना झालेली सहजपणाने व्यक्त होते. ऊसतोड कामगारांचे शोषण, अपमान सातत्याने होते. त्यांना ज्या भागात हे लोक ऊसतोडणीसाठी जातात तेथील लोकांना हे उपरे, परके असल्याची भावना असून हे ऊसतोड कामगार आम्हीही शेतकरी कोणत्या तरी गावचे वतनदार असून केवळ परिस्थितीमुळे ऊसतोडणीसाठी यावे लागते असा विचार कथनात्मक साहित्यातून आलेला आहे. ऊसतोडणी कामगार हे उपरे असावेत अशा प्रकारची अवहेलनात्मक चौकशी ज्या परिसरात लोक

ऊसतोडीला जातात तेथील विविध प्रकारच्या चौकशा करतात. या संबंधीचे चित्रण दिनकर जायभाये यांच्या हिरवा डोंगर मधील ऊसतोडणी कामगारा बरोबर पुढील चर्चा होते.

''जिजाबानं गायी म्हशीला पाणी पाजलं, भेले टाकले, बिडी काडीसाठी दुकानावर गेला.

''का हो आपण कोणत्या भागातले ?

आम्ही बीडाकडले''

तुमच्या जिल्ह्यातले लई लोक ऊस तोडत्येत

तुमाला शेती नाही का ?

शेत हायतं पण माळरानाची शेती. तुमच्यावाणी पाट पाण्याची सोय नाही. पावसाचं ह्यो असं कव्हा पडतो तं कव्हा न्हायी. मंग प्वाट भराया करता काम केलं पायजी''

कोण आपण ?

मला समजलं न्हायी मी जिजाबा

नाही म्हणजे आपली जात ?

का ? सोयीरपण करायचं का ?

नाही सहज विचारलं

आमच्याकडल्ये सगळ्या जातीचे लोक होत तुम्हाला कुणंच्या जातीचे पायजीत.

मराठा, वंजारी, प्वाटाला काम करायचंय म्हणल्याव त्याची जात असती का ?'' [२६] असे प्रश्न ज्या भागात ऊसतोडणी कामगार जातात त्यांना हेच विचारले जाते.ऊसतोडणी कामगारांना विविध भागातील लोक अवहेलनेच्या भावनेने असे प्रश्न विचारतात. कष्ठ हीच जात असते. या विचाराने हे लोक काम करतात.

सरदार जाधव यांच्या 'कोयता' मध्ये ही अशीच निवेदकाने त्यांच्या वडिलांचा प्रसंग असा 'हातावर पोट' घेवून निघालेली माणसं हावोत आमी गावाकडे आमच्या हायीत सोताच्या जमिनी पण पाण्या पावसाबिगर पडिक पडल्या बरवाड पडलींना येऊन मड्यावर म्हून निघालोय. तुमच्या सारख्या बागायतदारांच्या शेतावर चाकरी करायला गावाकडे काम न्हाईत. म्हणलं मिळाली काई कामं तरी बी आज हाये उद्या न्हाई अशी आता ही तोडणीची कामं अशी असत्यात ना की येऊ पुरा हंगाम करायला मिळतो. वर आपल्यासोबत आपली थोरं, बाळ, ढोरं, वासरं सांभाळता येण्याची सोय असते. अन् अजून गावातली जीवाभावाची मान्सं बी संगे असत्यात म्हून ही तोडणीचं

कामं करायला बरी वाटतात. आता तेवढ्यासाठी माय मुलूख सोडून ऱ्हावं लागतं. हो मातर खरं हा अन् ऱ्हावंच लागतं. मन मारून का होईना ऱ्हावं लागतं. कारण घरी जावून बी काय हाये ? ऑ आमीत हो शेतकरी असून बी इकल्या गेलोय इकडं'' [२७] निवेदक मनातील अगतिकता व्यक्त करतो.

ऊसतोड कामगारांना ऊसतोड सातत्यानं तुमच्याकडे काम नाहीत का आपण कोणत्या जातीचे असे अवहेलना, अपमान करणारे प्रश्न सातत्याने विचारले जातात. त्यातून ऊसतोड कामगारांच्या मनात विद्रोह निर्माण होते. ऊसतोड कामगार हे कारखानदारी, ऊस बागायतदार यांच्या संबंधाने या व्यवस्थेच्या विरोधात विद्रोह व्यक्त करतात.

भास्कर बडे यांनी 'पाणकणसं 'मध्ये शेतकऱ्यांना आर्थिक नाडी कारखानदारांच्या हातात गेल्यामुळे मनात आलेला भाव निवेदक पुढीलप्रमाणे व्यक्त करतात.

''माझी नजर कारखान्याच्या चिमणीकडं गेली. त्यातून बका बका धूर बाहेर पडत होता. तो धूर नसून गोरगरीब उचलीवाल्याचं रक्त धूर होवून बाहेर पडत होतं. पाहून वाईट वाटत होतं. पण आर्थिक नाड्या कारखानदारांच्या हातात एकवटल्यामुळे एकटा दुकटा माणूस गपगार बसत होता.'' [२८]शेतकऱ्यांना, कामगारांना सातत्यानं या व्यवस्थेत गुलाम केलं आहे. त्यामुळे या लोकांना स्वत:चा विकास, उन्नती स्वत: करावी लागणार. त्यामुळे या लोकांची सातत्याने अन्याय झाल्याची भावना व्यक्त होते. कारण सामान्य माणूस असंघटीत असून त्यांच्या उठाव करण्याची क्षमता नाही.

८) ऊसतोड कामगारांच्या कथनात्मक साहित्याची भाषा

मराठी साहित्यामध्ये १९७० नंतर समाज जीवनातील आतापर्यंत दुर्लक्षीत सर्व समाज आपल्या व्यथा, वेदना दु:ख अनुभव व्यक्त करू लागले. ऊसतोड कामगारांचा अनुभव साहित्याच्या माध्यमातून व्यक्त झाला. या ऊसतोड कामगारांच्या प्रादेशिकतेचा विचार करता बहुतेक ऊसतोड कामगार मराठवाड्यातील आहेत. त्यामुळे श्रीराम गुंदेकर, भास्कर बडे, सरदार जाधव, दिनकर जायभाये, योगीराज बागूल यांची लेखन भाषा मराठवाड्यातील आहे. त्यामुळे या लेखनातील बहुतेक शब्द मराठवाड्यातीलच आहेत. सरदार जाधव हे औरंगाबाद जिल्ह्यातील आहेत. या परिसरात जलसिंचन नाही. कोरडवाहू शेती या परिसरात असल्यामुळे ऊसतोड कामगार या परिसरात भरपूर आहेत. 'कोयता' कादंबरीतील भाषाही पुढीलप्रमाणे आहे.

''त्येनं वानात आल्याला पपया तोडून आणल्या अन् चिरून खापा केल्या. आमी पपया खायाला लागलो.

पपया अजून गाभूळ्या व्हत्या. म्हून चिकाळ चिकाळ लागत व्हत्या. वढ धूनधून करायला लागले.'' [२९] अशी साधी सरळ बोली भाषा या कादंबरीतून व्यक्त झालेली आहे.

योगीराज बागूल हे 'पाचट' ऊसतोडीच्या कामावरील दलित कुटुंबाचं चित्रण करणारं अत्यंत महत्वाचं आत्मकथन आहे. या आत्मकथनाची भाषेच्या संबंधाने 'सांस्कृतिक महाराष्ट्र १९६० ते २०१० या भाग १ मध्ये 'मराठी साहित्याची भाषा' या अनुषंगाने भाषेच्या संबंधाने पुढील चित्रण आलेलं आहे.

''योगीराज बागूल यांच्या 'पाचट' आत्मकथनात ऊसतोडीच्या कामावर लागलेल्या दलित कुटुंबाचे चित्रण आहे. निवेदनात प्रमाण आणि नाशिक व औरंगाबाद या जिल्ह्याच्या सीमांच्या लगतच्या वैजापूर परिसरातील बोली आलेली आहे. लेखकाने आपल्या गावाविषयी लिहिले आहे. 'खंडाळा' हे अंदाजे सात–आठ हजार लोकवस्तीचे गाव. औरंगाबाद–नाशिक मार्गावर वसलेलं अर्ध गाव मुस्लीम वांधवाचं समाजातील बऱ्याचशा जाती गावात राहतात. या आत्मकथनात आलेले बोलीतले काही शब्द

थळ: तोडणी चालू असलेले ऊसाचे शेत

वाढे : ऊसाच्या शेंड्याकडील हिरवा पाला

तऱ्हाळली: तहानली

टिपड:– तेलाची रिकामी लोखंडी टाकी

खवडव: नसदी उठाठेव

बल्गर : गव्हाच्या जाड भरडा

हावार : सपाट

रहाळ परिसर

चाण्या: बोटभर चिरून वाळवलेले मासाचे तुकडे

मुरथडून चरून : पडतानं पडीक शेतात चाव चोचलेपणा

शेवडी : डोंगराच्या दरीत खोदलेली लहान विहीर'' [३०] या वरून योगीराज बागूल यांच्या पाचटची भाषाचे स्वरूप लक्षात येते.

ऊसतोड कामगारांचे अत्यंत महत्वाचे लेखक भास्कर बडे यांनी कथा, कादंबरी, बाल कादंबरी असे विविध वाङमय प्रकार लिहिले असून त्यांच्या लेखनात बीड जिल्ह्यातील शिरूर, पाथर्डी या परिसरातील लोकांची

भाषा आलेली आहे. भास्कर बडे यांच्या अंजीमाय या बाल कादंबरीतील भाषाचे नमुने पुढीलप्रमाणे आहेत.

''मुकादम मपला काय दोष मझा वाट्याला आलेय. बैल बिल कायबी नाय: अस्लं घडलं म्हून मझा खर्चाने गावाकडं नेऊन सोडतो.'' ''सत्ताचा माणूस गेलाय तिथं बैलाचं काय घेवून बसलाा'' भगवान समजुतीनं म्हणाला.

कोपीतले सामान बांधले, जीपमध्ये कारभाऱ्याचा देह ठेवला. जीपवरती सामान बांधलं, कोप्यावरून जीप केंद्रेवाडीच्या रस्त्याला लागली.''[३१] सरळ साधी भाषा अभिव्यक्त होते.

भास्कर बडे शिरूर परिसरातील असून त्यांची भाषाही उच्च स्वरात बोलणारे. बोलण्यातून सहजपणाने एकेरी व बोलण्यातून शिव्यांचा वापर करणारांचे प्रमाण भरपूर आहे. वरीलप्रमाणे भाषेचा उच्चार केला जातो. मराठवाड्याची भाषा प्रादेशिक भाषा म्हणून ऊसतोडीच्या लोकांची भाषा ही बीड परिसरातील असते. कारण बहुतेक ऊसतोड कामगार बीडच्या परिसरातील आहेत. भास्कर बडे यांच्या पाणकणसं मध्ये पुढील म्हणींचा वापर केलेला आहे.

''म्हणते ना खाली मुंडी न पातळ धुंडी (पृष्ठ ४६)

पैसा फेको तमाशा देखो (पृष्ठ ५८)

वाळूत मुतलं फेस ना पाणी (पृष्ठ १३०)

गरजवंताला अक्कल नसते (पृष्ठ १४१)

तुव्हं मव्हं पटेना ना, तुझ्या बिगर करमेना (१४२)

आडला नारायण गाढवाचे पाय धरी – १४३ ''[३२]

भास्कर बडे ग्रामीण ऊसतोड कामगारांत बालपणापासून वाढलेले असल्यामुळे त्यांनी ग्रामीण ऊसतोड कामगारांच्या समाजजीवनाशी एकरूप झाले आहेत. वरील म्हणींचा त्यांनी लेखनात वापर केलेला आहे.

कैलास दौंड यांच्या 'पाणधुई' मध्ये म्हण आहे ती पुढीलप्रमाणे.

''ड्रायव्हरला दिला आसरा अन् नातं गोतं सारं विसरा'' [३३] कारण ट्रक ड्रायव्हर यास जवळ केल्यास त्यांच्यावर विश्वास ठेवू नये. अशा म्हणींचा वापर झालेला आहे. कथनात्मक साहित्यातून झालेली आहे.

९) ऊसतोड कामगारांच्या कथनात्मक साहित्यातील लोकवाङमय:

ऊसतोड कामगार शेतकरी असून पारंपारिक जीवन जगणारा समाज आहे. लेखक, हे ग्रामीण भागातील असल्यामुळे लोकवाङमय याचा त्यांनी कथनात्मक साहित्यात वापर केलेला आहे. त्यात लोककथा, लोकगीत,

ओवीगीत, भलरी गीत यांचा वापर केलेला आहे. लोकवाङमयामुळे कथनात्मक साहित्याच्या अभिव्यक्तीला सौंदर्य प्राप्त होऊन हे कथनात्मक साहित्य आणखी चांगल्या पद्धतीने अभिव्यक्त झालेले आहे. दिनकर जायभाये यांच्या 'हिरवा डोंगर' कादंबरीत एक भलंरी आलेली आहे ती पुढीलप्रमाणे.

''भलं रं तुझी भलं रं काम करी दादाभलं'

कष्ट आमचं इमान

हात उचला जोमानं

न्हाई बेईमानी करणार

भलं रं तुझी भलं रं ।।१।।

आमी कष्टाचं काणार

आमचा कोयत्याला जोर

असे ऊस तोडणार

भलं रं तुझं भलं रं ।।२।।

मन ऊसाचं पेरं

अशी भरली साकरं

न्हायी कश्याचा घोर, भलं रं तुझी भलं रं ।।३।।

ऊन वारा सोसणार

हरकानं गाणं गाणार

आरूळी वाल्या वाघा झोपला का ? ।।४।।'' [३४]

ऊसतोडणीचे काम करणारे कामाच्या श्रमपरिहार होण्यासाठी तसे काम लवकर होण्यासाठी भलरी गीत गातात. त्यांच्या इमानदारी कष्ट आणि ऊसाचे गुण गायन करीत भलंरी गातात. पुढे एकाने म्हटलं की दुसऱ्याने मागे म्हणावे अशी भलंरी गातात.

शांता जोशी यांची 'गव्हाणी' कादंबरी ही बालशिक्षण आणि स्त्रियांच्या व्यथा मांडणारी आहे. पोरीच्या जातीवर ओवी दिलेली आहे. ती ओवी पुढीलप्रमाणे आहे.

''लेकीचा ग जलम घातला कुण्या येड्यान

सखे माझी मैनाबाई बैल राबती भाड्यानं ।

सखी टाकीती अक्षर बरम्या दावितो तातडी ।

बाईच्या नशिबाची रेघ पडली वाकडी ।

भतरिचा त्यो गं राग जसा इस्त्याचा इंगोल।

सावळे गं बाई माझे त्याची मरजी सांभाळ ।''[३५]

या ओवी गीतामधून लेकीचा जन्म म्हणजे कोणत्या वेड्यानं घातला आहे. भाड्याच्या बैलाप्रमाणे सातत्याने स्त्रियांना राबावे लागते. मुलीच्या नशिबाची रेषाही वाकडी पडलेली आहे. नवरा सातत्याने रागावतो त्याची मर्जी सांभाळण्याचं असं सल्ला या गीतामधून व्यक्त झालेला आहे.

सरदार जाधव यांनी 'कायता' कादंबरीत त्यांची मावशी गावात दिलेली होती. तिचा संदर्भ आई दळण दळताना ओवीमध्ये कशी म्हणायची याचं दर्शन पुढीलप्रमाणे दिले आहे.

''दुक मव्हं सुक शेजी चढना उमट ।

गावातच बहीण देली, घटल्या पाय वाटा।। ''[३६]

स्त्रियांना सातत्याने कष्ट करावे लागतात. कितीही काम केलं तरी सुख दिसत नाही. दुसरी बहीण गावातच दिलेली आहे. सुरूवातीचं जाणं येणं आता राहिलेलं नाही. अशी अभिव्यक्ती गीतामधून झालेली आहे.

कायत्या कादंबरीत पृष्ठ २० वर धिंड्याची गोष्ट, निवेदकाची आई सांगते. जावाई भोळसर, सासूरवाडीला गेला तेथे धिरडे सासू करते पण धिरडे न आवडल्यामुळे बायकोला मारतो. शेजारीन धिरड्याचं नाव घेत व नवऱ्यास धिरड्याची आठवण येते. योगीराज बागूल यांनी त्यांचं 'पाचट' हे आत्मकथन ऊसतोड मजुरांच्या अनुभवावर लिहिलं आहे. या आत्मकथनातून त्यांनी त्यांच्या बालपणाच्या आठवणी, १९७२ च्या दुष्काळाच्या आठवणी व्यक्त केल्या आहेत. पूर्वी गावात वीज नव्हती. आलेली वीज बऱ्याच वेळेस जात असे. तेव्हा योगीराज बागूल यांची आई घरीच दळण जात्यावर दळत असे. आईच्या पोटात अन्नाचा कण नव्हता. पहिल्या हुशीत गरागरा पाच सात गरके दिले मग जातं जड जावू लागलं ती ओवी पुढीलप्रमाणे.

''दळण दळिते पहिला घास जात्याला

जात्याला नाही गं बाई माझ्या जलम देत्याला ।

शाळीत जायाला रडू कशाचं रे येतं

येवगीराजा माझ्या वझं दप्तराचं होतं ।

नारखेड्याच्या वाटा लस फुपाटा मातला

हासराज बाळ माझा असा कावडी नाचला ।

रानावनात नको येऊ रे चिवंदाडीया

लाडाच्या बाळा माझ्या काटा मोडलं सवंदाडिचा (३६) पृष्ठ क्र.८५

योगीराज बागूल यांची आई वास्तव जीवन ओवी गीतामधून गात असे. या आपले मुलं गाव परिसर त्यांच्या वास्तव जीवन गीता माध्यामातून व्यक्त करते.

मराठी ऊसतोड कामगारांच्या साहित्यात लोक वाङमय अभिव्यक्त झालेलं आहे हेच त्यांच्या जीवन जगण्याचा भाग असतो. त्यांचं लोकजीवन या ओवी गीतांमधून व्यक्त होते. किंबहुना ऊसतोडणी कामगारांच्या साहित्यात त्याला महत्व आहे.

१०) ऊसतोड कामगारांचा कथनात्मक साहित्यातील समस्यांचे चित्रण

ऊसतोड कामगारांच्या साहित्यामध्ये ऊसतोड कामगार, शेतकरी, शेतमजूर असून त्याच्यावर अवलंबून असणारे त्यांची पत्नी, मुले, त्यांचे आई–वडील या सर्वांना सातत्याने समस्यांना तोंड द्यावे लागते. या लघुशोध प्रकल्पामध्ये स्त्रियांच्या समस्यांवर स्वतंत्र प्रकरण लिहिले जाणार असून या प्रकरणामध्ये स्त्रियांच्या समस्याकडे केवळ निर्देश केला जाणार आहे.

ऊसतोड कामगारावर सर्वप्रथम लघुकथा लेखनातून ऊसतोड कामगारांच्या समस्या प्रारंभी श्रीराम गुंदेकर यांनी कथामधून मांडल्या आहेत. 'उचल' कथा संग्रहामधून ते ज्या कुटुंबात समाजात जन्मले त्यांच्याविषयी अनुभव चिंतन त्यांच्या कथेचा विषय झाला आहे. १९८० नंतरची ग्रामीण कथा या डॉ.मनोहर सुरवाडे यांच्या संशोधनात्मक वरील ग्रंथात श्रीराम गुंदेकर यांच्या कथा संबंधी काही निरीक्षण नोंदवलेली आहेत. श्रीराम गुंदेकरांची कथा बेकारी, दारिद्रय, भ्रष्टाचार, शोषण यावर प्रकाश टाकते आणि खेड्यातील शेतकरी, शेतमजूर ऊस कामगार यांच्या शोषणाच्या व बंडखोरीचा उद्‌गार काढते. यासंबंधी डॉ.मनोहर सुखाडे लिहितात. ''उचल' या संग्रहातील 'कोयतेवाले' कथेत ऊसतोडीची काम करणाऱ्या मजुरांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. त्यांच्या वस्तीला आग लागून त्यांचा तोडका मोडका संसार जळून खाक होतो. ऊस तोडताना एका स्त्रीला विळा लागून भडाभडा रक्त वाहते. याची दखल कोणी घेत नाही. उलट मुकादम लेकुरवाळ्या बायांना मुलांना स्तनपात करू देत नाही.ते

मूल रडून अर्धमेलं होवून मरतं. ट्रक पहारा करणाऱ्याच अपघात होतो. एक स्त्री ट्रकखाली चेंगरून मरते. ट्रक वाले कोयत्या वाल्याच्या मुलींना फसवून लूटतात. अशा कितीतरी प्रश्नांनी त्यांना ग्रस्त केलेलं असल्याने त्यांची उपेक्षा आणि शोषण होत राहते. मात्र यातून त्यांच्याठिकाणी बंडाची भावना निर्माण होते. तेव्हा तो आपल्या माणसांना संघटना बांधून अन्याय, अत्याचार आणि शोषण करणाऱ्यांना आपण नमवू शकतो असा विश्वास बोलून दाखवतो. म्हणजे सर्वसामान्यांसाठी संघटन आणि संघर्ष अपरिहार्य असल्याचे सूत्र कथेतून अधोरेखीत होते.'' [३७] श्रीराम गुंदेकरांची कथा सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, आर्थिक आणि शासकीय पातळीवरचे प्रश्न मांडते.

भास्कर बडे हे ऊसतोड कामगारांच्या समस्या मांडतात. जनसंवाद दिवाळी अंक २००४ मध्ये 'जादुचा कासरा' मध्ये ऊसतोड कामगारांची समस्या ते पुढीलप्रमाणे मांडतात.

''मुकादमाकडून उचल घेतली की फिटेपर्यंत कुटुंब गुलाम झालंच म्हणायचं. कारण उचलीदरम्यान बैलाच तरी दुखतं. माणसाचं तरी दुखतं. गाडीचा घोटाळा तरी होतो किंवा ऊस तरी चांगला नसतो. यापैकी एक कारण उचलीवाल्याच्या आयुष्यात आलं की त्याची कुपाट लागते. या रहाटगाड्यातून तो सुटत नाही. चरकातून ऊस पिळून निघावा अन् फक्त चोथरी बाहेर यावी. तसं या उचलीवाल्याचं घडत आलंय. ना झोप, ना आंघोळ, ना चांगले कपडे, जेवणाचं तर विचारायलाच नको. जर देवाला ऊसतोडीमध्ये लावलं तर तो सुद्धा दिवसा ढवळ्या पळून जाईल.''[३८]

भास्कर बडे यांची धुराळा, प्रतिष्ठान अंक, चिकाळा कथासंग्रहातील 'काटेरी वाटा', काठी या सारख्या स्फूट कथामधून ऊसतोड कामगारांच्या समस्या त्यांनी मांडल्या आहेत.

भास्कर बडे यांनी 'अंजीमाय' या बाल कादंबरीमधून ऊसतोड करणाऱ्या विधवा स्त्रीची करूण कहाणी अभिव्यक्त केली आहे. शुन्यातून विश्व निर्माण करणाऱ्या स्त्रीची समस्या आलेली आहे. समकालीन काळातील महत्वाचे लेखक, कथाकार 'विठ्ठल जाधव' यांनी 'तिवढा' कथासंग्रह मधून 'पाचरट' कथामधून शाळेत शिक्षण घेणारी अल्पवयीन मुलगी शिक्षण घेण्याऐवजी तिचे पालक तिचा विवाह करतात. तिच्या सासरचे सर्व तिला शिक्षण घेण्याऐवजी ऊसतोडीच्या कामास नेतात. दुसऱ्या 'पाचोळा' कथेत आई–बाप ऊसतोडीला गेलेल्या परंतु गावाकडे शिक्षण घेणारे शाळाबाह्य मुलांचे चित्रण येते. तर २०१४ च्या झुंजार नेतातील 'ऊसगर्भाची तोड' मधून ऊसतोड कामगारांच्या समस्या येतात.

ऊसतोडी कामगारांच्या कामाला पर्याय म्हणून ऊसतोडणीला पर्याय हार्वेस्टर सारखे यंत्र येत आहे.

ऊसतोड कामगारांना रोजगारास मुकावे लागेल अशी भीती निर्माण होऊ लागली आहे. या समस्याचे चित्रण, त्याचे सुतोवाच कैलास दौंड यांच्या 'पाणधुई' मध्ये येते. या संबंधी पाणधुईच्या प्रस्तावनेत भास्कर बडे पुढील मत व्यक्त करतात.

''पारंपारिक ऊसतोडी सुद्धा आता बदललीय. हार्वेस्टर सारख्या महाराक्षस हजारो ऊसतोड कामगारांच्या चुलीत पाणी टाकणार आहे आणि आहेरांना अधिक श्रीमंत करणार आहे. नव्या संकेतासह नवे प्रश्न आणि भविष्यात जगण्याचा प्रश्न अधिक गंभीर झाल्याचे सुतोवाच 'पाणधुई' वाचताना आढळते. ''[३९]

ऊसतोडणीच्या यंत्रासंबंधी वासुदेव मुलाटे यांनी ग्रामीण साहित्य: चिंतन आणि चर्चा या ग्रंथात शांता जोशी यांच्या 'गव्हाणी' कादंबरीत वासुदेव मुलाटे लिहितात.

''आठ–दहा दिवसांनी मालकाने हार्वेस्टर नावाचे ऊसतोडणी यंत्र आणलेले असत. त्यामुळे या ऊसतोड कामगारांची त्याला गरज उरलेली नसते. मुकिंदा मुकादमाला तो त्याचे हिशोब पूर्ण करून जाऊ देण्यास सांगतो. ''[४०] यांत्रिकीकरणाचा ऊसतोडीला पर्याय ही एक ऊसतोड कामगारांची समस्या आहे.

ऊसतोड कामगारांच्या कथनात्मक साहित्यामधून त्यांना मानवनिर्मित संकटे त्यात त्यांच्या झोपड्या, जाळणे त्यांना दुषित पाण्याचा पुरवठा करून विविध आजारांना बळी जावे लागते. त्यात लहान बाळाचा, स्त्री पुरूषाचा विविध अपघात ऊसतोड कामगार, पुरूष यांना प्राणास मुकावे लागते. त्यांना कोणतीही शासकीय मदत मिळत नाही. साखर कारखानदार व शासन एकमेकांवर ढकलतात. 'प्रहार' या दवंगे यांच्या कादंबरीत अशी प्रसंगा येतात. सरदार जाधव यांच्या 'कोयता' मधून बैलांना, कामगारांना अपघात व विविध रोग त्यात बैल 'खुरकत' सारख्या रोगामुळे आजारपणाने बैल मरतात ही एक समस्या येते. दिनकर जायभाये यांच्या 'हिरवा डोंगर' मधून ऊसतोडणीला जाताना अपघातात बैल मरण पावतो व त्याची 'उचल' घेवून कर्ज फेडणे ऊसतोड कामगारांना शक्य होत नाही, अशा समस्यांचे चित्रण ऊसतोड कामगारांच्या साहित्यातून येते.

'प्रहार' या रायभान दवंगे यांच्या कादंबरीत धनदांडगे श्रीमंत यांचे थेट चित्रीत झालेले आहेत. ऊसतोड कामगारांच्या साहित्यामधून जे ऊसतोड कामगार वृद्ध आई–वडिलांना गावाकडेच सोडतात त्यांच्या आजारपणात त्यांना मदत न मिळाल्यामुळे कित्येक वृद्ध आई–वडील मरण पावतात. त्यांची झालेली हेळसांड साहित्यातून आलेली आहे. दिनकर जायभाये यांच्या 'हिरवा डोंगर' मधील नायकाच्या वडिलांना सरकारी दवाखान्यात कोणत्याही प्रकारचा विलाज होत नाही.

आर्थिक समस्या ही अत्यंत घातक असून त्यामुळे ऊसतोड कामगारांना सातत्याने गुलामासारखे वेठबिगार जीवन जगावे लागते. मुकादम त्यांचा सावकार असतो.

ऊसतोड कामगार जर मुकादम झाल्यास त्याची ऊसतोड कामगार बुडवणूक करतात. श्रीमंत पैशावाला मुकादमच खऱ्या अर्थाने सावकार असतो. आर्थिक कसरत ही त्याची समस्या या साहित्यातून आली आहे.

ऊसतोड कामगारांच्या कथनात्मक साहित्यातून महाविद्यालयीन शिक्षण घेतलेले पदवीधर बेकारीमुळे नौकरी न मिळाल्यामुळे त्यांना ऊसतोड कामगार व्हावे लागते. किंबहुना शिक्षण घेताना प्रसंगी परिक्षा संपल्यानंतर या पदवीधरांना ऊसतोडणीसाठी जावे लागते. योगीराज बागूल यांच्या 'पाचट' आत्मकथनातून परिक्षा संपल्यानंतर नेवासा परिसरात त्यांना आई–वडील, भाऊ यांना मदत व्हावी म्हणून ऊसतोडणीचे काम करावे लागते. याचे अनुभव त्यांनी सांगितले.

तरुण शिकलेले जोडपे ऊसतोडणीसाठी जातात त्यांना बागायतदार, अपमानकारक बोलतात. शिकलेल्या मुलांना बेकारीमुळे नोकरी लागत नाही. त्यामुळे बेकारी ही समस्या या ऊसतोड कामगारांपुढे आहे. परिस्थितीमुळे शिक्षण अर्ध्यात सोडणारा पाणधुईचा नायक ऊसतोडणी कामगार होतो ही त्याची अवहेलना ही ऊसतोडी कामगारांच्या साहित्यातील समस्या चित्रीत झालेली आहे.

११) ऊसतोड कामगारांच्या कथनात्मक साहित्यातील बालकांचे चित्रण

ऊसतोडणी कामगारांच्या मुलांचे प्रश्न अनेक प्रकारचे आहेत. या लहान मुलांना शाळेसाठी गावाकडे राजरी लोक, वृद्ध, आईवडील यांच्याजवळ रहावे लागते. किंबहुना त्यांना ऊसतोडणीस प्रारंभ झाला की शाळा सोडून त्यांना ऊसतोडणीसाठी चाललेली आई–बापा बरोबर निघावे लागते. शांता जोशी यांनी 'गव्हाणी' कादंबरीच्या मनोगतामध्ये लिहितात.

''महाराष्ट्रात एकूण ६५ लाख मुले आज प्राथमिक शिक्षणापासून वंचीत आहेत. त्यातील ५ लाख मुले आहेत रोजगारासाठी स्थलांतरित होणाऱ्या ऊसतोडणी कामगारांची. स्थलांतर काळात त्यांना शिकविण्यासाठी साखर शाळा सुरू आहेत. त्या पोहोचतात यातील केवळ ५ हजार मुलांपर्यंत. बाकीच्यांच्या शिक्षणाचे काय? आणि साखर शाळेत शिकून पुन्हा गावी जाणाऱ्या मुलांचे भवितव्य तरी काय''? [४१] बाल कामगारांच्या मुलांच्या शाळेचा प्रश्न किती गहन झालेला आहे. ऊसतोडणी कामगार मुलांच्या शाळेचे वेळापत्रक याचा मेळ लागत नाही. या मुलांच्या भवितव्याच्या संदर्भात पुढे मनोगतमध्ये शांता जोशी लिहितात.

''दसऱ्याला निघालेले कामगार पाडव्याला घरी परततात. तोपर्यंत शाळेच्या परिक्षा आटोपलेल्या असतात. पुन्हा मुलांना शाळेत प्रवेश देणे कठीण जाते. मग ही मुलं अर्ध्या कोयत्याच्या कामाला लावली जातात किंवा कच्चा कामगार म्हणून काम करतात. ज्ञानप्रबोधिनी जनार्थ आणि मानव हक्क अभियान या तीन संख्या साखर शाळा चालवितात. परंतु त्या संस्था ५ लाख मुलांचे प्रश्न सोडविण्यास अपुऱ्या आहेत.'' [४२] या वरून त्यांच्या प्रश्नाचे स्वरूप लक्षात येते. 'गव्हाणी' मध्ये शिक्षणाच्या कल्पनेने झपाटलेली कोवळी सुशिला हे कादंबरीतील मध्यवर्ती पात्र. आई विना पोरकी झालेल्या सुशिलेस पारूमावशी सारख्या खंबीर आणि शिक्षणाचे महत्व जाणणाऱ्या स्त्रीचं पाठबळ लाभतं. 'गव्हाणी' मध्ये बालकामगारांची शिक्षणापासून होणारी फारकतचे चित्रण केले आहे.

कैलास दौंड यांच्या 'पाणधुई' मध्ये नायक लक्ष्मणचा भाचा त्यांच्याकडे आल्यानंतरच्या संदर्भाने विश्लेषण करताना लेखक लिहितो, ''सोमा गेल्यावर्षी कारखान्याच्यावरच्या साखर शाळेत जात होता. पण तेथील शाळा व त्याच्या गावातील शाळा यात त्याला बराच फरक वाटत होता. गावातल्या शाळेत त्याचे बरेच मित्र असत तर साखर शाळेत त्याला सारे नवखेच वाटायचे. गावातल्या शाळेत तीन चार मास्तर होते. इथं एकटाच मास्तर सगळ्या पोरांना शिकवीत होता.'' [४३] याचाच अर्थ साखर शाळेत जाण्याऐवजी शाळा सोडून मजुरी शोधणारे मुलांचे प्रमाण जास्त आहे. शिक्षणाचं महत्व ऊसतोड कामगारांना पटलेलं आहे. त्यामुळे ऊसतोड कामगार मुलांना शिक्षण मिळावं त्यांनी चांगलं जीवन जगावं म्हणून ऊसतोड कामगार स्वत:ची शेती विकतात. कोणत्याही प्रकारचा त्याग करण्याची त्यांची तयारी असते.

दिनकर जायभाये यांनी कादंबरीचे दोन भाग केलेले आहे. पहिला भाग ऊसतोड कामगारांचे हाल परंतु दुसऱ्या भागात मुलगा झाल्यानंतर त्याच्या शिक्षणासाठी त्याचे आई–वडील, काका कोणताही त्याग करतात. परंतु मुलगा डॉक्टर करतात. साखर शाळा व वस्तीगृहातील शाळेतील कृष्ण वर झालेले अन्याय याचे चित्रण त्यांनी दुसऱ्या भागात केलेले आहे. शेती विकून प्रसंगी विविध प्रकारचे श्रमही मुले घेतात. शिक्षण अत्यंत मोलाचं आहे याचं चित्रण या कादंबरीत येते.

सरदार जाधव यांची 'कोयता' कादंबरी असून या कादंबरीचं निवेदन एक बालक करीत आहे. या कादंबरीत निवेदकाचे आई–वडील ऊसतोडीला जाणार असल्याचे त्यांना कळते. तेव्हा तो आईला ऊसतोडीऐवजी शाळेत जाण्यासाठी राहणार असं म्हणतो. आई–वडील, मास्तर समजावून सांगितलं तरीही ते निरागस मुलं शाळेसाठी थांबतंच. त्यासंबंधीचं चित्रण सरदार जाधव पुढीलप्रमाणे करतात.

''रातरी मायनं मले जवळ घेत्लं. तोंडावर हात फिरवत दमानं म्हणाली, 'आपल्याले किनई यंदाबी बेलापूरकडे जायचंय बरं ! किती मजा येती न्यी तिकडे ? गुदास्थावानी

नव्या नव्या खोप्याय मंधी ऱ्हावू

माय मुकुंदा बी येणारंय का ?

हाव येईल त्यो बी

नंदी बी येणार का ?

नंदी ? ... हाव येईल ती बी '' [४४]

लहान मुलाची ऊसतोडणीसाठी येण्याची मनाची तयारी आई करू लागली आहे. पण मुलं चौकस पणाने शाळेसंबंधी माहिती काढत त्याचं चित्रण पुढीलप्रमाणे

''पण काय गं माये तिथं शाळा नसत्यात का ?

माय गपचिप बसली

मी पुन्हा इचारलं, सांग ना गं माय तिथं शाळा असती का न्हाई ?

न्हाई

मग मही शाळा

म्होरल्या वरसी जा शाळीत

हं! म्हंजे मझा वरगातली पोरं म्होरच्या वरगात जातील अन् मी मातर मागच्याच वरगार ऱ्हाईल''

अरं आमच्यासंगे येणार न्हाईत का तू ऊसतोडीला ?

मले तं शाळा शिकायचीय अं आसं करा ?

कसं ?

तुमी बी ऱ्हावून जा घरीच यंदा ''[४५] लहान मुलगा शाळेत थांबण्यासंबंधी आईकडे विनंती करतो. वृद्ध आजी–आजोबा बरोबर ते शाळेत जाण्यासाठी थांबतो अशा पद्धतीने लहान मुलांच्या शिक्षणासंबंधीचे दर्शन कथनात्मक साहित्यात येतं.

योगीराज बागूल यांनी 'पाचट' आत्मकथनातून त्यांच्या प्राथमिक शाळेच्या आठवणी सांगितल्या असून वडिलाबरोबर ते गावाकडे थांबतात. वह्या पुस्तकासाठी आईकडे हट्ट धरतात. खूप कष्टाने शिक्षण पूर्ण करतात.

१८० रूपयेची शिष्यवृत्तीची आठवण त्यांनी सांगितली आहे. योगीराज बागूल यांच्या आठवणी अत्यंत महत्वाच्या आहेत.

माजी आमदार डॉ.नारायणराव मुंडे यांनी लहान मुलाच्या आरोग्य शाळा या संबंधीच्या समस्या 'मागे फिरा पतंगांनो' मध्ये हृदयस्पर्शी मांडल्या आहे. हे ललित लेखन अत्यंत महत्वाचं आहे.

१२) ऊसतोड कामगारांच्या कथनात्मक साहित्यातील अंधश्रद्धा :

ऊसतोडणी कामगार ग्रामीण भागातील पारंपारिक लोकजीवन जगणारा. हा समाज लोकविश्वासावर विश्वास ठेवतो. ऊसतोडणी कामगार ज्या परिसरात राहतो तेथील लोकांच्या काही श्रद्धा, समजुती असतात. ऊसतोडणी कामगारांचे चित्रण करणारे लेखक ग्रामीण भागातील असल्यामुळे ग्रामीण भागातील देवता, परिसर, निसर्ग, भुते, बळी देणे–घेणे या परिसरातील लोक लोकदैवतावर विश्वास ठेवतात. या लोकांचा चमत्कारावर विश्वास असतो असेच चित्रण ऊसतोडणी कामगारांच्या कथनात्मक साहित्यातून झालेले आहे.

भास्कर बडे यांच्या 'पाणकणसं' मध्ये म्हसोबाचं वर्णन केलं आहे. त्यांच्या शेतातील विहीर व आंब्याच्यामध्ये मोठा दगड तो परिसरातील शेतकऱ्यांचा देव होता. मसुबाला कोंबडं बकरं चालतं, निवदावर गोड निवद, तिखट व इतर असायचे याचं वादळ पेरणीपासून वाढणीपर्यंत गावाला जाण्यापासून परत येण्यापर्यंत या संबंधी दर्शन पुढीलप्रमाणे केलं आहे.

''जनावरांच्या आजारापासून जनावर हरवलेलं सापडेपर्यंत आणि उठसूठ भूत बाहेरवसा, माणसांचे शारिरीक आजार यावर रामबाण उपाय म्हणजे मसोबा कसलाही आजार असो मसोबाला नवस बोलायचा , नवसात काय तर कोंबडं ठरलेलं.'' [४६]

ऊसतोडणी कामगारांना अनेक संकटं येतात. त्यातून वाचलेली देवामुळे वाचलो अशी भावना त्यांची असते. देवांची निर्मिती संबंधी भास्कर बडे पुढे लिहितात.

''त्या मसुबाला शेंदूर लावला की बोटं कुठे पुसणार ? तेव्हा लोक शेजारच्या दगडाला हात पुशीत त्यामुळे शेजारचा दगड मसुबा बने! मग लोक म्हणू लागली थोरला मसुबा धाकला मसुबा तेव्हापासून दोघांनाही निवद नवस अनायासे मिळू लागले.'' [४७]

असे ग्रामीण शेतकरी ऊसतोड कामगारांची निर्मिती होते. अशा अंधश्रद्धेचं चित्रण कथनात्मक साहित्यात येते.

योगीराज बागूल यांच्या आत्मकथनामध्ये त्यांचे वडील बंधू व वहिणी ऊसतोडणीला जातात. त्या परिसरात वहिणीस भूत लागतात अशी या लोकांचा विश्वास बनतो. त्याचे चित्रण पुढीलप्रमाणे ते करतात.

''दादा बाबानं दुसरा निरोप सांगितला. तुमच्या सुनाचं खूपच दुखतंय. दवाखान्यात दाखवलं दवापाणी लागत नाही. दुखणं डॉक्टरचं नाही म्हणत्यात. बाहेरचं हाय म्हणून दादाबाबा गप्प झाला.

बाहेरचं म्हणजी, काय बरं आईनं विचारलं. जीजा लाघुरलीय तिला तिघीजणी लागल्या म्हणत्यात. एक लमाणीण दुसरी भिल्लीन अन् तिसरी कैकाडीन'' सांगून त्यांनं दम घेतला. पण आईला मात्र धापच लागली.ह्या तिघीही चिकट डाकीणी असतात. झाडाला लवकर सोडत नाही. हालहाल करून मारत्यात.'' [४८] अशा पद्धतीने भुते लागतात अशा गोष्टीवर या लोकांचा विश्वास असतो. योगीराज बागूल यांनी याच संबंधात एक आठवण पुढीलप्रमाणे लिहिली आहे.

''आत वहिनीचंच बघा ना! पुणतांब्याला एका थळात तोड होती. दादा सकाळीच गाडी घेवून पुढे गेला. वहिणी स्वयंपाक करून थळात जाणार होती. उरकता उरकता भर दुपार झाली. अन् काही तरी चटक मटक तळून वहिनी न्याहरी घेवून थळाकडे निघाली. वाटेत लघवी लागली, रस्ता सुनसान मागेपुढे कुणी नसल्याचं पाहून वळणावर पाटी टेकवून लघवीला बसली. ज्या जागेवर वहिणी लघवीला बसली तिथंच लमाणीण पुरलेली. वरून गावात उगलेलं तिथं वराळी असल्याची निशाणी पुसलेली आजुबाजुला आणखी दोघी जणी पुरलेल्या भिडल्या. तिघीही वहिणीला अशा ऊसतोडीला गेलेल्या कामगारांचे समाजातील समजत असतात. अशा प्रसंगी त्यांनी चित्रीत केलेले आहेत.

ऊसतोडणी करणारा कामगार श्रद्धावान आहे. त्यांच्यात शिक्षणाचे प्रमाण कमी असल्यामुळे नशिबावर विश्वास ठेवून जगणारा समाज त्यांच्या व्यथा, वेदना जीवन, समाज जीवनाचे अनुभव या साहित्यातून आलेले आहे.

१३) ऊसतोड कामगारांच्या कथनात्मक साहित्याचे मुल्यमापन :

ऊसतोड कामगारांच्या विविध साहित्य प्रकारातून जी अभिव्यक्ती चित्रण झालेले आहे त्याकडे बघितल्यास असे दिसते की या समाजाची समूह भावना या साहित्यातून व्यक्त झालेली आहे. कारण या लोकांची जी समस्या असते ती केवळ एका व्यक्तीची न राहता ती सर्व ऊसतोड कामगारांची होते. या समाजाकडे लोकांचा बघण्याचा जो दृष्टिकोन असतो त्या दृष्टीने त्यांच्या समाज जीवनातील प्रत्येक समस्या असतात.

नारायणराव मुंढे यांच्या 'मागे फिरा पतंगांनो' मध्ये ऊसतोड कामगारांकडे लोक कोणत्या दृष्टीने बघतात यासंबंधी भावना पुढीलप्रमाणे त्यांनी लिहिली आहे.

''बेलापूरला जाणारा ऊसतोड कामगारांचा एक वर्ग तयार झाला आहे. त्यांना क्षुद्र लेखल्या जाऊ लागले आहे. समाजात विभागणी पडत चालली आहे. त्यांच्याशी संबंध ठेवणे, त्यांच्याशी नाते करणे हे कमीपणा वाटणाऱ्या गोष्टी झाल्या आहेत. श्रम करणारे क्षुद्र गावात राहून लबाड्या करणारे श्रेष्ठ अशी प्रथाच पडत चालली आहे.'' [४९] ऊसतोड कामगारांच्या एकूण समुहाकडे याच दृष्टीने लोक बघतात अशी भावना यातून व्यक्त होते.

ऊसतोडणी कामगार हा असंघटीत आहे. या कामगारांचे नेतृत्व राजकीय पक्षाचे लोक करतात. जे लोक यांचे नेतृत्व करतात ते परस्पर आंदोलन मागे घेतात. पाहिजे तर संघटन चालविणारे याचा व्यवसाय करतात. त्यांचे प्रश्न तसेच राहतात. या कामगारांच्या समस्या सारख्या असून त्यांना या व्यवसायाकडे कशामुळे वळावे लागते याची कारणे समान आहेत. ऊसतोड कामगार जे मूळ व्यवसाय करतात त्या व्यवसायात या लोकांना त्यांच्या गरजा पूर्ण करता येत नाही. त्यामुळे त्यांना त्यांच्या मागण्या कशा पूर्ण करता येत नाही यासंबंधी योगीराज बागूल यांनी या कामगारासंबंधी पुढील मत व्यक्त केले आहे. ते 'पाचट' मध्ये लिहितात.

''ऊसतोड कामगार वर्ग हा असंघटीत, उपेक्षित गेलेला, अशिक्षित कानून कायद्याची जाण नसलेला आणि अंधश्रद्धेवर विश्वास असलेला. या कामगारांना संघटीत करणं अवघडच. कारण एखाद्या वर्षी पावसाळा कमी असला, विहिरींना पाहिजे तसं पाणी नसलं, पीक पाणी बरोबर नसलं की जास्त लोक तोडीला जातात आणि पुढच्या साली भरपूर पाऊस पडला की तोडीवाल्यांच्या संख्या अर्ध्याहून कमी होते. त्यामुळे या कामगारांची संघटना बनवणार कशी? आणि संघटना केली तरी तोडणाऱ्यांना सभासदत्व द्यायचं कसं? '' [५०] ऊसतोड कामगारांच्या एकूण सर्व साहित्य प्रकारातून या सारखं चित्रण आलेले असून या लोकांच्या संघटना होणे, त्यांचे प्रश्न सुटणे अवघड आहे.

तोडकऱ्यांना ज्या गावात तोड असेल तेथील सर्व कमी लेखतात. एखादा पाटील असल्यास त्याकडे वेगळ्या नजरेने पाहतात. या ऊसतोड कामगारांमध्ये महार, मांग, भिल्ल, बंजारा, वंजारी इत्यादी जातीचे लोक असतात. कथा, कादंबरी, ललित लेखन, आत्मकथनातून एक समाज नव्हे तर समूहाचे चरित्र चित्र रेखाटले आहे असे वाटते. त्यामुळे हे संकट त्यात त्याच्या झोपड्या, जळणे, बैल, माणूस, मुले, विविध कारणाने मरण पावणे या सर्व समान घटना या विविध साहित्यात दिसतात.

ऊसतोडणी कामगारांच्या समाज जीवनावर लिहिलेले कथा लेखन, कादंबरी, ललित लेखन व आत्मकथनातील समाज जीवन, कुटुंब जीवन, शेतकरी, शेतमजूर यासंबंधी प्रश्न घटतं, प्रसंग भाषा, शब्द वैभव लेखनाची व भाषेची शैली आणि प्रादेशिकता. खान्देश, औरंगाबाद, बीड, जालना, अहमदनगर याच भागातील विशेषत: ज्या परिसरात कोरडवाहू शेती आहे तेथील शेतकरी शेतमजूर विशेषत: १९७२ च्या दुष्काळानंतर तो स्वत: आणि त्यांचे पाळीव प्राणी यांचा सांभाळ करण्यासाठी शेतकरी, शेतमजूर ऊसतोडणीसाठी जाऊ लागले. हा एक नवा समाजाचा कामगार वर्ग निर्माण झाला. त्यांचे गाव भाषा निसर्ग त्यांच्या काम करण्यासाठी वापरले जाणारे साधने, हत्यारे यांचा कलात्मक पद्धतीने विविध वाङमय प्रकारांच्या साह्याने चित्रण दर्शन समाजजीवन व्यक्त झाले आहे.

समारोप :

ऊसतोडणी कामगारांचे कथानात्मक साहित्यातून सामाजिक,राजकीय सांस्कृतिक दृष्टीने निराळेपण जपणाऱ्या समाजाचे दर्शन घरटे त्यांच्या कौटुंबिक समस्या,आई–वडील,मुले,स्त्रिया या सर्वांच्या समस्या अनंत प्रकारच्या असतात. या साहित्यातून निसर्ग त्यांचे बेलापूरला जाण्याचे प्रश्न तसेच जाण्याची तयारी ऊसतोडणीला जाण्यासाठी मुकादम त्यांना राजी करतात.या कथनात्मक साहित्यामधून ऊसतोड कामगारांची आंदोलने त्यांचे विद्रोह,अवहेलना, साहित्याची भाषा,लोक वाङमय त्यांच्या समंस्या,अंधश्रद्धा या सर्वांचे विचार या प्रकरणात केला आहे. हे प्रकरण म्हणजे या संशोधन प्रकल्पातील समाजाच्या विविध समस्याचे चिंतनात्मक स्वरूपाची मांडणी वाङमयीन मुल्यमापन करावे लागते. कारण समाजाच्या समस्यांचे स्वरूप वैविध्यपूर्ण असून त्याची दखल घेतली जात नाही.शासकीय,सामाजिक,राजकीय, पातळीवर याचा काही प्रमाणात विचार झालेला आहे. परंतू या लोकांच्या मनातील उपरेपणा दूर होवून या प्रकरणात त्यांच्या कथनाचे स्वरूप जाणून घेतले आहे. पुढील प्रकरणात काव्यात्मक साहित्याची अभ्यासपूर्ण चर्चा केली जाणार आहे.

संदर्भ

१)सरदार जाधव– कोयता, जयनशक्ती पब्लिकेशन,औरंगाबाद – प्र.आ.१९९४ – पृष्ठ –२०

२)तत्रैव

३)कैलास दौंड, पाणधुई –शांती पब्लिकेशन पुणे, प्र.आ.२००४ –पृष्ठ क्र. २४

४)दिनकर जायभाये – हिरावा डोंगर , सुमेरू प्रकाशन –पुणे – प्र.आ. २००० – पृष्ठ क्र. ३८

५)अशोक घोळवे – प्रणाली –संपादक –प्राचार्य डॉ.रणखांब,लेख – विस्तापित ऊसतोड कामगारंचे उध्वस्त जीवन अंक २०११ – पृष्ठ क्र. ५६

६)भास्कर बडे – पाणकणसं – साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद– प्र.आ.१९९० – प्रष्ठ क्र. ४

७)कैलास दौंड –पाणधुई –शांती पब्लिकेशन पुणे, प्र.आ.२००४ –पृष्ठ क्र. २८

८)योगीराज वाघमारे – धुराळा – हर्ष प्रकाशन सोलापूर – प्र.आ. २००५– पृष्ठ क्र. २६

९)शांता जोशी – गव्हाणी – स्वरूप प्रकाशान,औरंगाबाद – प्र.आ. २००२ – पृष्ठ क्र. १२१

१०)दिनकर जायभाये – हिरावा डोंगर , सुमेरू प्रकाशन –पुणे – प्र.आ. २००० – पृष्ठ क्र. ३८

११)योगीराज बागूल – पाचट– ग्रंथाली प्रकाशन,मुंबई –प्र.आ. १९९९ – पृष्ठ क्र. ७५

१२)कैलास दौंड, पाणधुई –शांती पब्लिकेशन पुणे, प्र.आ.२००४ –पृष्ठ क्र. ८५

१३)सरदार जाधव– कोयता, जयनशक्ती पब्लिकेशन,औरंगाबाद – प्र.आ.१९९४ – पृष्ठ –२४

१४)तत्रैव

१५)योगीराज वाघमारे – धुराळा – हर्ष प्रकाशन सोलापूर – प्र.आ. २००५– पृष्ठ क्र. ५१

१६)दिनकर जायभाये – हिरावा डोंगर , सुमेरू प्रकाशन –पुणे – प्र.आ. २००० – पृष्ठ क्र. १५

१७)दिनकर जायभाये – हिरावा डोंगर , सुमेरू प्रकाशन –पुणे – प्र.आ. २००० – पृष्ठ क्र. ४२

१८)दिनकर जायभाये – हिरावा डोंगर , सुमेरू प्रकाशन –पुणे – प्र.आ. २००० – पृष्ठ क्र. ९

१९)शांता जोशी – गव्हाणी – स्वरूप प्रकाशान,औरंगाबाद – प्र.आ. २००२ – पृष्ठ क्र. ३३

२०)सरदार जाधव– कोयता, जयनशक्ती पब्लिकेशन,औरंगाबाद – प्र.आ.१९९४ – पृष्ठ –८३

२१)कैलास दौंड, पाणधुई –शांती पब्लिकेशन पुणे, प्र.आ.२००४ –पृष्ठ क्र. ४९

२२)दिनकर जायभाये – हिरावा डोंगर , सुमेरू प्रकाशन –पुणे – प्र.आ. २००० – पृष्ठ क्र. ५४

२३) तत्रैय – पृष्ठ – ५५

२४)तत्रैय – पृष्ठ ५८

२५)डॉ. नारायणराव मुंडे – मागे फिरा पंतगांनो – सत्संग प्रकाशन गेवराई, प्र.आ.२००१– पृष्ठ क्र. १००

२६)दिनकर जायभाये – हिरावा डोंगर , सुमेरू प्रकाशन –पुणे – प्र.आ. २००० – पृष्ठ क्र. २६

२७)सरदार जाधव– कोयता, जयनशक्ती पब्लिकेशन,औरंगाबाद – प्र.आ.१९९४ – पृष्ठ –५२

२८)भास्कर बडे – पाणकणसं – साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद– प्र.आ.१९९० – प्रष्ठ क्र. ३४

२९)सरदार जाधव– कोयता, जयनशक्ती पब्लिकेशन,औरंगाबाद – प्र.आ.१९९४ – पृष्ठ –७८

३०)मधु मंगेश कर्णिक – सांस्कृतिक महाराष्ट्र (१९६० ते २०१०)भाग क्र. १ ,महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई प्र. आ .२०११ – पृष्ठ क्र. ९३

३१)भास्कर बडे – अंजीमाय – वावर प्रकाशन, लातूर– प्र.आ.२०१० – प्रष्ठ क्र. १५

३२)भास्कर बडे – पाणकणसं – साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद– प्र.आ.१९९०

३३)कैलास दौंड –पाणधुई –शांती पब्लिकेशन पुणे, प्र.आ.२००४ –पृष्ठ क्र. ३३

३४)दिनकर जायभाये – हिरावा डोंगर , सुमेरू प्रकाशन –पुणे – प्र.आ. २००० – पृष्ठ क्र. ३४

३५)शांता जोशी – गव्हाणी – स्वरूप प्रकाशान,औरंगाबाद – प्र.आ. २००२ – पृष्ठ क्र. ७८

३६)योगीराज बागूल – पाचट– ग्रंथाली प्रकाशन,मुंबई –प्र.आ. १९९९ – पृष्ठ क्र. ८५

३७)डॉ.मनोहर सरुवाडे – १९८० नंतरची ग्रामीणकथा ,बळिवंश प्रकाश नांदेड– प्र.आ.२०१० – पृष्ठ क्र.१०९

३८)भास्कर बडे– जादूचा कासरा – जनसंवाद दिवाळी अंक –२००४– संपादक– हनुमंत कराड–जनसंवाद माध्यमशास्त्र महाविद्यालय लातूर –

३९)कैलास दौंड –पाणधुई –शांती पब्लिकेशन पुणे, प्र.आ.२००४ –प्रस्तावना– भास्कर बडे

४०)वासुदेव मुलाटे – ग्रामीण साहित्य चिंतन आणि चर्चा –स्वरूप प्रकाशन औरंगाबाद– प्र.आ. डिसेंबर २००५ पृष्ठ क्र. १७८

४१)शांता जोशी – गव्हाणी – स्वरूप प्रकाशान,औरंगाबाद – प्र.आ. २००२ – पृष्ठ क्र. ७

४२)तत्रैय

४३)कैलास दौंड –पाणधुई –शांती पब्लिकेशन पुणे, प्र.आ.२००४ –पृष्ठ क्र. १४०

४४)सरदार जाधव– कोयता, जयनशक्ती पब्लिकेशन,औरंगाबाद – प्र.आ.१९९४ – पृष्ठ –१००

४५)तत्रैय

४६)भास्कर बडे – पाणकणसं – साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद– प्र.आ.१९९० –पृष्ठ क्र. ६०

४७)तत्रैव

४८)योगीराज बागूल – पाचट– ग्रंथाली प्रकाशन,मुंबई –प्र.आ. १९९९ – पृष्ठ क्र. ६८

४९)डॉ. नारायणराव मुंडे – मागे फिरा पंतगांनो – सत्संग प्रकाशन गेवराई, प्र.आ.२००१– पृष्ठ क्र. १५४

५०)योगीराज बागूल – पाचट– ग्रंथाली प्रकाशन,मुंबई –प्र.आ. १९९९ – पृष्ठ क्र. १२६

प्रकरण तिसरे

ऊतसोड कामगारांची कविता

ऊसतोड कामगारांची कविता

१) ऊसतोडणी कामगारांची कविता उदय विकास

२)ऊसतोडकामगारांच्या कवीतेतील जीवनजाणीय

३)ऊसतोड कामगारांच्या असीम वेदनांचा अविष्कार

४)बालकांच्या मुलांच्या शिक्षण विषयक कविता

५)ऊसतोड कामगारांच्या प्रेमश्रृंगार व्यक्त करणारी कविता

६)ऊसतोड कामगारांच्या काव्यातील निसर्ग

७)ऊसतोड कामगारांच्या काव्यातील भाषा– शब्द वैभव

८)ऊसतोड कामगारांच्या काव्यातील कथानक संघर्ष,स्वरूप

९)ऊसतोड कामगारांच्या काव्याचे मुल्यमापन

१०) समारोप

प्रास्ताविक:

मराठी कवितेतील शेतकरी जीवनाचे चित्रण सर्व प्रथम म.फुले यांच्या लेखणीपासून झालेले आहे. तत्कालीन समाज जीवनात पुरोहितशाही, नौकरशाही, साम्राज्यशाही, शेतकऱ्यांचे शोषण करीत असे. मा.फुले यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबंधी सातत्याने चिंतन केले होते. यात शेतकऱ्यांनी काही प्रमाणात सहभाग नोंदवला होता. म.फुले यांनी १८८३ ला शेतकऱ्याच्या आसूडमधून शेतकऱ्याच्या बिकट परिस्थितीचे चित्रण केले आहे. शेतकऱ्यांचे धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक शोषण झालेले आहे. अज्ञात हे या सर्वांच्या मुळाशी आहे. त्यासाठी शेतकऱ्यांनी शिक्षण घेवून त्यांचे अज्ञात दूर होण्यासाठी शिक्षणाची अत्यंत आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

म.फुले, कृष्णराव भालेकर, मुकुंदराव पाटील, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांची मांडणी केली आहे. शेतकऱ्यांच्या प्रबोधन कार्यात या सर्वांनी मोलाचे कार्य केले आहे.

१९६७ नंतर आधुनिक तंत्रज्ञानाने शेती करणे, सुधारित बियाणे, पीक, कृषीयंत्राचा वापर व जलसिंचन यामधून शेती व्यवसायातून मोठा श्रीमंत वर्ग निर्माण झाला. लहान शेतकरी अल्प भू धारक शेतकरी विविध लाभापासून वंचित राहू लागला.

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये शेतीचे भांडवलीकरण होऊन शेती ही श्रीमंत वर्गाची मक्तेदारी बनलेली आहे. हरितक्रांतीमुळे श्रीमंत शेतकरी यंत्राच्या साह्याने शेती करू लागला. परंतु जलसिंचन न पोहचलेल्या भागातील कोरडवाहू शेतकरी आणि या प्रदेशात शेती व्यवसायावर अवलंबून असणारा शेतकरी आर्थिक शोषणाला बळी पडला. या सर्वांचा परिणाम प्रादेशिक विकासात असमतोल निर्माण झाला. परिणामी मागास भागातील शेतकरी अल्पभूधारक शेतमजूर यांना नवीन व्यवसाय शोधावे लागले.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात सर्वच क्षेत्राबरोबर कृषी क्षेत्रात भरपूर परिवर्तन झाले.समाजात शोषण करणारा वर्ग निर्माण झाला आणि या वर्गाने इतर त्यांच्यावर अवलंबून असणारा बालके, स्त्री–पुरूष यांचे विविध प्रकारचे शोषण करण्यास सुरूवात केली. ऊसतोडणी करणारा व हे काम करून घेणारा समाज जीवन जगणारे शिक्षण घेवून साहित्यातून विचार व्यक्त करू लागले.

ऊसतोडणी कामगारांचा वर्ग आणि त्याचे चित्रण करणारा लेखक, कवी, ललित लेखक आणि

आत्मकथातून वास्तव जीवनाचे चित्रण करणारा श्रीराम गुंदेकर,भास्कर बडे, सरदार जाधव, यांच्यासारखे साहित्तींकाचा उदय झाला. ग्रामीण साहित्य चळवळीतील काही लेखकांनी या समाजाचे दर्शन साहित्यातून घडवले आहे.

ऊसतोड कामगारांची कविता

१९६० नंतरच्या काळात प्रत्येक क्षेत्रातील समाजातील घटकांचा लोकशाही प्रणालीच्या विकासामुळे खेड्यातील सर्वांना शिक्षणाची संधी मिळाली. या शिक्षणाच्या संधीमुळे बुद्धीचा विकास घडून येऊ लागला. प्रत्येक व्यक्तीला आपल्या हक्क व कर्तव्य व अस्तित्वाची जाणीव होऊ लागली व त्यामुळे स्वत:च्या प्रश्न व्यथा,वेदना,दुख या सर्वांची अभिव्यक्ती विविध वाङमय प्रकारांच्या स्वरूपात समाजातील सर्वच घटक करू लागले.

ग्रामीण भागातील शेतीसंबंधीच्या व्यवसायाचे आधुनिकीकरण झाले. सर्वांच्या गरजा वाढू लागल्या आणि रोजगारांच्या संधी वाढू लागल्या. ग्रामीण भागातील समाज व्यवस्थेत पारंपारिक, व्यवसायांना नकार मिळाल्यामुळे हे लोक शेतीच्या विविध प्रकारचे रोजगार शोधू लागले. शेती व्यवसायावर उद्योग अवलंबून राहू लागले आणि ग्रामव्यवस्थेतील शेतमजूर नव्या कामाच्या शोधात बाहेर पडू लागला. या नव्या कामात शोषण करणारा व शोषल्या जाणारे वर्ग निर्माण होऊ लागले. शोषल्या जाणाऱ्या वर्गात शिक्षण घेणारे तरुण–तरुणी स्वत:चे अनुभव, समस्या, सांस्कृतिक, अभिव्यक्ती साहित्याच्या माध्यमातून करू लागले. ग्रामीण भागात शेतीच्या विविध व्यवसायावर अवलंबून असणारे समाजातील घटक हे सर्वसमाजाचे आहेत. शेतीच्या क्षेत्रात समाजातील विशिष्ट प्रकारची मक्तेदारी निर्माण झालेली आहे. मोठा जमीनदार, छोटा शेतकरी झाला असून शेतीच्या कामासाठी कामगारांची कमतरता ग्रामीण भागात भेडसावत आहे. कसेल त्याची जमीन परंतु नसेल त्याचे काय? असे प्रश्न समाजात निर्माण होऊ लागले. अल्पभूधारक, कोरडवाहू आणि भूमिहीन असे शेतकऱ्यांचे प्रकार असून ग्रामीण भागात हे शेतीच्या कामावर अवलंबून आहेत.

१९६५–७० च्या काळात जलसिंचनात वाढ होऊन शेतीत नगदी पीक म्हणून ऊस लागवड, त्यातून साखरकारखाने यांचा उदय व विकास झाला. बँक, सहकार व ग्रामीण भागातील राजकारण यांचे परस्पर संबंध निर्माण होऊन त्याला शिक्षण क्षेत्र हा उद्योग बनलेला असून शिक्षण क्षेत्र ज्ञानदानाचे क्षेत्राऐवजी उद्योगाचे क्षेत्र होऊन शिक्षणाचे बाजारीकरण पदवीधरांना कोणत्याही प्रकारची नौकरी नसल्यामुळे

त्यांना पुन्हा पारंपारिक व्यवसायात आधुनिक स्वरूप देवून त्या व्यवसायाकडे नव्याने वळावे लागत आहे.

शेतकरी आणि शेतीवर अवलंबून असणारा शेतमजूर हा मराठी साहित्याचा नायक झालेला नाही. म.फुले, बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतून तो व्यक्त झाला आहे.

आजच्या युवा कवीच्या कवितासंबंधी द.ता.भोसले 'पोशिंद्याची कविता' या प्रस्तावनेत लिहितात,

''आजचा ग्रामीण युवा कवी वर्तमानाच्या पोटातील भाजून काढणारी धग चित्रीत करीत आहेच. पण त्या धगीतून निर्माण झालेल्या राखेमध्ये भविष्याचे देखणे स्वप्नही पाहतो आहे. वर्तमानाला कवेत घेवून वर्तमानाच्या पलीकडे जाणारी कविता तो खून गांभीर्याने लिहितो. आपल्या वृत्ती धर्माशी इमान राखून तो कविता लिहितो आहे. आपल्या संवेदनशील आणि नव्या आत्मभानातून तो लिहितो आहे. खोट्या आणि भडकू भावनांचा अव्हेर करून तो लिहितो आहे.''[१]

समकालीन ग्रामीण भागातील विविध स्तरातून येणारा तरूण कवी तो ज्या समाजातून जन्माला आलेला आहे. ज्या समाजात तो जगतो त्यांच्या वास्तव जीवनाचे चित्रण करू लागला आहे.

साखरकारखान्यांना ऊसतोडणीसाठी जो नवा कामगार वर्ग ग्रामीण भागातून अस्तित्वात आलेला आहे. त्या समाजाचे जीवन अनुभव कवितेच्या माध्यमातून आले आहे. त्या ऊसतोडणी कामगारांची कविताचा विचार केला जाणार आहे.

१) ऊसतोडणी कामगारांची कविता, उदय व विकास

१९७२ च्या दुष्काळाने शेतकऱ्यांना एका नव्या रोजगाराकडे वळावे लागले. तो म्हणजे ऊसतोडणीचे काम होय. ग्रामीण भागातील बहुजन समाजातील ग्रामव्यवस्थेच्या कामाला नकार दिल्यामुळे आणि शेतीचे उद्योग म्हणून विकास होऊ लागल्यामुळे विविध जाती धर्मातील लोकांनी या व्यवसायाकडे येऊन रोजगाराची संधी मिळवली आहे. प्रथम ऊसतोडणीच्या कामासाठी, मराठवाडा विभागातील औरंगाबाद, बीड, अहमदनगर जिल्ह्यातील शेतकरी कामगार म्हणून काम करू लागला. समाजातील घटक ऊसतोडणीच्या कामात कामगार म्हणून उदय व विकास पावत गेला. त्यातून ऊसतोड कामगारांचा जन्म होऊ लागला. साखर कारखाना परिसरातील ऊस तोडणीसाठी कामगार शोधणारा मध्यस्थ हा मुकादमाच्या रूपाने निर्माण होऊन तो ऊसतोडणी कामगारांच्या कामाच्या पूर्वी पैशाच्या स्वरूपात रक्कम देवू लागला त्याला 'उचल' म्हणतात.

ऊसतोडणी कामगारांच्या व्यथा, वेदना, दु:ख, समस्या काव्याच्या माध्यमातून मांडणारे कवी उदयास आले. त्यापैकी भास्कर बडे यांनी 'वावर' कविता संग्रहातून ऊसतोडणी कामगारासंबंधी लिहिली आहे. कैलास दौंड पाथर्डी तालुक्यातील कवी असून त्यांनी बालपणापासून ऊसतोडणी कामगार जवळून पाहिला, अनुभवला. त्यांनी 'ऊसाच्या कविता' ऊसतोडणी कामगारांच्या जीवनावर लिहिलेला पहिला व प्रसिद्ध कवितासंग्रह आहे. कोपरगाव येथील मराठीचे प्राध्यापक व कवी, कादंबरीकार, प्रा.रायभान दवंगे यांनी बालपणापासून ऊसतोडणी कामगारांना जवळून पाहिले. त्यांच्या व्यथा, वेदना, प्रश्न त्यांच्यात जावून अनुभवले. त्यांचा 'तांडा' कवितासंग्रह हा संपूर्ण ऊसतोडणी कामगारांचे जीवन रेखाटन करतो ते अत्यंत महत्वाचे कवी आहेत.

पश्चिम महाराष्ट्रात विविध भागातील ऊसतोड कामगार येतात त्यांच्या विषयी कविता या 'तांडा' मधून येते. आष्टी येथील कवी सय्यद अल्लाउद्दीन हे बीड जिल्ह्यातील आहेत. ऊसतोडणी करणारे आणि या कामासाठी जाणारे स्त्री–पुरूष, बालके या सर्वांचे जीवन त्यांनी जवळून पाहिले आहे त्यांनी 'उचल कोयता तोडीला' हा प्रसिद्ध ऊसतोडणी कामगारांचे जीवन रेखाटणारे कवितासंग्रह लिहिला असून ते ऊसतोड कामगारासंबंधी कविता लिहिणारे प्रमुख कवी म्हणून प्रसिद्ध आहेत.

या परिसरात शेतकऱ्यांना दसऱ्याच्या काळापासून ऊसतोडणीसाठी जावे लागते असंख्य प्रासंगिक कवी ऊसतोडणी कामगारांच्या विविध पैलूचा विचार कवितेतून व्यक्त करतात.

भास्कर बडे, दलित मित्र एकबाल पेन्टर, विठ्ठल जाधव, संजयकुमार डोरले, यांची कविता ऊसतोडणी करणाऱ्या कामगारांचे व्यथा,वेदना,दु:ख व समाजजीवन व्यक्त करणारे असंख्य कवी आहेत. ऊसतोडणीला जाण्यापासून तयारी ते पोहचेपर्यंत ऊसतोडणाराचे 'तांडे' निघतात. या ऊसतोड कामगारांच्या अनेक पैलूंना स्पर्श करणारे कवी व कवितांची वाटचाल होऊ लागली आहे. ऊसतोडणी करणाऱ्याची स्कूट कवितांची संख्या भरपूर आहे. या कवितांचा संख्यात्मक गुणात्मक विकास होऊ लागला आहे. कवी नव्या जाणिवेने लेखन करत आहेत.

२) ऊसतोड कामगारांच्या कवितेतील जीवन जाणिवेचे स्वरूप :

ऊसतोडणी कामगारांच्या कविता उत्कट व वेदनामय जीवनाचा पट कवी उलगडून दाखवतात. या कवितांमधून निसर्ग, पाऊस, ऊन, वारा, ऊसाचा मालक, ऊसतोड कामगार, ऊसतोड स्त्री कामगार

यांच्या सतत जीवनात संघर्षमय समस्या. रोज त्यांच्यासमोर नवा प्रश्न उभा राहतो. त्यांच्या मनात येणारे विविध विचार या लोकांची लूट केली जाते. त्यात आर्थिक, सामाजिक, वेदनांचा हुंकार कायम त्यांच्या मनात येत असतो. कामगारांच्या ऊसतोडणीची उचल घेतल्यामुळे, कर्ज असल्यामुळे या कामगारांची मानसिक गुलामगिरी अशा या गुलामगिरीमध्ये त्यांनी मनाशी केलेला संवाद ऊसतोडणी करणारे माणसं असून त्यांना भावभावना आहे. ऊसतोड कामगारांच्या जीवनाच्या प्रत्येक क्षणाला दु:खाचा स्पर्श असतो. या शिवाय आग लागणं, अपघात होणे, बायका मुलांना, आई–बापांना कोणता तरी संकटाचा सामना करावा लागतो. ऊसतोड कामगारांना जीवनात सतत संघर्षाचा सामना करावा लागतो.

प्रा.डॉ.वसंत बिरादार यांनी सत्यागृही विचारधारा जून २००१ च्या अंकात ऊसतोड कामगारांच्या उत्कट कविता ऊसाच्या कविता या समिक्षा लेखात ते लिहितात.

'' साखर कारखान्याचा पट्टा पडला की वैशाखाचं ऊन सुरू होते. या ऊसतोड कामगारांना मात्र या सावलीखाली बसता येत नाही ना रात्री निवांत विश्रांती घेता येत नाही. कधी कुणाची आठवण काढता येत घरासमोर, झोपडीसमोर ऊस मालकाच्या गाडीचा आवाज आला की सर्व कामगारांनी आपापले सामान बांधून त्या गाडीत गुमान बसून निघायचे एवढे मात्र त्यांना माहीत असते. ही माणसे जोपर्यंत या गावात असतात तोपर्यंत गावात कशी गजबज असते. पण हे कामगार गाव सोडून गेल्यानंतरचे जे गावातले दृष्य असते ते मात्र अतिशय उदासवाणे असल्याचे कवीला जाणवते. ही माणसे गावातून गेल्यानंतर येथे नेमके कोणाकोणाचे वास्तव असते याचे चित्रण करताना कवी म्हणतो,

''घरे झाली बंद आणि
लोक झाले बेगाव
अजून देखील तेथे
थांबले आहेत साव''[२]

ऊसतोड कामगारांच्या वेदना ह्या बाजारात जळत असतात. त्यांचा भाव मोठेपणा करपून जातो. या ऊसतोड कामगारांची अशी भावना आहे की जीवनाला कोणत्याही प्रकारचा भाव नाही. माणसं म्हणजे केवळ जिवंत 'शव' आहेत अशी भावना कवीने व्यक्त केली आहे. माणूस मुल्यहीन झाला आहे त्याची किंमत संपून गेली आहे अशी भावना त्यांनी पुढे व्यक्त केली आहे.

पुढे कवी म्हणतात–

'वेदना जळते बाजारात

करपून गेले भाव

मरणे झाले मुश्कील येथे

आहे कुणाव भेव''

किंवा

'सस्त्या–सस्त्या गुलामांचे

फुटले आहे पेव

माणसे झाली दुर्मिळ तेव्हा

लपून बसले देव

करतील सिझन

येतील फिरून

माणसं म्हणजे जिवंत शव ''[३]

माणसाच्या जगणे–मरणे यास कोणतीही किंमत राहिलेली नाही. माणसाच्या गुलामीची कोणतीही किंमत नाही. माणसातील किंमत कमी झाल्यामुळे देवही दिसेन्यास झाले आहे. ऊसतोडणीचा हंगाम (सिझन) करून येतील आणि ही माणुसकीची माणसं म्हणजे केवळ जिवंत असूनही मेल्यासारखी आहेत. कारण या माणसाच्या जीवन जाणिवा बोथट झाल्या आहेत.

ऊसतोड कामगार हे सातत्याने दरिद्री जीवन जगतात. ते जे ऊसतोडणीचे काम करतात ते इमाने इतबारे करतात. 'वारकरी' कवितेमध्ये आम्ही वारकरी आहोत परंतु विठ्ठलाचे बटीक नाही. आम्ही वारकरी हे एकप्रकारे कष्ट करणारे, सतत काम करतो परंतु पोटभर अन्न कधीच नाही. सातत्याने उपवास घडतो आहे. अशी जीवन जाणीव कवी व्यक्त करतात.

कवी म्हणतो,

''माझे चालतात वार

डोक्यापेक्षाही उच्च वाढलेल्या

वाळल्या अन् हिरव्या ऊसावर

कोपीत चहासही नसते साखर

अन् पोटभर भाकर'' [४]

(वारकरी) पृष्ठ क्र.१२

दारिद्र्य जीवनाचे दर्शन घडते. कारण पोटभर भाकर, साखर घोटभर पण मिळत नाही. जेवण खाण्यासाठी, झोपण्याची विशिष्ट अशी वेळ नसते. कोणत्याही वेळी ऊसासाठी गाडी येते आणि ती भरण्यासाठी अर्धा जेवणावरून उठावे लागते असे प्रसंग ते सांगतात. जीवनावश्यक गरजा अन्न– वस्त्र– निवारा व आंघोळ रोज झाली पाहिजे परंतु या लोकांना रोज आंघोळ करण्यास मिळत नाही. या परिस्थितीचे चित्रण कवी पुढील शब्दात करतो.

''दोन तीन दिवसातनी

आंघोळीच्या वेळी

अंगाला लागलेल्या पाचटाने

साऱ्या अंगाचीच पेटते होळी

पण आम्ही तरी ही शांत

बंड करून उठत नाही

सवय झाल्यागत''[५]

(वारकरी) पृष्ठ क्र.१३

कैलास दौंड यांच्या या ऊसाच्या कवितातून ऊसतोड कामगारांच्या जीवनाची जाणिव प्रगट होते. जेव्हा वेळ मिळते तेव्हा घाईत आंघोळीसाठी बसतात. पण ऊस तोडी करताना अंगाला लागलेल्या पाचटामुळे अंगाची अग–अग होते, वेदना होतात. पण तरीही शांतता असते पण तरीही कोणत्याही प्रकारचे बंड यातून घडत नाही. कारण निमूटपणे काम करण्याची सवय या ऊसतोडणी कामगारांना लागलेली आहे.

रायभान दवंगे यांनी 'तांडा' कवितासंग्रहातून ऊसतोडणी कामगारांच्या जीवनाची जाणीव अभिव्यक्त केली आहे. ऊसतोडणी कामगारांचे जीवन हे लाचारीचे जीवन आहे. प्रत्येक प्रसंग, घटना त्यांच्यावर होणारे अन्याय अत्याचार निमूटपणाने सोसण्याची या लोकांना सवय लागलेली आहे. 'किती सोसले सोसले' या

कवितेतून दु:ख कसे सोसायचे या संबंधीची जाणीव त्यांनी व्यक्त केली आंहे ती पुढीलप्रमाणे.

''किती सोसले सोसले प्रहार या काळाचे

घाव ऊसावर जसे मुक्या–मुक्या झेलायचे

''गाव सोडताना दाटे

एक हुंदका उरात

पाश ओढताना मागे

पाय अडतो वेशीत

कसे पुसावेत आसू रडणाऱ्या डोळीयाचे''[६]

(किती सोसले सोसले– पृष्ठ क्र.६९)

ऊसतोडणी कामगारांना सतत आघात सोसावे लागतात. ते आघात सोसल्याशिवाय कोणताही उपाय नसतो. ज्या पद्धतीने ऊसावर घाव बसतात त्याच पद्धतीने केवळ मुकेपणाने हे घाव ऊसतोड कामगाराने झेलणे गरजेचे असते. ऊसतोड कामगार, ऊसतोडणीसाठी गाव सोडतात तेव्हा गाव, घर, शेत हे सोडावे असे वाटत नाही. गावाच्या बाहेर पडावे असे वाटत नाही. डोळ्यातून जे अश्रू बाहेर पडतात ते कसे आवरावेत अशी भावना ते व्यक्त करतात. ऊसतोडणी करताना भरपूर त्रास होतो. गाव सोडले की सुख गहाण ठेवल्यासारखे आहे. ऊसतोड कामगारांचे नाते हे ऊन, वारा, पाऊस, फुपाटा यांच्याशी जुळते. पाचटाने अंग चिरले किंवा कोणताही त्रास झाला तरी हसत हसत दु:खाला सामोरे जाण्याची क्षमता या ऊसतोडणी कामगारांची असते.

प्रा. रायभान दवंगे यांनी 'तांडा' मध्ये 'जिणं थळातळ' अशी आणखी एक कविता तांड्यासाठी लिहिली आहे. या कवितेतून काम करणाराचे जीवन जाणिव अभिव्यक्त झालेली आहे. ज्या ऊसाला तोडतात त्याला जे दु:ख होते त्याप्रमाणे कामगारांना सातत्याने दु:ख, वेदना जीवन जगताना होतात. या जीवन जाणिवेचे 'दर्शन 'जिणं थळातलं' मध्ये व्यक्त करतात ते पुढीलप्रमाणे.

''रोज हातात कोयता

जिणं थळाचं जगतो

सरीतल्या ऊसागत

घाव दु:खाचे भोगतो

अंगा झोंबता पाचाट

लाल रेघुट्या उठती

रगताच्या थेंबाहूनी

नवे अंकुर फुटती'' [७]

(जिणं थळातलं – पृष्ठ ७१)

ऊसतोड कामगार त्यांच्या जीवनासंबंधी सांगतो की सरीतील ऊसाला जसे कोयत्याचे घाव सोसावे लागतात तसे पावलोपावली सतत दु:खाचे घाव बसतात. अंगाला जेव्हा पाचाट झोंबते तेव्हा अंगाला लाल रेघोट्या उमटतात. त्यांना पाणी लागलं की अंगाची लाही लाही होते. पण तरी त्यातून जीवनाला नवा अंकुर फुटतो असा आशावाद कवी व्यक्त करतो. रामभान दवंगे यांनी जीवन जाणिव व्यक्त केली आहे.

कवी सय्यद अल्लाउद्दीन यांनी 'उचल कोयता तोडीला' या संग्रहामधून ऊसतोड कामगारांच्या विविध अंगाने चिंतन केले आहे.

ऊसतोड कामगारांच्या जीवन संघर्षाचा वेध कवी कवितेतून घेतो. या काव्य संग्रहातील कविता ऊसतोडणी कामगारांच्या सर्व समस्यांचं चित्रण करतात. विविध विषय या कवितांमधून येतो. कविता क्रमांक एक मध्ये कवी पुढीलप्रमाणे भावना व्यक्त करतात.

''ऊसाच्या तो फड । पेटे ढणा ढणा

तसे माझे मना । भूक अग्नी

इथे ऊस मोळी । तिथे कारखाना

मध्ये बैल घाणा । आमुचाच

हिरवा हिरवा । जरी ऊस मळा

आतड्याला पिळा । बसे घट्ट ''[८]

(उचल कोयता तोडीला पृष्ठ क्र.१)

या कवितेमधून कल्पना शक्तीच्या बळावर ज्या पद्धतीने ऊसाचा फड पेटतो तसा माझ्या मनात

भुकेचा अग्नी तयार होतो. ज्या पद्धतीने घाण्यामध्ये ऊस पिळला जातो तसा ऊसतोड कामगारांची बैलाच्या घाण्याप्रमाणे अवस्था होते. हिरव्या ऊस मळ्यात जरी हे ऊसतोड कामगार असले तरी त्यांना या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा आराम आनंद नाही. सातत्याने मनाला चैन पडत नाही. या ठिकाणी सतत पिळवणूक होते.

ऊसतोड कामगारांना जीवन जगताना सातत्याने मनाला दु:खातून जावे लागते. राबराबणे या शिवाय त्यांना काहीही सूचत नाही. आतड्याला मनाला सतत पिळ पडलेला आहे.

ऊसतोडणी कामगार आपले गाव, घर, परिसर सोडून पोटापाण्यासाठी ऊसतोडणीसाठी दूर जातात. बैल आणि माणसं राबतात त्यांना कोणताही सण असला तरी जीवनापेक्षा निराळं सरू वेगळं नसते कायम उपाशी, चिंतेत जीवन त्यांना घालवावं लागतं याचा विचार कवी सय्यद अल्लाउद्दीन यांनी त्यांच्या पुढील कवितेत केले आहे ती पुढीलप्रमाणे–

''ओस करून हा गाव गाड्या जाती बेलापुरा
पोटाच्या आगीवरती वितळे घामाच्या धारा
जुने देणे फेडणारी मुकादमाची उचल
तडफडत्या माशाला जशी काठावर ओल
बैल अन माणसाची अशी झुंजणारी जोडी
भुकेलेल्या खळगीत पेटे सुरूंगाची लडी'' [९]

(उचल कोयता तोडीला पृष्ठ क्र.४६)

आपलं गाव, घर, शेत, नातेवाईक यांना सोडून ऊसतोडणीसाठी विविध प्रदेशात भूभागात हे लोक वणवण फिरतात. सातत्याने त्यांना पोटाची भूक असते. कितीही काम केलं तरी पोटभर मिळेल असं वाटत नाही. एकदा मुकादमाकडून 'उचल' घेतली की पूर्ण कधी फिटलेली आहे. कर्ज कधीच फिटत नाही. पाण्यातला मासा जसा काठावर आणावा तसे ओलीचा ओढीत तडफडावा तसा तशी या ऊसतोडणी कामगारांची होते. या ऊसतोडणी कामगारां बरोबर त्यांच्या साथीला त्यांचे बैल साथ देतात. परंतु त्यांना पण व्यवस्थीत खायला मिळत नाही. बैल व माणसाची सारखीच अवस्था होते.

ऊसतोडणीचा जन्म हा केवळ कोयत्यासाठीच झालेला आहे असा विचार मनात येतो. कारण

कुटुंबातील सर्वांच्या हाती कोयता असतो. या कोयत्याच्याकचाट्यातून कोणीही सुटत नाही.

कोयता स्त्री, मुले, तरुण, नवरा, बायको, म्हातारा, म्हातारी या सर्वांच्या हातात केवळ कोयताच आहे. ऊसतोड कामगारांचा जन्म केवळ ऊसतोडणीसाठीच झालेला आहे अशी भावना विचार घेवून कवी सय्यद अल्लाउद्दीन कवितेत पुढीलप्रमाणे लिहितात.

''तोडीवाल्याचा जलम

कोयता

गर्भारणीचा हाती

फडात बाळांतीन होती

तोडीवाल्यांचा जलम

कोयता

पोरापोरीच्या हाती

सपन उद्याचे रेखिती''[१०]

(उचल कोयता तोडीला पृष्ठ–४७)

तोडीवाल्याचा कोयता हा गर्भधारणा झालेल्या स्त्रीच्या हातात असून त्या फडातच ती बाळंतपण करते. म्हणजे त्यांची मुले ही ऊसाच्या तळात जन्मून भविष्यात तिथेच त्यांचं आयुष्य जाते. तेच लेकरं पुढे तरुण झाल्यानंतर कोयतेवाले होतात. उद्याचे स्वप्न त्यांचे हे दुसरे तिसर काही बघत नाही तर उद्या ते 'उचल' घेणारे व ऊसतोडी करणारे आई–बाप होणार असले तरी कोयतेवालेच यांचा शेयर जीवन हे कोयतेवाले म्हणूनच होणार आहे अशी भावना व्यक्त होते.

३) ऊसतोड कामगारांच्या असीम वेदनांचा अविष्कार :

ऊसतोड कामगारांचे जीवन सातत्याने समस्यांनी भरलेले असते. ऊसतोड कामगारांच्या अशा ठेवून सातत्याने काम करतो. परंतु प्रत्येक क्षणी त्यांना संकटाचा सामना करावा लागतो. कवी सय्यद अल्लाउद्दीन यांनी त्यांच्या कवितेमध्ये सातत्याने काम करणाऱ्या, कष्ट करणाऱ्या मातेला उघड्या मुलाला काही तरी घेईल असे मनात येते पण एक प्रकारची भीती तिच्या मनात असते ती पुढीलप्रमाणे.

''मोळी वहाता वहाता

जीव मोळी मोळी होतो

रोजच्या कष्टाने कसा

जीव आंबूनच जातो

राबल्या बिगरही नाही सत ना गत

बाळा घेईन म्हणते

उद्या अंगडं टोपडं

चांगुणीचं फराकही

नाही राहिल्या धड

घेऊ म्हंते पुसून, धन्याला भीत भीत''[११]

(उचल कोयता तोडीला– पृष्ठ क्र२३)

सतत कामात राहणारे कुटुंब आपल्या बाळांना साधे वस्त्र घेऊ शकत नाही कारण या लोकांना सामान्य गरजा पूर्ण करणे असह्य होते इतके हे लोक कामात असतात.

कवी रायभान दवंगे यांनी 'तांडा' या कथा काव्यामधून सातत्याने ऊसतोड कामगारांच्या व्यथा, वेदना शब्दबद्ध केले आहे. स्त्री मनाचा वेदनांचा वेध या तांड्यामधून येतो. ऊसतोडणीला गेल्यानंतर त्यांच्या कामाची रोजची पद्धत सुरू होते. या संबंधाने 'तांडा' मध्ये कवी लिहितात.

''आयुष्य जोमानं सुरू होतं तांड्याचं

दुसऱ्या दिवसापासून

दु:खाचेच दिवस ओळीने

उभे असतात

तांड्याच्या नशिबात

तुटून गेलेल्या

ऊसाच्या संऱ्यासारखे

तरीही तांड्याच्या मनात

स्वप्नाचे तुरे डुलत असतात'' [१२]

(तांडा– पृष्ठ क्र.१२)

ऊसतोड कामगारांना नव्या एक–दोन दिवस तेथे जाण्यापर्यंत आनंद वाटतो पण दुसऱ्या दिवसापासूनच या लोकांना विविध प्रकाराच्या समस्यांना सामोरे जावे लागते. त्यांना शारिरीक, मानसिक, आर्थिक त्रासांना सामोरे जावून काम करावे लागते. तरीही ऊसतोड कामगारांना उद्याचे स्वप्न, भविष्य उज्वल असल्याची अशा या लोकांच्या मनात असते आणि अशा बळावर हे लोक सतत परिश्रम करतात. त्यांच्या वेदना अभिव्यक्त होतात.

रायभान दवंगे यांनी 'तांडा' या कथाकाव्यामधून ऊसतोड कामगारांच्या दाहक वेदना मांडल्या आहेत. ऊसतोड कामगारांना सर्व बाजुने वेदनादायक जीवन असते. कारण त्यांच्या कुटुंबातील सर्वांना प्रत्यक्ष या वेदनेतून जावे लागते. त्यामुळे प्रत्येक क्षण दाहक वेदनेने भरलेले असते. ऊसतोड कामगारांच्या स्त्रियांची सातत्याने कुचंबना होते. मुलांना शिक्षण घेता येत नाही. पुरूषांना सतत अपमान सहन करावा लागतो. तरुण मुलींना सातत्याने वाईट नजर, भावना यांना सामोरे जावे लागते. तरुण मुलींना ज्या दाहक वेदना होतात त्यातून व्यथा व्याकूळ हा काव्याच्या माध्यमातून व्यक्त होते.

रायभान दवंगे यांनी 'तांडा' मधील काव्यातून 'मुकादमा' च्या मुजोरणाचे त्याच्या वृत्ती प्रवृत्तीचे दर्शन पुढीलप्रमाणे केले आहे.

''थळात हिंडून

मुकादम

झाडाच्या सावलीत बसतो

तशी ती

सावरलेला पदर

अजूनच सावरते

मुकादम

तोंडातल्या सुपारीसंग

तिलाही चघळतो

ती तेव्हा

तान्ह्याला पाजीत

त्याच्या डोळ्यात

आग पेरते

क्रांतीचं काजळ

नजरेनेच भरते ''[१३]

(तांडा– पृष्ठ क्र.२१)

ऊसतोड कामगारांच्या स्त्रिया लहान बाळांना एक प्रकारे बंड करण्याची भाषा शिकवते. त्यांचं बाळ हे त्यांचं भविष्य आहे. क्रांतीची भाषा ती त्याला शिकवित असते. ऊसतोडणी कामगारांना विविध प्रश्नांना सामोरे जावे लागते. कितीही काम, श्रम केले तरीही त्यांना निवांतपणा दिसत नाही. कारण ऊसतोड कामगारांना सतत दाहक वेदनांना सामोरे जावे लागते.

ऊसतोडणी कामगार हे जिवंत असून मेल्यासारखे आहेत. कारण त्यांच्या संबंधाने माणूसकी जागी आहे असे वाटत नाही. ऊसतोड कामगाराच्या व्यथाचे दर्शन कैलास दौंड यांनी त्यांच्या 'पाहू नका वाट' या कवितेमधून ऊसतोड कामगारांच्या भावना पुढीलप्रमाणे मांडल्या आहेत.

'' माझे प्रेत जाळायाला

चार माणसे

बळेच थांबवावी लागतील

आयुष्यभर न मानलेली

सारी नाती

दुरान्वयाने सांगावी लागतील.''[१४]

(ऊसाच्या कविता– पृष्ठ क्र.४२)

ऊसतोड कामगारांना माणूस म्हणून कोणतीच किंमत नाही. कारण त्यांच्या शेवटच्या अंत्यविधीसाठी लोकांना बळेच थांबवावे लागेल. माणसातील माणूसकी संपलेली आहे अशी भावना लोकांची झालेली आहे. कवीने ऊसतोड कामगाराची व्यथा याच कवितेत पुढीलप्रमाणे व्यक्त केली आहे.

''दरसाल 'उचल' घेतो

आकंठ घाम पितो

ऊसाच्या पाचटाने

सोलून निघतो मी''[१५]

(उसाच्या कविता– पृष्ठ क्र.४२)

अशी व्यथा वेदना कवितेतून व्यक्त होते ऊसतोड कामगारांच्या कष्टाचे चित्रण केले जाते.

४) बालकांच्या शिक्षण विषयक कविता

ऊसतोड कामगारांच्या मुलांची शिक्षणाची हेळसांड होते. त्यांच्या मुलांना शिक्षण घ्यावे असे वाटते परंतु आई–वडील ऊसतोडणीसाठी जाणार असल्यामुळे मुलांना सांभाळण्याचा प्रश्न निर्माण होतो. किंबहुना त्या मुलांच्या शिक्षण घेण्याची इच्छा असल्यासही त्यांना शिक्षण घेता येत नाही. तरी पण या विषयाला धरून ऊसतोड कामगारांच्या कविता मधून या मुलांच्या शिक्षणाच्या समस्यांचे चित्रण करणाऱ्या कविता आहेत. सय्यद अलाउद्दीन यांच्या 'उचल कोयता तोडीला' मधील शिक्षण विषयक कवितेतून कवी लिहितो.

''पोरगं म्हणतं

दादा

औंदाच्या साली मला नका घालू कोयत्यात

दहावी पास होता जाईल मी कालीजात

बाप म्हणतो

माझ्या 'बा' पासी म्याबी केला होता

असाच हट्ट

म्हणाला कष्टाशीच नाळ तुझी चिकटली घट्ट''[१६]

(उचल कोयता तोडीला पृष्ठ क्र.२७)

अशी कित्येक तरुण मुलांना आर्थिक समस्यांमुळे शिक्षण घेणाऱ्या मुलांना शिक्षण देवू शकत नाहीत. कष्टाशिवाय पर्याय नाही हीच भावना त्यावरील कवितेतून व्यक्त होते.

या लहान मुलांना शाळा नाही ज्या प्रमाणे ऊसतोडणीसाठी गाव रिकामे होते तशाच पद्धतीने

शाळा ही रिकाम्या झालेल्या आहेत. या अवस्थेचं चित्र सय्यद अलाउद्दीन यांनी उचल कोयता तोडीला मध्ये पुढीलप्रमाणे केले आहे.

''नाही पाटी नाही शाळा
पोरं निघाली निघाली
गावासारखीच शाळा
अख्खी रिती रिती
बालवाडी पहिलीत
कुणी कुणी मॅट्रिकीत
लहान थोर सारी पोरं
कारखान्याच्या वाटेत'' [१७]

(उचल कोयता तोडीला– पृष्ठ ११)

ऊसतोड कामगारांची मुले आई–वडिलाबरोबर शाळा सोडून ज्या पद्धतीने गाव रिकामे झालं तशी शाळा रिकामी करून निघालेले आहेत. या शाळेतील मुले सर्वच वर्गातील असून लहान मुलांना सोय नसल्यामुळे गावाकडे सोडता येत नाही. तरुण मुले मदतीसाठी लागतात. त्यामुळे त्यांच्या शाळा बुडतात अशा व्यथा कवीने मांडल्या आहेत.

रायभान दवंगे यांनी 'तांडा' कथाकाव्यातून ऊसतोड कामगारांच्या शाळेत न जाणारे लहान मुलांचे दर्शन घडविले आहे. कारखाना परिसरात बागायतदारांची मुले शाळेत जातात. त्या परिसरातील ऊसतोड कामगारांची मुले ऊसाचे टिपरे जमा करतात. ऊसाच्या ठुशा खातात पण शाळेत जावू शकत नाही.

रायभान दवंगे यांनी थळा जवळील मुलांचं दर्शन पुढीलप्रमाणे घडविले आहे.

''थळाजवळच्या वाटेने
गावातली पोरं
शाळेत जातात तेव्हा
थळातली पोरं
ऊसाच्या ठुश्या चघळीत

सरी–सरीत

टिपरं गोळा करतात''[१८]

(तांडा– पृष्ठ क्र१३)

थळाच्या वाटेने शाळेत जाणारे गावातली मुले शाळेत जातात. तेव्हा ऊसतोड कामगारांची मुलं ऊसाच्या ठुशा गोळा करणे हेच काम करतात. तर पुढील एका कवितेतून रायभान दवंगे यांनी ऊसतोड काम करणारी स्त्री आपलंही मुल शाळेत केव्हा तरी जाईल म्हणून स्वप्न बघते. 'तांडा' त ते पुढीलप्रमाणे येते.

''तांड्याच्या कोप्याजवळून

गावातली पोरं

लगबगीने शाळेत जातात

तेव्हा गवऱ्या थापताना

तरळतं तिच्याही डोळ्यात

एक भरजरी स्वप्न'' [१९]

(तांडा – पृष्ठ क्र.१६)

ऊसतोड कामगारांच्या स्त्रियांना आपली मुलं शिकली पाहिजे त्याने शिक्षण घेवून नौकरी करावी अशी तिची मनोमन इच्छा असते. आपलंही मुल शाळेत जात असणारं स्वप्न ती रंगवत असते आणि तिला आपला मुलगा साहेब झाल्याचे स्वप्न पडतात.

ऊसतोडणी कामगारांच्या स्त्री कामगार आपल्या मुलांना शाळेत कधी पाठवणार आहात असा थेट प्रश्न पतीला विचारते. तिच्या या प्रश्नाने नवरा भानावर येतो. त्याचे दर्शन पुढीलप्रमाणे कवी करतात.

''आगं जात्यील ह्ये बी दिस

उकांड्याचा बी फिटतू या पांग

योक 'दिस' आपला बी असंल

आपलंबी पोर साळंत दिसंल ''[२०]

(तांडा– पृष्ठ क्र.१७)

ऊसतोडणी कामगारांना आपली मुले भविष्यात शाळेत जातील. कधीतरी आपलं पांग फिटेल अशी भावना या ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणविषयक काव्यरचना आहेत.

कैलास दौंड यांच्या ऊसाच्या कवितातून त्यांनी लहान मुलांच्या तोंडून शाळा पूर्ण होणार नाही अशी एक भावना व्यक्त केली आहे ती पुढीलप्रमाणे.

'तिसरीचे हे साल तिसरे

औंदाचे ही होय तसे

आजी पाशी ठेवा इथे

माय म्हणे बालापिसे''[२१]

(ऊसाची कविता पृष्ठ ४०)

बालवयातील मुलं त्याच त्या वर्गात त्यांना अनेक वर्षे रहावे लागते त्यातून त्यांचे अपूर्ण शिक्षण होते याचे दर्शन या कवितांमधून होते.

५) ऊसतोड कामगारांच्या प्रेम-शृंगार व्यक्त करणारी कविता :

ऊसतोड कामगार म्हणजे सतत कामाच्या विवंचनेत असतो. त्यांना प्रेमभाव व्यक्त करण्यासाठी वेळच नसतो. सतत विविध प्रकारच्या समस्या या लोकांना असतात. सातत्याने चिंतन करणे, विविध प्रश्न सोडविणे, गावाकडे, मुलांकडे, आई-बापाकडे त्यांना पहावे लागते. परंतु या सर्व प्रकार बघून पत्नी, प्रेयसी म्हणून तिच्या संबंधाने काही भाव व्यक्त करता येतो. अशा पती-पत्नीमधील शृंगार भाव काव्याच्या माध्यमातून व्यक्त झाला आहे. रायभान दवंगे यांनी 'तांडा' मध्ये अशी भावना व्यक्त करणारी कथा काव्य त्यांनी पुढीलप्रमाणे व्यक्त केले आहे.

''एखाद्या निवांत रात्री

कोपीच्या कुडाजवळ

गाडग्य लोटक्याच्या अडचणीत

शृंगारतो तांडा

एकान्ताचे चार क्षण

तेव्हा कोप्या कोप्यातून ऐकू येते

सुखद स्वप्नांची रूणझुण

थकलेल्या देहांतून उमलते

उल्हासणारी धुंद धून'' [२२]

(तांडा– पृष्ठ ३४)

शृंगार भाव व्यक्त होतो मनाच्या तृप्तीचा भाव अशा कवितांमधून येतो. पती–पत्नीतील एकांतातील काही क्षणाला आनंदी शृंगारी भाव व्यक्त करणारी अवस्था काव्यातून येते.

या शृंगारभावनेला काम, श्रम, कष्ट याशिवाय दुसरे काही दिसत नाही. ऊसतोड कामगारांच्यावयात येण्याच्या पूर्वी मुलांचे विवाह होतात. प्रेमभाव, शृंगार कळण्यापूर्वी हे आई–बाप होतात आणि त्याचा परिणाम त्यांच्या जीवनावर होतो.

लहानपणी विवाह झाले की त्यांना तात्काळ ऊसतोडणीसाठी जावे लगते. या नव्या तरुण–तरुणींना ऊसतोडणीमध्ये कष्ट करावे लागतात. याचे चित्रण सय्यद अलाउद्दीन यांनी उचल तोडीला या संग्रहातील कविता पुढीलप्रमाणे भाव व्यक्त करते.

'लागलेले लग्न

कोयतं घेताना

चूर चूर झाले स्वप्न

(पृष्ठ क्र.६)

किंवा

पहिल्या रात्रीचा

वाजे किणकिण चुडा

ऊस फडामध्ये

उद्या भाकरीचा लढा'' [२३]

(उचल कोयता तोडीला पृष्ठ क्र.७)

विवाह झाल्याबरोबर या लोकांना जीवनाचा आनंद घेण्यासाठी वेळ, संधी मिळत नाही. त्यांना तात्काळ पोट भरण्यासाठी कामासाठी ऊसतोडणीसाठी जावे लागते. त्यांच्या भाव भावना या ठिकाणी

संपून जातात. प्रेम भावापेक्षा सतत भाकरीचा लढा चालू असतो. प्रेमभाव व शृंगारभाव या विचाराने कैलास दौंड यांच्या 'ऊसाच्या कविता' या संग्रहाचे आश्वादक समीक्षा लेखन करताना प्रा.डॉ.वसंत बिरादार यांनी 'ऊसाच्या कविता' संबंधाने ते पुढीलप्रमाणे मत व्यक्त करतात.

''कष्ठमय जीवनात वावरतानाही कामगारांच्या मनातील व्यक्त झालेला प्रेमभाव ही कामगार मंडळी मनाने प्रेमळ आहेत. पण पोटच्या भ्रांतीमुळे त्यांना आपल्या पत्नी मुलांवर प्रेम करण्यास त्यांना जीव लावण्यास त्यांच्याजवळ वेळ तरी आहे कुठे? पाषणमय झालेल्या या कामगार हृदयाची अवस्था कशी होते ते पहा

''फिरला हात माझा तुझ्या कुंतलातून
सखे आज आला पाषण कंठ दाटून
(ऊसाची कविता आस पृष्ठ क्र.१६)

अशी त्याची प्रेममुळक अवस्था होते. आपल्या पत्नीला खूप खस्ता खाव्या लागत आहेत. आता ती प्रसूत होईल मग मुलं खेळू बागडू लागतील. त्यांना कुठं ठेवावं? हे कोडं घरधनी असलेला ऊस कामगाराला पडले आहे. आपली पत्नी उन्हात अनवाणी भाकरी घेवून पाय भाजत भाजत येते. याचं दु:खही त्याला आहे. अशाच एका ऊस कामगारांच्या बायकोकडे एका मुकादमाने 'वाईट' नजरेने बघितले असते. ती पतीव्रता स्त्री मुकादमाला चहा सुद्धा देण्याचा नकार निश्चित करून घरी साखर नसल्याचे खोटंच आपल्या पतीला सांगते व पतीचा बेदम मार खाते. या कामगारांच्या स्त्रिया कुलीन, शालीन व सुस्वभावी आहेत असे असले तरी त्यांची प्रचंड आबाळ होते. त्यांच्या आंघोळी रस्त्याच्या बाजुलाच होताना अनेक जण न्याहाळून पाहतात. आपल्या पत्नीबद्दलची एक उत्कट भावना प्रकट करताना एक ऊस कामगार म्हणतो.

''मेघ मिळून येतील
ग्रीष्म भाजक्या उन्हात
तशी तूही येतेस
आठवणीच्या तप्त
घेऊनी लाल सळ्या

आणि कोरतेस छातीवर

अनाहत प्रेम

(ऊसाची कविता 'आठव' पृष्ठ क्र.३७)

असे हे ऊस तोडणाऱ्या कामगारांच्या जीवनातील प्रेमाचं वास्तव चित्रण कवीने शब्दबद्ध केलेले आहे. ''[२४] या पद्धतीने डॉ.वसंत बिरादार यांनी ऊसतोड कामगारांच्या प्रेमभाव व्यक्त करणारी कैलास दौंड यांची कविताचा आस्वाद लेखन केला आहे.

ऊसतोड कामगारांनाही व्यक्तीगत जीवन आहे. कोणता तरी क्षण विरंगुळा पती–पत्नीत होतो आणि प्रेमाचे बोलणे, अभिव्यक्ती होत असते असे शृंगारपूर्ण वर्णनही आलेले आहे.

कवींनी काही प्रमाणात या ऊसतोड कामगाराकडे पाहताना शृंगार भाव काही कवितामधून व्यक्त केलेलाही दिसतो.

६) ऊसतोड कामगारांच्या काव्यातील निसर्ग, चित्रण :

ऊसतोड कामगार ग्रामीण भागातील असून त्यांचे जीवन हे निसर्गाच्या सानिध्यात असते. त्यामुळे निसर्गातील वातावरण, शेती, निसर्ग, भूमी माती या सर्वांच्या चित्रणाला कवितेमध्ये स्थान आलेले असते. ऊसतोड कामगारांच्या कवितेतील निसर्ग भावना कशी चित्रीत झाली आहे याचा विचार करताना त्यासंबंधीच्या काही काव्यपंगती कैलास दौंड यांच्या ऊसाच्या कवितामध्ये येतात त्या पुढीलप्रमाणे:

''एरव्ही ऊसाच्या

कटा–कटातून

फिरताना

हिरव्यागार पानावरच्या

अदृष्य लवीचे

अंगांगावर खुडतात काटे''[२५]

(ऊसाच्या कविता– पृष्ठ क्र.९)

कवी ऊसात फिरताना येणारा अनुभव त्यांचा शरीर व मनावर होणारा परिणाम व्यक्त करतात. कैलास दौंड यांच्या 'चांदरात' कवितेत निसर्ग वातावरण संबंधी लिहिताना त्यांनी निसर्गाचा बारकावा

चित्रीत केला आहे. त्यामुळे ओघाने कवीचे मन निसर्ग चित्राकडे ओळते.निसर्ग वातावरणासंबंधी कवी कैलास दौंड पुढीलप्रमाणे लिहितात.

''चांदराती गार हवा
चांदण्याचा झुलवा
माझ्यासाठी टांगलेला
चांदराती सळसळ
अंधार भरण्या पिकाची
मनात जपण्याची
चांदराती किर्र किर्र
रूसलेले रात किडे
लपूनच बसलेले''[२६]

(ऊसाची कविता– पृष्ठ क्र.१६)

कैलास दौंड यांनी ऊसाच्या कविता मधून कवीच्या निसर्ग कवितातून भरलेला अंधार मनात कशा पद्धतीने जपावे असं चाँदरातीचे आकर्षक चित्रण केले आहे. त्यांनी अशाच फुलांनी पेरले दान मी विदेही स्मशान झालोसारख्या विविध कवितामधून निसर्ग चित्रण केले आहे.

रायभान दवंगे यांनी 'तांडा' मधून ऊसतोड कामगारांच्या जीवनाच्या चित्रणाबरोबर निसर्ग वैभव कथा काव्यातून विणलेले आहे. या काव्यातून निसर्ग वातावरण काव्याच्या माध्यमातून व्यक्त केले आहे. पुढीलप्रमाणे ते व्यक्त करतात.

''क्षितिजावर
खोल जाणाऱ्या
सुर्याच्या तांबूसपणात
तांड्याच्या गाड्या
मुंग्यांच्या पावलांनी
सरकत राहतात

तेव्हा क्षितिजाआडून

येणारा काळोख

बैलांच्या पायात

घोटाळत असतो''[२७]

(तांडा– पृष्ठ क्र.६३)

ऊसतोडणी कामगारांच्या संध्याकाळ सकाळच्या प्रसंगी झाकडलेला वातावरणाने सायंकाळचा काळोखाचे दर्शन कवीने घडविले आहे.

सय्यद अलाउद्दीन यांनी 'उचल कोयता तोडीला' या काव्य संग्रहातून शेती आणि शेतकरी यांचे वर्णन करताना माती संबंधीचे वर्णन केले आहे. कितीही कष्ट केले तरी कसं बसं थोडं पिक येतं आणि त्यातून कस तरी पोट भरतं याचं चित्रण त्यांनी पुढीलप्रमाणे केले आहे.

''माझी बरडाची माती

तिची भागेना तहान

वरसाला कसं बसं

देते पीक ती लहान

माझी बरडाची माती

कशी लहा लहा करी

दहा एक्कर असूनी

माझी वारी बेलापुरी''[२८]

(उचल कोयता तोडीला – पृष्ठ ५)

सय्यद अलाउद्दीन यांनी बरडाची हलकी शेतीचं दर्शन घहविले आहे. ती कितीही जास्तीची असली तरी तिच्यातून पोट भरलं जात नाही.

ज्या परिसरातील शेतकरी ऊसतोड कामगार आहेत त्या परिसरातील निसर्ग या लोकांवर अन्याय करतो. उन्हाळ्यात जल सिंचनाची सोय नाही त्यामुळे या रानातील पशु–पक्षी, प्राणी यांना पाणी मिळत नाही. एक प्रकारच्या विलाप या ठिकाणी असतो. या संबंधाचे चित्रण कवी सय्यद अलाउद्दीन यांनी केलं

आहे.

''रानाच्या पाखरांना दिले रानानेच शाप

पाण्या पावसावाचून सारा आकांत विलाप

तिच्या सावलीत आता युक्त उन्हाच्या झळाया

हिरव्या गारव्या बिगर रोज लागल्या पोळ्या ''[२९]

(उचल कोयता तोडीला पृष्ठ १८)

निसर्गाने निसर्गावर अवलंबून असणाऱ्यांना शाप दिला आहे. त्यांनी निसर्गाने लोकांना कसे जगणे मुश्कील केले आहे. अगतिक मनाचा वेध कवीने घेतला आहे.

ऊसतोडीच्या कामगारांना त्याचे सुख–दुःख ज्या परिसरात तो राहतो त्या परिसराचा निसर्ग यांचा परिणाम साहित्यावर झालेला आहे. त्यामुळे निसर्ग व वातावरण यांचा परिणाम या ऊसतोड कामगारांच्या कवितेवर झालेला आहे.

७) ऊसतोड कामगारांच्या कवितेमधील भाषा– शब्द वैभव :

ऊसतोड कामगारांच्या भाव भावना व्यक्त करणारे कवी हे ऊसतोडणी परिसरात राहणारे त्यांना जवळून पाहणारे असल्यामुळे त्यांनी कवितेमध्ये भाषा वैभव वापरताना ऊसतोडणीसंबंधी भाषा वापरली आहे. कैलास दौंड यांनी वर्णनात्मक कथन पद्धत वापरून त्यांनी अनुभव घेतलेल्या सरळ भाषेतून ऊसतोड कामगारांची समस्या, स्वरूप व्यक्त केल्या आहेत.

कट– दोन वाफ्याच्या मधला दंड

लव – पानावरील बारीक काटे

साल – वर्षे

हाळी – हाक

सिझन – हंगाम (ऊसतोडणीचा संपूर्ण हंगाम)

बटीक – दास

पाचट– ऊसाचा वाळलेला पाळा

कलाप– लेप

अशा भाषेचा शब्द वैभवाचा वापर कवीने केला आहे. पाथर्डी परिसरातील भाषेचा वापर कवीने त्यांच्या कवितेमधून केलेला आहे. कैलास दौंड यांच्या कवितेतून अशा पद्धतीने भाषा अभिव्यक्त होते.

रायभान दवंगे यांनी प्रमाण भाषेचा वापर कथा काव्यातून केला आहे. परंतु ऊसतोडणी कामगारांची स्वत:ची भाषा शब्द यांचा त्यांनी वापर केलेला आहे. 'तांडा' मधूनचे भाषा वैभव येते त्यात गाडीच्या धुरीला, ढिगळलेल्या आयुष्याला, फाटक्या पदराहून ओघळलेला ऊन, फाटक्या आयुष्याला आडोसा म्हणून, थळात आयुष्याचे गणित या सारख्या लक्षण भाषेचा वापर कवी काव्यातून करतो. रायभान दवंगे यांचा सहज भाषेचा वापर काव्यातून होताना दिसतो.

सय्यद अलाउद्दीन यांची लेखनाची भाषा पारंपारिक अभंग वळणाची असून त्याची भाषा प्रतिमा, प्रतिकांच्या माध्यमातून व्यक्त होते. सय्यद अलाउद्दीन यांनी काव्य लेखन भाषेतून यमक जुळवणे यासारखे प्रकार काव्यातून व्यक्त केले जातात. काव्यातील काही शब्द वैभव, भूक अग्नी, पडलेली आग, कशी लहा लहा करी, भाकरीचा लढा रखरख उन्ह, रखरख ऊन, रडे एकटीत माती, जाळही मुळळ, शाप, विलाप, झळाया, पोळाया या सारख्या शब्दाचा भाषेचा वापर कवीला या ऊसतोड कामगारांच्या कवितेतून केला आहे.

८) ऊसतोड कामगारांच्या कवितेतील कथन व संघर्ष स्वरूप

ऊसतोड कामगारांच्या कवितातून समाजाचं, निसर्गाचं परिस्थितीचं चित्रण येते. त्यांच्या कवितेतून येते. ऊसतोड कामगारांचे समाजाचे बालक, स्त्रियांच्या विविध समस्या या कवितेतून व्यक्त होतात. ऊसतोड कामगारांना येणारे अनुभव त्यांचे दु:ख या कवितेमधून येते. कैलास दौंड यांची ऊसाची कविता, माणसाच्या कविता ही पानापानातून तसेच ती मनातून येते. ऊसतोड कामगारांच्या विविध प्रसंग चित्रीत होतात.

रायभान दवंगे यांनी 'तांडा' या कथा काव्यातून ऊसतोड कामगार स्त्री मनातून कथन पद्धतीने स्त्राव पद्धतीने भावना कथन केलेली आहे. ऊसतोड कामगारांचे वेदना दु:ख, अनुभव व संघर्ष या कविता मधून व्यक्त होतो. ऊसतोड कामगारांना दारिद्रय, गरिबी, निसर्ग यांच्याशी संघर्ष करावा लागतो. निसर्ग यांना साथ देत नाही. त्यामुळे त्यांना ऊसतोडणीसारखे काम करावे लागते. त्यामुळे या ऊसतोड कामगारांचा बागायतदार, मुकादम व निसर्ग यांच्याशी संघर्ष चालू असतो. रायभान दवंगे यांनी कथा कवितेतून त्याचे

दर्शन घडविले आहे.

सय्यद अलाउद्दीन यांची कविताही ग्रामीण भागातील लोकांच्या भावभावना, यमक, अनुप्रासाच्या माध्यमातून ऊसतोडणी उचल त्यात स्त्री–पुरूष, बालके व गावाकडील आई–बाप यांच्या व्यथा, वेदना संघर्षाच्या माध्यमातून व्यक्त करतात.

९) ऊसतोड कामगारांच्या कवितेचे मुल्यमापन :

अल्पभूधारक, कोरडवाहू, शेतकरी व शेतमजूर यांचा शेती कामावर अवलंबून असणारा ऊसतोड कामगार यांच्या जीवनाचे दर्शन घडविणारी कविता ऊसतोडणी कामगार, त्यांचा परिसर, त्यांचे निसर्ग व समाजाने केलेल्या अन्याय, अत्याचार काव्याच्या माध्यमातून करणारी कविता १९८० च्या नंतर आलेली आहे. या कवितेच्या अभिव्यक्ती करणारे प्रमुख कवी भास्कर बडे, कैलास दौंड, रायभान दवंगे, सय्यद अलाउद्दीन, संजय डोरले, एकबाल पेंटर यांच्या काव्यामधून ऊसतोडणीसाठी निघण्याच्या प्रसंगापासून ते थेट ऊसतोडणीसाठी जाताना निघतानाचे जे भाव भावना यांचे प्रसंग हळूवार पद्धतीने कवींनी व्यक्त केले आहे.

कवी कैलास दौंड यांच्या ऊसाच्या कवितामधून निसर्ग, भावभावना, व्यथा वेदना, अंतरीचा उमाळा, ऊसतोड कामगारांच्या विविध समस्या कवितेच्या माध्यमातून व्यक्त झाल्या आहेत. सामर्थ्य पद्धतीने ही कविता व्यक्त झाली आहे.

रायभान दवंगे यांची 'तांडा' या कथा काव्यातून कविता समूहाची भाव भावना व्यथा, वेदना हळूवारपणे व्यक्त करते. एक कविता दुसऱ्या कवितेच्या संगतीने साखळी पद्धतीने कथा सांगावी त्या पद्धतीने कवीने ऊसतोड कामगार या समुहाचे दर्शन घडविले आहे.

सय्यद अलाउद्दीन यांनी 'उचल कोयता तोडीला' या काव्य संग्रहामधून ऊसतोडणी करणाऱ्या लोकांच्या भाव भावना व्यक्त केली आहे. शाळेत जाणाऱ्या मुलापासून ते ऊसतोड करणाऱ्या कामगारांच्या शेती, मातीचा संबंध कवितेतून त्यांनी व्यक्त केला आहे.

या ऊसतोड कामगारांच्या कवितेमधून कामगारांना येणारे अनुभव व्यक्त झाले आहे. शेती आणि त्यासंबंधाने ऊसतोडणी कामगार मुकादम, स्त्री, मुले त्याचे पशु यांचे वाङमयीन पातळीवर चिंतन व्यक्त झाले आहेत.

१०) समारोप

१९६० नंतर उदय आणि विकास पावलेल्या वाङ्मयीन प्रवाहात ग्रामीण साहित्य चळवळीत वाढलेले अनेक समाज घटक साहित्याच्या माध्यमातून चित्रीत होऊ लागले. त्यात ऊसतोड कामगारांची कवितांचा उदय झालेला आहे.

मराठी साहित्य प्रकारातील अत्यंत महत्वाच्या वाङमय प्रकार म्हणजे कविता आणि शेती व्यवसायावर अवलंबून असणारा शेतमजूर शेतकरी. काही काळ शेतीची कामे झाल्यानंतर जोडव्यवसाय ऊसतोडणी करू लागला. या समाजाचे साहित्याच्या माध्यमातून चित्रण करणारे काव्य म्हणजे ऊसतोड कामगारांच्या जीवनाचे चित्रण करणारे काव्यनिर्मिती होय.

या प्रकरणाचा विचार करताना ऊसतोड कामगारांच्या कवीच्या उदय विकास तसे या ऊसतोड कामगारांची जीवन जाणीव त्याचप्रमाणे त्याच्या वेदनांचा अविष्कार पाहून या ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाच्या समस्या तसेच या कवितांच्या संबंधाने त्यांच्या काव्यातील प्रेम व शृंगार भाव तसेच काव्यातील निसर्ग, भाषा, शब्द वैभव काव्यातील संघर्ष सव्प्न आणि वाङमयीन मुल्यमापन या प्रकरणात बघितले आहे. ऊसतोड कामगारांच्या कवितेचा विचार या प्रकरणात केला आहे.

पुढील प्रकरणात ऊसतोड कामगारांच्या स्त्रियांचे चित्रण कसे झाले आहे हे पाहणार आहे.

संदर्भ :

१)गजानन जाधव– संपादक –पोशिंद्यांची कविता – प्रकाशाक – सुनिल कानडकजे –प्र.आ.२०१०

पृष्ठ क्र. ८

२)डॉ. वसंत बिराजदार – सत्याग्रही विचारधारा– संपादक –कुमार सप्तर्षी जून २००१– पृष्ठ क्र.२४

३)कैलास दौंड –ऊसाच्या कविता– निळकंठ प्रकाशन पुणे–प्र.आ.२००१– पृष्ठ क्र. ११

४)तत्रैव – प्रष्ठ क्र .१२

५)तत्रैव – प्रष्ठ क्र .१३

६)रामभान दवंगे – तांडा –स्वरूप प्रकाशन औरंगाबाद– प्र. आ.२००५ – पृष्ठ क्र. ६९

७)तत्रैव – पृष्ठ क्र. ७१

८)सय्यद अलाउद्दीन –उचल कोयता तोडीला –दिलजान प्रकाशन –आष्टी– प्र.आ.२०१०– पृष्ठ क्र. १

९)तत्रैव– पृष्ठ क्र. ४६

१०)तत्रैव– पृष्ठ क्र. ४७

११)तत्रैव– पृष्ठ क्र. २३

१२)रामभान दवंगे – तांडा –स्वरूप प्रकाशन औरंगाबाद– प्र. आ.२००५ – पृष्ठ क्र. ९२

१३)तत्रैव – पृष्ठ क्र. २१

१४)कैलास दौंड –ऊसाच्या कविता– निळकंठ प्रकाशन पुणे–प्र.आ.२००१– पृष्ठ क्र. ४२

१५)तत्रैव

१६) सय्यद अलाउद्दीन –उचल कोयता तोडीला –दिलजान प्रकाशन –आष्टी– प्र.आ.२०१०–

पृष्ठ क्र. २७

१७)तत्रैव –पृष्ठ क्र. ११

१८)रामभान दवंगे – तांडा –स्वरूप प्रकाशन औरंगाबाद– प्र. आ.२००५ – पृष्ठ क्र. १३

१९)तत्रैव – पृष्ठ क्र. १६

२०)तत्रैव – पृष्ठ क्र. १७

२१)कैलास दौंड –ऊसाच्या कविता– निळकंठ प्रकाशन पुणे–प्र.आ.२००१– पृष्ठ क्र. ४०

२२)रामभान दवंगे – तांडा –स्वरूप प्रकाशन औरंगाबाद– प्र. आ.२००५ – पृष्ठ क्र. ३४

२३)सय्यद अलाउद्दीन –उचल कोयता तोडीला –दिलजान प्रकाशन –आष्टी– प्र.आ.२०१०–
पृष्ठ क्र. ७

२४) डॉ. वसंत बिराजदार – सत्याग्रही विचारधारा– संपादक –कुमार सप्तर्षी जून २००१– पृष्ठ क्र. २४

२५)कैलास दौंड –ऊसाच्या कविता– निळकंठ प्रकाशन पुणे–प्र.आ.२००१– पृष्ठ क्र. ९

२६)तत्रैव – पृष्ठ क्र. १६

२७)रामभान दवंगे – तांडा –स्वरूप प्रकाशन औरंगाबाद– प्र. आ.२००५ – पृष्ठ क्र. ६३

२८)सय्यद अलाउद्दीन –उचल कोयता तोडीला –दिलजान प्रकाशन –आष्टी– प्र.आ.२०१०–
पृष्ठ क्र. ५

२९)तत्रैव – पृष्ठ क्र. १८

प्रकरण चौथे

ऊसतोड कामगारांचे साहित्यातील स्त्री चित्रण

प्रकरण चौथे
ऊसतोड कामगारांचे साहित्यातील स्त्री चित्रण

१) कथा कांदबरीतील स्त्री ऊसतोड कामगारांचे चित्रण.

२) ललित लेखनातील स्त्री ऊसतोड कामगारांचे चित्रण .

३)आत्मकथनातील स्त्री ऊसतोड कामगारांचे चित्रण.

४)काव्यातील स्त्री ऊसतोड कामगारांचे चित्रण.

५)सामाजिक संशोधनातील स्त्री ऊसतोड कामगार.

६)स्त्री ऊसतोड कामगारांचे साहित्याातील मुल्यमापन

७)समारोप

प्रस्ताविक :

आधुनिक मराठी वाङ्मयाच्या प्रारंभापासूनच नव्हे तर मराठी साहित्याच्या निर्मिती प्रक्रियेत प्रारंभापासून स्त्रियांनी विविध वाङमय प्रकारांच्यामधून स्व अभिव्यक्ती केली आहे. स्त्रियांनी सर्वच वाङमय प्रकार हाताळलेले आहेत. किंबहुना साहित्य हा समाजाचा आरसा असून या साहित्यामधून समाजातील सर्वच घटकांना स्थान असते. तसे मराठी साहित्य लेखन असो किंवा त्यांच्यासंबंधी बरे वाईट लेखन मराठी साहित्यात प्रारंभापासूनच होत आहे.

म.फुले यांनी मुलींची पहिली शाळा काढली आणि मुलींना शिक्षण मिळू लागले. प्रतिगामी विचारांचे लोक स्त्रियांना शिक्षणाची मूभा देत नसत. परंतु कालांतराने उच्च वर्गातील स्त्रियांनी प्रारंभी व नंतर समाजातील सर्वच घटकातील स्त्रियांनी शिक्षण घेतले आणि साहित्याच्या क्षेत्रात त्यांनी योगदान दिले आहेत. सावित्रीबाई फुले, लक्ष्मीबाई टिळक, मालतीबाई बेडेकर या व यांच्यासारख्या असंख्य स्त्रियांनी साहित्याची निर्मिती केली आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये समाजातील प्रत्येक घटक त्यात दलित व स्त्री यांना प्रारंभापासून शिक्षणात स्थान नव्हते. किंबहुना याच्या संबंधाने ओघाने लेखन झाले. सामाजिक प्रबोधन करण्याच्या हेतूने लेखन करतानाही प्रारंभी आज्ञाधारक, खानदानी, घरंदाज अशा पद्धतीची स्त्री प्रारंभी मराठी साहित्यात दिसते म्हणजे शोषण होत असणारी स्त्री साहित्या माध्यमातून येऊ लागली. परंतु स्त्री एक माणूस आहे त्यांच्या काही व्यथा, वेदना, समस्या असतात. म्हणून स्त्रियांचे प्रश्न केंद्रभूत मानून स्वातंत्र्योत्तर कालखंडात लेखनाला प्रारंभ होऊन मराठी साहित्यातील स्त्री दु:ख नव साहित्याच्या माध्यमातून काही प्रमाणात केलं आहे. परंतु स्त्रियांच्या व्यथा मांडण्यासाठीच हे लेखन लेखकांनी केले आहे असे सांगता येणार नाही.

१९६० नंतरच्या विविध वाङमयीन प्रवाह उदय व विकासाचा विचार करताना असे लक्षात येते की, सर्वसामान्य माणूस साहित्य लेखनाचा विषय झाला.

शेतकरी आणि तो ज्याच्यावर अवलंबून आहे अशा शेतकऱ्याचा, ज्यांच्याशी संबंध येतो त्यात शेती, निसर्ग यांच्यावर अवलंबून असणारे यांचा विचार साहित्याच्या माध्यमातून केला जातो. ग्रामीण साहित्य चळवळीच्या अनुषंगाने शेतकरी, शेतमजूर यांनी जे नवे नवे व्यवसाय निर्माण करून त्याचा साहित्यावर झालेला परिणामाचा विचार करावा लागतो.

शेती व्यवसायाचा उद्योग जगताशी संबंध येऊन उद्योगाचे क्षेत्र त्यात साखर उद्योग वाढ झालेला आहे. या उद्योगाचे ऊस लागवड ऊसतोडणी व्यवसायावर अवलंबून असणार कामगारांचा उदय झाला.

शेतीच्या आधुनिकीकरण, जागतिकीकरणचा परिणाम शेतीवर होवून शेती आणि समाज व साहित्य यांचे परस्पर संबंध आहेत त्याचे चित्रण साहित्यामधून होऊ लागले. १९७० च्या आसपास ग्रामीण भागातील ऊसतोडणी समाजाचे चित्रण साहित्यातून येऊ लागले. त्यातील एक दुर्लक्षित समाज समूह त्यांच्या व्यथा, वेदना, समस्या या सारख्याच असून शेतमजूर, शेतकरी, अल्प भूधारक शेतकऱ्याच्या विविध पैलूंबरोबर त्यांच्यातील अत्यंत महत्वाचा घटक स्त्री ऊसतोड कामगार असून त्यांच्या शोषणाचे चित्रण काही प्रमाणात आलेले आहे. ऊसतोड कामगारांना सतत विविध प्रकारे गरजा त्यातील आर्थिक गरजेपोटी त्यांना असाह्यपणाने अपमान सहन करावा लागतो. स्त्री ऊसतोड कामगारांचा कोंडमारा झालेला असतो.

स्त्री ऊसतोड कामगार ही प्रत्यक्ष घरातील आणि घराबाहेरील या दोन्ही ठिकाणी तिची हेटाळणी होते. गुलामगिरीचे जीवन त्यांना जगावे लागते. सतत अपमान, लैंगिक शोषणाचे बळी, अनेक वेळेस त्यांना आमिषाला बळी पडावे लागते. त्यातून त्यांना भ्रष्ट आचरणाचा बळी व्हावे लागते. गरिबी, लाचारीमुळे या स्त्रियांना अनेक समस्या त्यातील प्रमुख समस्या म्हणजे आरोग्य, बाळंतपण, गरोदरपण सतत श्रमाचे काम करणे आणि घराच्या बाहेरच्या लोकांच्या या स्त्रियांवर अन्याय करणारे चित्रण ऊसतोड कामगारांच्या साहित्यातून होत आहे. मराठी साहित्यातून स्त्री ऊसतोड कामगार स्त्रीचे चित्रण विविध वाङमय प्रकारातून कसा झाला हे पाहणे आवश्यक आहे.

१) कथा कादंबरीतील स्त्री ऊसतोड कामगारांचे चित्रण

स्त्री ऊसतोड कामगारच्या व्यथा, वेदना, प्रश्न प्रथम श्रीराम गुंदेकर यांनी त्यांच्या कथामधून मांडल्या आहेत. मराठीतील अत्यंत महत्वाचे कथाकार म्हणून त्यांना ओळखले जाते. श्रीराम गुंदेकर यांच्या कथामधून ऊसतोड कामगारांच्या स्त्रियांच्या संबंधी विवेचन करताना डॉ.मनोहर सुरवाडे यांनी श्रीराम गुंदेकरांच्या कथा संबंधी लिहिताना म्हटले आहे की, '' ऊस तोडताना एका स्त्रीला विळा लागून भडाभडा रक्त वाहते. याची दखल कोणी घेत नाही. उलट मुकादम लेकूरवाळ्या बायांना मुलांना स्तनपान करू देत नाही ते मूल रडून अर्धमेलं होऊन मरतं. ट्रक पहारा करणाऱ्याचा अपघात होतो. एक स्त्री ट्रकखाली चेंगरून

मरते. ट्रकवाले कोयतेवाल्यांच्या मुलींना फसवून लूटतात. ''[१]

'उचल' कोयतेवाले या श्रीराम गुंदेकरांच्या कथेतील स्त्रियांना ज्या समस्या येतात त्यातून त्यांचे शारिरीक, मानसिक कुचंबना होते. भास्कर बडे यांच्या कथा काठी, अंजीमाय या सारख्या कथामधून ऊसतोड कामगार स्त्री विधवा असून ही नेटाने संसार करते. विठ्ठल जाधव यांच्या कथामधून बालवयात लग्न झाल्यामुळे त्यांना नवऱ्याकडून मारहाण, विविध आरोपांना सामोरे जावे लागते.

सरदार जाधव यांच्या 'कोयता' कादंबरीत निवेदकाची आई सातत्याने कष्ट करणारी स्त्री आहे. नवरा, मुले, सासु–सासरे यांची चिंता करणे त्यांच्या सर्व गरजा पूर्ण करणे आपल्या नवऱ्याला सतत मदत करणारी, स्त्री शेतकरी, स्त्री कामगार नवऱ्याला साथ देणारी स्त्री सरदार जाधव यांनी चित्रीत केली आहे. ऊसतोड कामगारांच्या तरुण, मुली, स्त्रीला अनेक वाईट प्रसंगांना सामोरे जावे लागते. त्यातील प्रसंग कोयता मध्ये पुढीलप्रमाणे चित्रीत झालेला आहे.

''दळण दळून झाल्यावर आम्ही खोप्याकडे निघालो. गावात जाण्या येण्याचा रस्ता ऊसातून व्हता. कवानंच ऊसातून दोन पोरं आडवी झाली काई म्हणा बोलायच्या आत त्येंनी नंदीला ऊसात धरून वढलं. तिच्या डोक्यावरची दळणाची पाटी खाली पडली. नंदीच्या ओरडण्याचा आवाज येत होता मग मी घाबरून रडाया लागलो.''[२] ऊसतोड कामगारांच्या तरूण मुलींवर प्रसंगी बलात्कार होतात. त्यांच्या असाह्यतेचा फायदा घेतला जातो. अशे जीवघेणे अनुभव ऊसतोडणी कामगारांच्या तरूण मुली स्त्रियांना कायम येतात.समाजात या स्त्रीया संबंधी भरपूर गैरसमज असतात.

ऊसतोड कामगारांच्या स्त्रियांना त्या वाईट वळणाच्या असाव्यात अशा प्रकारचा त्रास लोकांचा होतो. त्यातून त्यांच्याकडे वाईट नजरेने पाहणे, प्रसंगी त्यांच्याकडे सरळ शरीर सुखाची मागणी घालण्यासारखे प्रकार होतात असेही काही प्रसंगी 'हिरवा डोंगर' या दिनकर जायभाये यांच्या कादंबरीतील प्रसंग पुढीलप्रमाणे.

''आन्सान भांडे बासनं लोखांडाच्या बादलीत घातले बाजाराच्या हौदावर गेली तिच्याजवळ एक पोरगं आलं चलायचं का?

तिनं न्हायी ऐकल्यावाणी केलं त्ये पोरगं पुन्ना म्हणलं

तुलाच म्हणलं चलायचं का?

'कडं' तिने त्याची गंमत पाहाली

त्याला वाटलं पाखरू त्याच्यातलंच दिसतंय

त्या पलीकडच्या अंधारात दोन

'डोल्या' मघाच्या धरून तुझी गंमत बघते. तुझ्या आयी बहिणीला घेऊन जा तिकडं चुलीत घाल. इकडे ये वहाणाच्या फटक्यात दाखीते तिकडं कुठं निघालास. तुला अशी–तशी वाटले काय? आमची घाम गाळून खाणाराची जात है। काय समजतोस उभा ऱ्हा ''[३] हिरवा डोगंर कांदबरीत स्त्रीला शरीरसुखाची मागणी घालणारे त्यांच्या वाईट हेतूने बघणारे यांचा अनुभव स्त्रियांना येतो.

ऊसतोड कामगारांच्या स्त्रियांना सातत्याने अशा प्रसंगांना सामोरे जावे लागते. या स्त्रिया म्हणजे असाह्य आहेत. त्या सर्व अशाच असतात अशी धारणा लोकांची होते आणि आसुसलेल्या मनाने या स्त्रियांकडे लोक अनेक वेळेस शरीर सुखाची मागणी घालतात.

मुळात या स्त्रिया कर्तबगार असून पुरूषापेक्षा जास्तीचे कष्ट करतात. इज्जतीने कमवणे, काम करणे सर्वांचा सांभाळ करणे ही कामे या स्त्रिया करतात. ऊसतोड कामगार स्त्रियांना केवळ बाहेरच्या पुरूषाचाच त्रास होतो असे सांगता येणार नाही तर या स्त्रियांचे अल्प वयात विवाह होतात. जास्तीचे काम करणे किंवा या स्त्रियांवर त्यांच्या घरचे संशय घेतात आणि त्यांना सातत्याने मारहाण होते. त्यांना सोडून दिले जाते.परित्यक्त्या स्त्रियांना पुन्हा आई–बाप भाऊ यांच्याकडे कामेच करावी लागतात. तर अशा परित्यक्त्या स्त्रियांना त्यांच्या घरचे विनाकारण मारहाण करतात. 'हिरवा डोंगर' मध्ये एक स्त्री आपल्या भावजयीस तिला झालेल्या मारहाणीचे गाऱ्हाणे पुढीलप्रमाणे सांगते.

''वयनी लई मारलं ओ. मव्हा काहीच गुना नवता, ऊसानं असं बदाडलं. दुसरे लोक सोडायला आल्ते. त्या त्यांना म्हणला. जो मधी येईन त्याचा मुडदा पडन. दोन दिवसापासून प्वाटात आन्नाचा कन न्हायी. कोपीत पडून व्हते. म्या पाण्याचा गुळनाबी केला न्हायी. मला घरातल्या कुणी इच्चारले न्हायी''[४] संशयी प्रवृत्तीमुळे कामाचा ताण त्यातून स्त्रियांवर राग काढण्याची सवयच या लोकांना पडते. दुसरे कुणी तरी त्यांना खोटं सांगतात आणि हे लोक संशय पणाने त्या स्त्रियांना सातत्याने छळत असतात.

परित्यक्त्या स्त्रियांना तात्काळ सोडचिठ्ठ्या घेवून पुन्हा त्यांचे विवाह लावले जातात. परंतु अशा परित्यक्त्या स्त्रियांचे पुन्हा विवाह केले तरीही त्यांना कोणत्याही प्रकारचा फरत पडत नाही. त्यांना केवळ तेथेही जाऊन परिश्रम करावे लागतात. त्यांच्या जीवन जगण्याच्या पद्धतीमध्ये कोणताही फरक पडत

नसतो. त्यांच्या कष्टात कोणताही फरक पडत नसतो असे अनेक प्रकरण या लोकांच्या आयुष्यात घडत असतात.

ऊसतोड कामगारांच्या तरुण मुली या ड्रायव्हर लोकांच्या भूलथापांना बळी पडतात. लोकांच्या जनरेट्यापुढे विवाह होतात. परंतु या मुलींना त्यांचे नवरे चांगले नांदवत नाही अशा घटना अनेक कादंबरीमधून येतात. कैलास दौंड यांच्या 'पाणधुई'मध्ये शोभा नावाच्या तरुणाची कहाणी आलेली आहे. तसेच पाथर्डी तालुक्यातील 'कोठेवाडी' प्रकरण त्यात गावातील वयस्कर स्त्रियांवर झालेले लैंगिक अत्याचार या वास्तव घटना, प्रसंग लेखकाने या कादंबरीत घेतलेले आहेत.

योगिराज वाघमारे यांनी 'धुराळा' कादंबरीत घरी शेती असूनही माणसं ऊसतोडीला जातात अन् सैरभैर होतात. हातात काहीच पडत नाही. नेहमी उपासमार आणि ऊसतोड कामगार स्त्रीची घुसमट होतानाचे चित्रणे त्यांच्या कादंबरीत येते.

ऊसतोड कामगार स्त्रिया आठवड्यातून एखाद दिवस आंघोळ करण्यासाठी बसतात. त्यांना आडोसा नसतो. उघड्यावर आंघोळीला स्त्रिया बसल्या की त्यांना येणारे-जाणारे त्याच्या देहाकडे बघणारांच्या नजरांचे चित्रण शृंगारीत चित्रण त्यांनी केले आहे. ऊसतोड कामगार दिसल्या की त्यांना सातत्याने शीळ देणे, त्यांच्याकडे वाईट हेतूने बघणे याचे चित्रण 'धुराळा' मधून योगिराज वाघमारे यांनी पुढीलप्रमाणे केले आहे.

''गारभरली मुडदा पिलिगाचा गड्डला उठला त्याला'

काय गं कुणाला शाऽ देतेस?

सुदाम लटकंच म्हणाला तशी ती गप्पच.

पण चेहरा मात्र रागानं लालबुंद झालेला

रागानं तिला बोलता येत नव्हतं आणि नाही बोलावं तर नवऱ्याला संशय येईल म्हणून तिला कोंडल्यासारखं झालं.

व्हय? कुणाला श्याऽ देतेस?

तशी ती रडकुंडीला येऊन म्हणाली. म्या इराकतीला कोपीमागं घेले.

हां

अशी बसणार तर कोण तरी मुडदा शीळ वाजवू लागला ''अन् तिला रडायला आलं''[५] ऊसतोड कामगार स्त्रियांना आंघोळ करण्यासाठी किंवा लघवी करण्यासाठी थोडं बाहेर गेलं की परिसरातील वाईट नजरेच्या लोकांचा सामना करावा लागतो.सतत त्यांच्या पाळतीवर असल्यासारखे अवती भोवती परिसरातील पुरूषांच्या नजरा स्त्री भोवती असतात.

भास्कर बडे यांच्या 'पाणकणसं' या कादंबरीत विविध प्रकारच्या स्त्रियांची चित्रण येतात. रोजगार हमी, तलावावर पाणी वाटप करणाऱ्या स्त्रिया तरुण मुलींचा उपयोग तेथील मुकादम कसे करतात. तसेच त्यांचे शृंगारीक वर्णन त्यांनी केलं आहे. ऊसतोडणी करणारे किंवा ग्रामीण भागातील स्त्रियांना हे लोक कोणत्या दर्जाने वागवतात याचे चित्रण 'पाणकणसं' मध्ये पुढीलप्रमाणे येते.

''आज कृष्णबाबा कशामुळं बायकोवर चिडला होता कायनू. त्याची बायको मोठ्यानं रडत–इवळत होती. रस्तावरून जाणाऱ्या बाया आपसात कसं मारलं ते सांगत. हे त्या मी आपंल कान देवून ऐकत होतो. कृष्णबाबाच्या बायकोनं दुपारची भाकरी रानात आणली नव्हती म्हणून तिला मारहाण करत होता. तिचं आंग सोलून काढलं हातातल्या चाबकानं बायकोला लालीलाल करून टाकलं. वरतून कडब्याचं चिपाट जवळपास दहा फुटापर्यंत लांबीचं अखंडपणे तिला चाबकाच्या ठोक्यासोबत खायाला लावलं. त्यामुळं वाड्यावर रडारडीचा आवाज येत व्हता. मला तरी वाटतं बायकोचे फार लाड करू नयेत. बायको अन् चप्पल ह्या जावाजावा आहेत.''[६] ऊसतोड कामगारांच्या स्त्रियांना असे सातत्याने मारहाण करणे आणि त्यांचा दर्जा म्हणजे पायातील चप्पल सारखा असण्याची भावना या लोकांच्या मनात असते. स्त्रियांना हिन वागनूक सतत मिळते.

मुळात ऊसतोड कामगारांच्या स्त्रिया या सातत्याने श्रम करणे, आपला नवरा, मुलगा, कुटुंबासाठी सतत काम करणे नवऱ्याला संसारात साथ देण्याचे काम या स्त्रिया करतात. तरी त्यांना समान वागणूक मिळेलच असे सांगता येणार नाही.

रायभान दवंगे यांच्या 'प्रहार' कादंबरीतून ऊसतोड कामगार स्त्रिया आणि त्यांच्यावर वाईट नजरेने पाहणारे वागणारे मुकादम, बागायतदार यांच्या सतत नजरा या स्त्रियांकडे वाईट हेतूने बघणाऱ्या आहेत याचे चित्रण येते. 'प्रहार' कादंबरीत मुकादमाचे स्वभाव, हावभाव, वर्तनाचे चित्रण पुढीलप्रमाणे येते.

''थळात आल्यावर कांबळे चार मिनाराचे झुरके घेत सतत त्या दोघींकडे पाहत बसायचा. सारजीला

त्याचा खुप राग यायचा पण विलाजच नव्हता. ती मनातून घाबरायची. त्यावेळी तिच्या मनात विचार यायचे. पोरीची जात कांद्याच्या पातीसारखी असतीया हात लावणारानी ती खुडावी वाटतीया, सुशी तर नुकतीच वयात आल्याली हाय''[७] तरूण मुली बायकांची अशा प्रकारे लैंगिक पिळवणूक घढते.त्यांना मुलींची काळजी करण्याशिवाय पर्याय नसतो.

या कादंबरीत बागायतदार पाटील व गावातील टगे तरुण त्रास देतात यालोकांच्या झोपड्या जाळतात. ऊसतोड कामगार तरुण स्त्रिया व मुलींना सतत विविध प्रकारे त्रास दिला जातो.

समकालीन लेखपापैकी अत्यंत महत्वाचे लेखक म्हणजे बाळासाहेब गर्कळ होय. त्यांनी 'उचल' कादंबरी मधून ऊसतोड स्त्री 'कजरा' सारख्या तरुण मुलींची कहाणी लिहिली आहे. तरुण मुलीचे विवाह झालेला आहे. पण नवरा दुसऱ्याच मुलीच्या नादी लागतो. नवरा तिला नांदावयास नेतो परंतु केवळ 'कोयता' ऊसतोडणी कामगार म्हणूनच तिचा उपयोग करण्याचा प्रयत्न करतो. ऊसतोड कामगाराची एकुलती एक मुलगी तिच्या भोवती ही कादंबरी असून नवऱ्याच्या त्रासामुळे तिला आत्महत्या करावी लागते.

बाळासाहेब गर्कळ यांनी या कादंबरीत विविध पूरक कथानक लिहिली असून यात ऊसतोड कामगार स्त्रिया व त्यांचे व्यसनी नवरे, यांच्या परस्परातील स्वभावचित्रे त्यात व्यसनी नवरा आणि दुसऱ्याच मुकादमाकडे ऊसतोडणीच्या कामासाठी जाण्याचा हट्ट धरणारी ऊसतोड कामगार स्त्री यांचे चित्रण बाळासाहेब गर्कळ यांनी पुढीलप्रमाणे केले आहे.ऊसतोड कामगार स्त्री तिच्या नवऱ्याला म्हणते

'भाड्या दररोज मुताचा ढोस पिवूनशिनी येवून महापाशी रूबाब चोदितू व्हय. म्या म्हंते त्या शंकर मुकादमाची उचल मांग देवून टाक गुमानं. म्या जाणार हाय शिवा मुकादमा मांग''[९] पण तिचा नवरा म्हणतो तुला त्याच्याकडं जावं वाटतंय त्यातून नवरा–बायकोत सतत भांडणं होतात.

ऊसतोडणी काम करणाऱ्या स्त्रियांनी त्यांच्या व्यसनी नवऱ्यांना कितीही समजावून सांगितलं तरी हे लोक ऐकत नाहीत. परंतु दुसरा मुकादम म्हटला की ते स्त्रियावर संशय घेतात. नवरे दारू पितात, पत्ते खेळतात आणि त्याचा खूप त्रास या स्त्रियांना होतो. व्यसनिपणामुळे सतत कर्जबाजारीपणा त्यांच्यात असतो.

लोकांना पोटाचा प्रश्न अत्यंत महत्वाचा असल्यामुळे पैशाच्या स्वरूपात 'उचल' घेतात. त्यातून त्यांना लाचारीला सामोरे जावे लागते. सतत कर्जात राहणारे ऊसतोड कामगार स्वत:च्या स्त्रियांचा विविध प्रकारे छळ करतात.

शांता जोशी यांनी 'गव्हाणी कादंबरी' ही लहान, मुली आणि स्त्रियांच्या प्रश्नांना केंद्र बिंदू मानून लेखन केलेली कादंबरी असून ऊसतोड कामगारांचे चित्रण या कादंबरीत येते. या कादंबरीत स्त्री प्रश्नाची चर्चा भरलेली आहे. लहानपणीच आई मरण पावलेली, मुलगी सुशीला मावशीकडे राहते या मुलीच्या सभोवतीही कादंबरी फिरत राहते. सुशिला मावशीजवळ पडल्या पडल्यां आईचे स्वरूप पुढीलप्रमाणे आठवते.

''सतत पोटुशी असणारी माय तिला डोळ्यासमोर दिसत होती. खोल–खोल दिसणारे तिचे डोळे लांब मोठे, कान हातापायाच्या ऊसऱ्या गाडीचं लूगडं, फाटकी चोळी, न विंचरलेले केस, कुठंतरी हरवलेली नजर, कामानं झपाटलेली माय कधी हसलेली तिनं पाहिलीच नव्हती. सुशिला आपल्या आईची आठवण काढते ती आपली मावशीच्या बरोबर ऊसतोडीला जाते बिन आई–बापाची मुलगी शिक्षण घेण्यासाठी धडपडते. या कादंबरीत स्त्री प्रश्नाची ऊसतोडणी कामगारांच्या जीवन चित्रणातून सतत तिला झालेली मारहाण सुरू असतानाही स्त्रीच दिसते. दारूचे व्यसन करणे व बायकांना मारहान चालू असते.गव्हाणी कांदबरीमध्ये सातत्याने बायकांना मारणाऱ्यांचे चित्रण शांता जोशी करतात. ऊसतोड कामगार स्त्रीच्या मारहाणीचे चित्रण पुढीलप्रमाणे.

''सरस्वतीच्या खोपटातून आवाज यायलाय असं म्हणून पारू मावशी आणि सुशिला तिकडे धावल्या. सरस्वतीचा नवरा आनंदा लाथा–बुक्क्यांनी तिला मारत होता. वेदना असह्य असलेली सरस्वती जीवाच्या आकांताने ओरडत होती. केस अस्ताव्यस्त झाले होते. पदराचं भान नव्हतं. दातातून रक्त येऊन ओठावरून ते खाली गळत होते. रडताना गळ्याजवळील शिरा तरतरून जात होत्या. दारूनं बेभान होवून तो मारत होता. तोल जात होता. तरी तसाच तो तिला लाथेनं मारत होता''[१०] गव्हाणीमधील स्त्रियांना नवऱ्याचा होणारा त्रास त्यांची सतत काम धाम आणि मुलांना जन्म देणं चालू असलं तरी सातत्याने पुरूषाकडून त्यांना होणारा त्रास या कादंबरीत चित्रीत झाला आहे. सुशिला स्त्रियांच्या संबंधीचे विचार व्यक्त करते.

''सुशिला म्हणाली, मावशी बाया काम करतात. उठायचं, झाडायचं सारवायचं, पाणी भरायचं, भाकरी–कोरड्यास करायचं, लेकरांना अंगुळी घालायच्या, ताप आला असन तं औसद आणायचं, जळणफाटा आणायचा, मीठ मिरचू बाजरी ज्वारी आणायची, दळण आणायचं, पोरांना खाऊ घालायचं अन् राती पिवून

आलेल्या नवऱ्याच्या लाथा खायच्या. जरा तोंड उघडलं की तुमची अक्कल चुलीत उलटून बोललीस तर दात पाडीन. नायतं आपला रस्ता सुदरा, दुसरी करीन. पोरीचं पोरी झाल्या ते पोरीची माय म्हणून दुसरी करून आणणार अशी तं गतंय बायांची.''[११] सुशिला तिच्या मावशीला स्त्रियांच्या व्यथा,वेदना,दु:खा बद्दल मनातील व्यथा व्यक्त करते. 'गव्हणी'कादंबरीत शांता जोशी यांनी स्त्रियांच्या दु:खाच्या वेदनेच्या विविध पैलूंचा शोध घेतला आहे. 'गव्हाणी' त ऊसतोड कामगारांच्या प्रश्नाची चर्चा झाली आहे.

कथा, कादंबरी, वाङमय प्रकारात ऊसतोड कामगार स्त्री त्याच्या समस्यांचे चित्रण कधी वाईट कधी चांगलं त्यांना मोहाला बळी पडून स्वत:ला बरबाद होताना पहावं लागतं. केवळ कामाशिवाय अवहेलना शिवाय त्यांच्या वाट्याला काही येत नाही. सतत घरचे बाहेरचे पुरूष स्त्रियांना छळतात.या सर्व व्यथा वेदनांचे चित्रण कथा–कादंबरी मधून येते.

२) ललित लेखनातील स्त्री ऊसतोड कामगार :

ऊसतोड कामगारांच्या जीवनाचे अंतरंग जाणण्यासाठी त्यांच्या जीवन चित्रणाचा वेध घेताना स्त्री जीवनाचे चित्र झालेले आहे. स्त्री ऊसतोड कामगारांच्या कडे समजाचा व इतरांचा दृष्टिकोन संकुचित असून स्त्री ही माणूस आहे आणि तिला माणसासारखे जगू दिले पाहिजे अशी भावना समाजात निर्माण झाली पाहिजे. ग्रामीण भागात शेतीवर अवलंबून असणारा कामगार ऊसतोड कामगार म्हणून सहकुटुंब ऊसतोडणीसाठी जातो. पुरूषांना कष्टाची कामे करावी लागतात. आर्थिक विवंचनेतून तसेच त्याचे जीवन म्हणजे प्रश्नच असतात. त्यांचा संबंधी साहित्याच्या विविध वाङमय प्रकारामध्ये ऊसतोडणी कामगारांचे जीवन चित्रण झालेले आहे.

नारायणराव मुंडे यांनी 'मागे फिरा पतंगांनो' या ललित लेखनातून ऊसतोड कामगारांचे विविध अंगाने चित्रण केले आहे. या ललित लेखनातून ऊसतोड कामगारांच्या एकूण सामाजिक, राजकीय, आर्थिक, मानसिक परिस्थिती मांडली आहे. ऊसतोड कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य त्यांनी लेखनातून केले आहे.स्त्रियांच्या संबंधाने अनेक प्रश्न डॉ.नारायणराव मुंडे यांनी मागे फिरा पंतगांतून चित्रीत केले आहे.

ऊसतोड कामगार स्त्री, या ललित लेखनातून येते. या स्त्रियांचा समाजाकडून व स्वत:कडून कशी अवनती घडते याचे दर्शन त्यांनी घडविले आहे.

तरुण, मुली, स्त्रिया, मुकादमांच्या संपर्कात येऊन त्यांच्या बरोबर संबंध प्रस्थापित करतात अशी एक भावना त्यांनी ललित लेखनातून व्यक्त केली आहे. माणसाला गरिबीमुळे स्त्रियांच्या असहायपणाचा फायदा मुकादम घेतात तथा कधी कधी या ऊसतोड कामगार स्त्रिया स्वत:च मुकादमाच्या प्रेमात पडतात. या लाचारीचे चित्रण नारायणराव मुंढे यांनी या ललित लेखनात केले आहे. मुकादमाने सांगितलेले अनुभवाचे चित्रण लेखक पुढीलप्रमाणे करतात.

''मुकादमानं त्या केजातल्या रंगीची गोष्ट सांगितली. एकदा रंगी आजारी पडली. नवरा संध्याकाळी मुकादमास म्हणाला. मुकादम उद्या रंगिला दवाखान्यात नेऊन इंजेक्शन द्या. आजारी बाया–मुले मुकादमाला दवाखान्यात न्यावे लागतात.

रंगीला दवाखान्यात नेले, डॉक्टर आले नव्हते. २ तासाने येतील असे सांगितले. थोड्या वेळात रंगीला हीव आले. ती धडाधडा उडायला लागली. तिनं आवाज दिला. मुकादम हीव आलंय पांघरूण टाका. पांघरूण टाकूनही हीव राहिना. रंगीने सांगितले अंग चोपा बरं वाटलं. मुकादमाने सर्व अंग चोपलं. मुकादमाला संकोच वाटला. रंगीनं सांगितले. मुकादम संकोच वाटला. रंगीने सांगितलं, मुकादम लाजू नका खरं तर छातीच भरून आली चांगली चोपून काढा. मही शपथ आहे. लाजू नका. तुमचं उपकार नाही ठेवायची मी फेडून टाकीन. बहाद्दूर बाई आहे मी गावातल्या लोकांना विचारा सगळं. अशा वेळी मुकादमानं गुलाम व्हावं लागतं''[१२] ऊसतोड कामगारांच्या स्त्रीच्या मुकादमाच्या संपर्काच्या अशा अनेक गोष्टी त्यांनी लिहिल्या आहेत. ऊसतोड कामगारांना सर्व समजून कधी कधी लाचारीने रहावे लागते. असे विविध अनुभव व्यक्त होतात.

आणखी एक अनुभव नारायणराव मुंढे यांनी पुढे चित्रित केला आहे. ऊसतोड मजुराची तरुण मुलगी मुकादमाच्या संपर्कात येते. ऊसतोड कामगाराची मुलगी स्वत: विठ्ठल मंदिरात जावून त्या मुकादमाबरोबर विवाह करते. त्यात मुकादमाची कोणतीच चूक नाही अशी भावना ते व्यक्त करतात.

नारायण मुंढे यांनी उच्च शिक्षण घेतलेले मुलाला व सून ऊसतोडणीसाठी पाठवावे लागते. आज शिक्षण घेतलेले तरुण–तरुणी नौकरी न मिळाल्यामुळे ऊसतोडणीसाठी जातात. सीताराम व नंदा हे शिक्षण घेतलेले जोडपे नोकरी न मिळाल्यामुळे नापिकी शेतीच्या उत्पन्न न मिळाल्यामुळे ऊसतोडणीसाठी जातात. त्यांना केंद्रबिंदू मानून त्यांचे अनुभव चित्रण प्रकरण निहाय डॉ.नारायणराव मुंढे यांनी केले आहे.

भ्रूणहत्या या प्रकरणात त्यांनी नंदाचा एक अनुभव लिहिला आहे. गर्भधारणा झालेल्या नंदा तो अनुभव पुढीलप्रमाणे लिहिला आहे.

''एके दिवशी ऊस तोडून सीताराम व नंदा गाडीत ऊसाच्या मोळ्या लादत असताना अचानक नंदाच्या ओटी भागात पोटात चमका निघावयास लागल्या. पोटात तीव्र वेदना सुरू झाल्या. या त्रासामुळे नंदा थोडा आराम करण्यासाठी बाजूस थांबली व होणाऱ्या त्रासाबद्दल तिने सीतारामास सांगितले.''[१३] ऊसतोड करणाऱ्या अशा प्रकारचे नवतरुण स्त्रियांना सातत्याने त्रास होतो आणि नंदास दवाखान्यात पाठवतात. ऊसतोड कामगारांच्या तरुण–स्त्रियांना गर्भधारणा झाल्यानंतर कोणत्याही प्रकारचा आराम नसतो. त्यांना ऊसाची मोळी उचलल्यासारखे काम करावे लागते. कोणत्याही प्रकारचे पत्थे किंवा दवाखाना त्यांना आरोग्याची काळजी घेण्याचा सल्ला देत नाही व सर्व वेळ केवळ ऊसतोडणीसारख्या कामावर लक्ष त्यांना द्यावे लागते. त्यामुळे अचानक असे वेळी अवेळी पोटात दुखते किंबहुना कामाच्या तणावाखाली या स्त्रियांना आपल्यात गर्भ राहिला आहे असे लवकर कळत नाही. कारण बहुतेक तरुण–तरुणी असल्यामुळे त्यांना सांगणारे त्यांची काळजी घेणारे हे गावाकडे असतात.नव्याने विवाह झालेले शिक्षण घेतल्याला तरुण वर्ग नोकरी नसल्यामुळे या ऊसतोडणी कामाकडे वळलेला आहे. या सर्वांची मजबुरी यांना या कामाकडे ओढवून नेते. या सर्व घटना प्रसंग व अनुभवाचे चिंतन चित्रण नारायणराव मुंढे यांनी त्यांच्या या ललित लेखनामध्ये केले आहे. ऊस तोडताना यांना अचानक आजारी पडले की दवाखान्यामध्ये डॉक्टर त्यांना गर्भ पाडण्याचा सल्ला देतात किंबहुना त्यांना त्याशिवाय पर्याय नसतो. नको असणारे व नसणारे गर्भ त्यामुळे पडतात, पाडले जातात.नंदाचा गर्भपात होणार असल्यामुळे तिला दवाखान्यात ॲडमिट केलं जातं. याचे चित्रण नारायणराव मुंढे यांनी पुढीलप्रमाणे केले आहे.

''आजी व सीताराम रात्रभर नंदाजवळ थांबले, गर्भपात झाला. आजीसारखी आसवं ढाळत होती. देवास विनवणी करत होती. देवा संकटातून वाचव व डॉक्टर साहेबांना विनवणी करत होती. डॉक्टरांनी आजीस धीर देवून सांगितले. माझ्या हाताने ऊसतोड मजुरांच्या बऱ्याच केसेस झालेल्या आहेत व वीस वर्षात एकही महिला दगावली नाही. गर्भ तर जातोच हे नवीन नाही''[१४] ऊसतोड कामगारांच्या स्त्रियांना असे अवघड काम केल्यामुळे गर्भपात होतात. नंदाचा आजार ही भ्रूण हत्या होती. कष्टासाठी उचल देणे, कष्ट करण्यास भाग पाडणे, नियमबाह्य कष्ट करण्यास लावणे, मानवता विसरणे, गुराढोराप्रमाणे क्षमतेपेक्षा

जास्त काम करणे, ऊसतोड कामगार माणसं आहेत याचा विचार केला जात नाही. पैशामुळे माणसं लाचार झालेली आहेत. प्रत्येक वर्षी ३०–४० लाख भ्रूणहत्या ऊसतोडणीमुळे होतात याची कुणीही दखल घेत नाही.

या ललित लेखनात नारायणराव मुंढे यांनी विविध प्रकरणे लिहिली आहेत. त्यात 'धोंडू तात्या' हे प्रकरण असून धोंडूतात्याची पत्नी लाडकूबाई मुकादमाच्या नादी लागते. धोंडूतात्याचा संसार मोडतो. मुकादम तिला पत्नी म्हणून नांदवत नाही तर तिला कारखाना परिसरातच ठेवतो. तेथे ती शेतकी अधिकारीची अंगवस्त्र होते. अशा कितीतरी ऊसतोडणी करणाऱ्या स्त्रिया वाममार्गाला लागतात. याचे चित्रण त्यांनी केले आहे. अनेक संसार मोडतात, स्त्रिया उद्ध्वस्त होतात याचे चित्रण या ललित लेखनात केले आहे.

'मागे फिरा पतंगांनो' मध्ये अनेक मुलींना शिक्षणाची सोय नसल्यामुळे लहानपीच शिक्षण सोडून आई–बापांच्या मदतीला यावे लागते व अल्पवयात त्यांचे विवाह करावे लागतात. त्यातून त्यांना हाल अपेष्टाचे जीवन जगावे लागते. याचे चित्रण नारायणराव मुंढे यांनी या ललित लेखनात केले आहे.

'मागे फिरा पतंगांनो' या ललित लेखन ग्रंथात 'मंथन' प्रकरणात नारायणराव मुंढे यांनी विचार मांडले आहेत. त्यातून स्त्रियाकडे समजाच्या बघण्याचा दृष्टिकोन मांडला आहे. ऊसतोड कामगारांना ५०% स्त्री ऊसतोड कामगार असतात. एका गाडीवर दोन–तीन स्त्रिया कामासाठी असतात. तरूण स्त्रिया काम करताना गरज म्हणून प्रेमात पडतात. गाडीवान किंवा इतर तरुणाबरोबर शरिराची भूक भागवतात. पुरूषाच्या वासनेच्या बळी पडणाऱ्या स्त्रियांची संख्या भरपूर असल्याचे त्यांनी लिहिले आहे ते पुढीलप्रमाणे.

ज्या स्त्रिया दुसऱ्या गाडीवाल्याबरोबर कामास जातात. त्यांच्या संपर्कात येतात, कळत नकळत त्यांच्याशी स्नेह, प्रेमात पडतात त्या परत त्या गाडीवानाबरोबरच करार करतात. कारण त्यांचे पूर्वीचे लागे–बांधे असतात. घरातील माणसांची, कुटुंबियांची अथवा पतीची इच्छा असो वा नसो त्या पहिल्या गाडीवानाबरोबरच संगत करतात. अथवा एखादा रंगेल मुकादम असेल तर त्यांच्याबरोबर करार करतात त्या पर पुरूषाबरोबर राहण्यास सोकलेल्या असतात. काही तर घराची अथवा नवऱ्याची इच्छा असो अथवा नसो त्यांच्याबरोबर नवऱ्यालाही घेवून जातात. या इष्टचक्रात स्त्री अडकली जाते. ऊसतोड कामगारांना त्यांच्या बायकांचे ऐकावे लागते आणि मजबुरी म्हणून बायका म्हणतात त्याप्रमाणे वागावे लागते असा विचार

त्यांनी व्यक्त केला.ऊसताड कामगारांच्या सर्वच स्त्रिया किंवा मुली तशा नसतात.परंतु त्यांच्या संबंधी समाजात अपप्रचार झालेला आहे.

ऊसतोड कामगारांच्या सर्वच स्त्रिया किंवा मुली तशा नसतात. परंतु त्यांच्यासंबंधी समाजात अपप्रचार झालेला असल्यामुळे ऊसतोडणीसाठी जाणारांना कमी लेखण्याची सवय समाजात निर्माण होऊ लागली आहे. त्यामुळे या ऊसतोड कामगारांना आपल्या मुली ऊसतोड कामगारांनाच द्याव्या लागतात. बेलापूरला जाणारे लोक कितीही चारित्र्यसंपन्न असले तरी त्यांच्याकडे संशयी प्रवृत्तीने बघण्याची सवय लोकांना लागली आहे. संशयी प्रवृत्तीचे तरुण ऊसतोड कामगारांच्या मुलीबरोबर विवाह करण्यास तयार होत नाही. अशी एक समस्या या ऊसतोड कामगारांची स्त्री व त्यांची व्यथा निर्माण झाली आहे. यासंबंधी नारायणराव मुंढे पुढे लिहितात.

''बेलापूरला जाणारा ऊसतोड कामगारांचा एक वर्ग तयार झाला आहे. त्यांना क्षुद्र लेखले जाऊ लागले आहे. समाजात विभागणी पडत चालली आहे. त्यांच्याशी संबंध ठेवणे त्यांच्याशी नाते करणे कमीपणा वाटणाऱ्या झाल्या आहेत''[१५] ऊसतोड कामगार स्त्रीच्या व्यथा, वेदना, गर्भपात, भ्रूणहत्या अशा विविध समस्यांचे चित्रण नारायणराव मुंढे यांनी त्यांच्या मागे फिरा पतंगांनो मध्ये केले आहे. समाजातील विविध घटक या स्त्री वर्गाचे शोषण करतात. त्यातून समाज मजबूर होऊ लागला आहे याचे चित्रण त्यांनी या ललित लेखनात केले आहे.

३) आत्मकथनातील स्त्री ऊसतोड कामगारांचे चित्रण :

ग्रामीण भागातील दलित समाजाने गावकीची कामे सोडली आणि शेती आणि शेतीशी संबंधीत काम लोक करू लागले. १९७२ च्या दुष्काळाच्या नंतर मराठवाड्यातील शेती करणारे, शेतीवर अवलंबून असणारे दलितांनी ऊसतोडणीचा व्यवसाय करू लागले. ऊसतोडणी जीवनाचे चित्रण करणारे

योगीराज बागूल यांनी 'पाचट' आत्मकथन लेखन केलेले असून या आत्मकथनात त्यांनी ऊसतोडणीचे अनुभवकथन केले आहे.या आत्मकथनात भूक, दारिद्र्य, गरिबी, ऊसतोडणीचे अनुभव 'पाचट' आत्मकथनातून योगीराज बांगूल यांनी व्यक्त केले आहे. आई वडील व त्यांनी पोटासाठी बरबडा जमा करणे, सरपण वेचणे, मोलमजुरीची कामे करून तिला सोबत व सहकार्य म्हणून योगिराज बागूल तिला मदत करतात. त्यांच्या आईला अनेक ठिकाणी अपमान सहन करावे लागते पण चांगलं बोलण्याचा परिणाम म्हणून त्यांना लोक

सहकार्य करतात. त्यातील काही अनुभव पुढीलप्रमाणे.

''ओढाताण करून इथपर्यंत येऊन बरबड्याला लागलो होतो. गळहट गोणी होऊस्तर ऊनतहान कशाचंच भान नव्हतं. आता गोणी बयानं बळकावली वाटलं. एवढी धाव धाव करून बरबडा वेचला त्याचा काही सार झाला नाही. बरबडा गेला तरी गेला, पण गोणीही जाती की काय असं वाटू लागलं. बाकीच्या बाया बरंच लांब गेल्या होत्या. आम्ही मात्र गुंतलो. मग आई त्या बाईजवळ जाऊन तिची मनधरणी करू लागली. बाई रागाने तापलेली होती. तोंडात येईल ते बोलत होती. आईनं एकदम नमतं घेतलं''[१६] या आत्म कथनामध्ये लेखकाने लोकांच्या शेतात बरबडा जमा केल्यामुळे अवहेलना व अनुभवाचे आपमानाचे चित्रण त्यांनी केले आहे.त्यांना निराधाराचे जीवन जगावे लागते. ऊसतोड कामगारांच्या स्त्रियांना गावाकडे आले की काम नसतं. दुष्काळात काम नाही म्हणून सतत जे मिळेल ते जमा करण्यासाठी या स्त्रिया जातात. परंतु त्यांना कुणी रानातील पडलेला सरवा पण घेऊ देत नाही. तरीही ती स्त्री त्यांना पुन्हा बरबडा घेऊ देते. तिच्यातील एका स्त्रिला मदत करण्याची भावना निर्माण होते आणि ते पुन्हा तिथे बरबडा जमा करतात.

योगीराज बागूल लहान असताना एका स्त्रीला ऊस मागतात. ती देते पण तिच्या नवऱ्याला जेव्हा कळते तेव्हा ती चाबकाचे फटके खाते. एक स्त्रीला कीव येते पण माणसातील पुरूषी अहंकार जागा होतो. लेखकांना त्या स्त्रिने ऊस दिला म्हणून तो शेतकरी स्व:च्या बायकोला माहारण करतो.

ऊसतोड कामगार स्त्रीच्या राहणीमानाचे चित्रण करताना 'पाचट' मध्ये योगीराज बागूल यांनी त्यांच्या आईचे चित्रण पुढीलप्रमाणे केलं आहे.

''आईच्या अंगावर नेहमी दोन–तीन तडपाच जुनंट असे. चोळीच्या बाह्या झिळझिळ्या झालेल्या. दोन्ही खांद्यावर ढिगळं लावलेली. जवळजवळ गळ्याला चिकटूनच सौभाग्याची एक काळी पोत. कानात साधीशी बाजारू फुलं पायातल्या मधल्या बोटात जोडवे. हातात प्रत्येक खूप जुनाट झालेल्या दोन–चार बांगड्या, कपाळी आहे वपणाचा कुंकवाचा मोठासा गोल टिळा. वार्धक्याची जाणीव करून देण्यासाठी चेहऱ्यावर उगवलेल्या पातळ सुरकुत्या. पांढरेसे होत चाललेले केस, नेहमी झापासारखे पसरलेले पंधरा दिवसातून न्हाणं मिळालं तर मिळे. कळता झाल्यापासून हाच अवतार मला आईचा दिसला अन् तोच डोक्यात बसला.''[१७] त्यांना जीवनावश्यक अन्न–वस्त्र–निवारा सारख्या गरजा पूर्ण करता येत नाहीत.ऊसतोड

कामगारांच्या स्त्रियांचे जीवन कष्टाचं, लाचारीचं आहे. या 'पाचट' मधून भुकेसाठी भरपूर काम करावी लागली पण चांगले दिवस आले व ऊसतोड कामगारांच्या जीवनाची गाथा सांगिल्याचं समाधान त्यांनी व्यक्त केले आहे.

४) काव्यातील स्त्री ऊसतोड कामगारांचे चित्रण :

काव्यातून समाजजीवनाचे दर्शन घडते. १९७० च्या दरम्यान ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर साखर कारखान्याला ऊसतोड कामगार म्हणून काम करणाऱ्या वर्गाचे काव्यातून चित्रण येऊ लागले. ऊसतोड कामगारांच्या मध्ये अत्यंत महत्वाचा घटक म्हणजे स्त्री ऊसतोड कामगार असून त्यांच्या जीवनाचा वेध काही मराठी कवींनी घेतला आहे. मराठीमध्ये या विषयाचे काव्य रचना करणारे प्रमुख कवी कैलास दौण्ड, प्रा.रायभान दवंगे, सय्यद अलाउद्दीन, संजयकुमार डोरले, भास्कर बडे यांच्यासारख्या कवींनी ऊसतोड कामगारांची कविता केली असून ऊसतोड करणारा प्रमुख घटकापैकी स्त्री ऊसतोड कामगार अत्यंत महत्वाचा घटक आहे.

स्त्रियांना केंद्रबिंदू मानून त्यांच्या व्यथा, वेदना, दु:ख अभिव्यक्त करण्यासाठी कवितांच्या माध्यमातून स्त्रीचे दर्शन घडते. स्त्रियांच्या दु:खाचे विविध पैलू या कवितेमधून येते. त्यामुळे मराठी ऊसतोड कामगारांच्या साहित्यातील स्त्रीच्या कवितांचा विचार करावा लागतो.

कैलास दौंड यांच्या 'ऊसाच्या कविता' मध्ये स्त्री चित्रण येते. ऊसतोड कामगारांची स्त्री ही स्वत:पेक्षा इतरांसाठी जगते. तिची व्यथा अत्यंत भेदक पद्धतीने कवीने मांडली आहे. कैलास दौंड यांच्या ऊसताची कवितामध्ये 'उचल' कवितेतून ऊसतोड कामगारांच्या पत्नीचे दर्शन पुढीलप्रमाणे.

''कोपीत बसलेली
पोटुशी घर धनीनं हाय
पैशापायी सारं नडलं
बाळांतपणी करायचं काय?
एकच आस डोळ्यापुढं
ह्या बारीने मुलगा व्हावा
जन्मा जन्माची उचल

फेडून त्यानं मोकळा व्हावा'' [१८]

या वेळी त्यांना मुलगा होवून त्याने कर्ज फेडावे अशी भावना कवितेतून व्यक्त करतात.ऊसतोड कामगारांच्या स्त्रीची गर्भधारणा झालेली असून बाळंतपणासाठी पैशाची गरज आहे. पण किमान या वेळेस तरी मुलगा व्हावा आणि जन्म जन्माची उचल त्याने फेडावी अशी आशा व्यक्त होते. आर्थिक विवंचनेतील ऊसतोड कामगार स्त्रीचे दर्शन घडते.

ऊसतोड कामगारांच्या स्त्रिया कोप्यातून राहतात. रस्त्याच्या बाजुला त्यांच्या स्त्रिया व तरुण मुली यांच्याकडे जाणारे येणारे बघतात. कुणीही यावे आणि त्यांना न्हाहाळाव्यात. कैलास दौंड यांनी 'कोप्या' कवितेत ते लिहितात.

''रस्त्याकडेच्या कोप्या
त्यातील
तरण्याताठ्या
लेकी सुना
रस्त्यावरून जाताना
कोणालाही न्याहाळायला
सोप्या''[१९]

(ऊसाची कविता – पृष्ठ ४८)

ऊसतोड कामगारांच्या कोप्या रस्त्याच्या कडेला असतात. त्यांच्या स्त्रिया, तरुण मुलींना न्याहळण्यासाठी सोप्या जातात. त्यांच्या तरुण मुलींना स्त्रियांना यातून कुचंबना सहन करावी लागते. रस्त्याच्या कडेने जाणारे सर्वच त्यांच्याकडे वाईट भावनेने सहज बघतात. गाड्यावर जाणारे तसेच पायी जाणारे त्यांच्याकडे बघतात. ही एक अपराधीपणाची भावना व्यक्त करून स्त्रियांचे दर्शन कवी घडवतात.

कैलास दौंड यांच्या 'ऊसाच्या कविता' मधील 'सख्याची बायकां' या कवितेमध्ये नुकतंच लग्न झालेल्या सख्याकडे मुकादम येतो. उचल घेण्यासाठी आग्रह केला पण ऊसतोड कामगारास बघून मुकादमाने पैसे काढले. सख्याच्या बायकोला पैसा दाखवून पैशाच्या जोरावर भाळण्याचा प्रयत्न करतो. अशा आशयाची कविता पुढीलप्रमाणे कवी कैलास दौंड यांनी पुढीलप्रमाणे लिहिली आहे.

''सख्याच्या बायकोला

बघून पैसे खिशात

ठेवत

मुकादमानं मारला डोळा

सख्याला न दिसणारा असा

ती पण सावित्रीच होती

सख्यानं फर्मान काढलं

चहा टाकण्याचं

सावित्रीने उत्तर दिलं

साखर नसल्याचं''[२०]

(ऊसाची कविता पृष्ठ ५४)

ऊसतोड कामगारांच्या स्त्रियांना बघून बऱ्याच वेळेस मुकादम पैसे काढतात. उचल घेण्याचा आग्रह करून त्यांच्या बायकांना फसवण्याचा प्रयत्न करतात. पण त्या नवऱ्याने चहा टाकायला सांगितलं तरी साखर नाही असं सांगून चहा टाळते. कारण मुकादमाने कारण ऊसतोड कामगारांशी स्त्री ही सावित्री म्हणजे पतिव्रता असून अशा नोटा दाखवणाऱ्या मुकादमाविषयी तिच्या मनात तिरस्कार आहे. ऊसतोड कामगारांच्या स्त्रिया केवळ कष्टावर विश्वास ठेवणाऱ्या असून त्यांना फूस लावणे अशक्यप्राय आहे असे चित्रण कैलास दौंड यांनी केले आहे.

प्रा.रायभान दवंगे यांनी 'तांडा' या कथाकाव्यात स्त्री ऊसतोड कामगार स्त्रीच्या भाव भावनांचा विचार कथन पद्धतीने सांगितला आहे. 'तांडा' मधील कविता स्त्री मनाचा वैविधपूर्ण वेध घेणाऱ्या कविता असून या कविता तिच्या मनातून विचार भावना व्यक्त करतात. 'तांडा' कथा काव्यातून काव्यातून कथा सांगितल्याप्रमाणे सलग कवितेची विण एक कविता दुसऱ्या यांचा परस्पर संबंध व्यक्त झालेला आहे. ऊसतोडणीसाठी निघालेला गाड्याचा तांडा स्त्री मनाचा वेध पुढीलप्रमाणे कवीने घेतला आहे.

''तांड्यातल्या एका गाडीत

गवऱ्याच्या पोत्यावर

बसलेली ती

तान्हाला जपून पाजते

त्याच्या बाळमुठीत

आयुष्याच्या वाट शोधते''[२१]

(तांडा पृष्ठ – ३)

ऊसतोड महिला गाडीमध्ये बसून मनातील हावभाव त्यातून ती आपल्या आयुष्याचा वेध घेत असते. आपल्या बाळाच्या रूपाने विकासाचं स्वप्न ती बघते. माझं बाळ भविष्यात काही तरी परिवर्तन करणार आहे अशी आशा तिला आहे.अशा स्वप्नाळू पणावर तिचा विश्वास आहे.

ऊसाच्या फडात सतत मुकादम फिरत असतो. त्याची नजर स्त्रीयांवर असते. या मुकादमाच्या वर्तनाचे स्त्रियांच्या मनावर होत असणारा परिणामाचे चित्रण कवी करतात.

''थळात हिंडून

मुकादम

झाडाच्या सावलीत बसतो

तशी ती

सावरलेलाला पदर

अजूनच सावरते''[२२]

(तांडा– पृष्ठ २१)

मुकादम ऊसाच्या थळात जेव्हा फिरतो तेव्हा त्याची नजर स्त्रियांना शोधते. पण तो जेव्हा थळ सोडून जातो तेव्हा स्त्रिया श्वास मोकळा सोडतात.

'तांडा' कविता मधून काम करताना स्त्रिया स्वत:ला सर्व बाजूनं कशा सावरतात. त्यांचं मन, शरीर कधीही ढळू देत नाही. याचं चित्रण पुढील कवितेत येते.

''डोक्यावर मोळी घेवून

गाडीकडं जाताना

बुडखांच्या सरीतून ती

जपून पावलं टाकते

काळजाच्या टुकड्यागत

हातांनी मोळी सांभाळते

चालताना पायाखाली

दु:खाला झाकते''[२३]

(तांडा– पृष्ठ २६)

ऊसतोड कामगार स्त्री स्वत:ला सावरत असते. डोक्यावर ऊसाची मोळी घेवून जाणारी ती स्वत:ला व स्वत:च्या मनाला सावरत असते. वेदना झाकण्याचे काम ती करते. या स्त्रियांना विविध प्रकारच्या प्रश्नामुळे पोटाला पोटभर जेवण मिळत नाही. उपासपोटी राहते. स्त्रिया एकमेकांना सांभाळून घेत असतात. त्याचं चित्रण कवी पुढीलप्रमाणे करतो.

''दुपारी

जेवायला बसतात

साऱ्याच जणी

तेव्हा ती

उपाशीपोटी

तान्हाला घेऊन बसते

आया–बाया तिची समजूत काढतात

तिच्या डोळ्यातील अश्रू

तान्ह्याच्या गालावर ओघळतात''[२४]

(पृष्ठ– ४९)

ऊसतोड काम करणाऱ्या स्त्रियांना अनेक चिंता असतात. मूल, सासू–सासरे, नवरा यांच्या व बाळाच्या चिंतनामुळे दुपारी जेवण त्यांना जात नाही. तिच्या सहकारी महिला तिची समजूत काढतात. समजावून सांगतात. तांडामधील कविता कधीही आकस व्यक्त करत नाही. संथ गतीने दु:ख व्यक्त करणारी कविता असून सहजपणाने ती अभिव्यक्त होते. ऊसतोड कामगारांच्या समस्त स्त्रियांचे दु:ख व्यक्त करते.

सय्यद अलाउद्दीन यांनी 'उचल कोयता तोडिला' हा ऊसतोड कामगारांच्या जीवनाचा वेध घेणारी कविताची रचना केलेली आहे. या कवितांमध्ये स्त्री जीवनाचे चित्रण त्यांनी केले आहे. ऊसतोड कामगार स्त्रियांच्या गर्भ अवस्थेचे चित्रण त्यांनी पुढीलप्रमाणे केले आहे.

''तिच्या पोटामध्ये बाळ

ऊसतोडी रानो माळ

तिच्या पोटामध्ये बाळ

घामाशी तिची नाळ

तिच्या पोटामध्ये बाळ

माती झाली गर्भ गाळ'' [२५]

(उचल कोयता तोडीला पृष्ठ ४)

गर्भ राहिलेल्या ऊसतोड कामगार महिलेला तिच्या पोटात गर्भ असतानाही सातत्याने श्रम करावे लागते. कामातून तिची सुटका नाही. सातत्याने मातीशी तिचे नाते असते. एक अतूट संबंधाचं चित्रण त्यांनी केलं आहे.

सय्यद अलाउद्दीन यांना ऊसतोड कामगारांच्या नवविवाहित स्त्रीच्या मनाचा वेध घेतला आहे. नव्या नवरीने नवे स्वप्न पहावे. संसाराच्या विचाराने भारावे परंतु येथे मात्र नव्या तरुण–तरुणींना विवाह झाल्यानंतर ऊसतोडणीस जाण्याचे वेध लागतात. नवी नवरी म्हणजे जिच्या हातात नव चुडा आहे. तरीपण तिचा मात्र भाकरीशी लढा तात्काळ सुरू होतो. या विषयाला अनुसरून उचल कोयता तोडीला मधील कविता पुढीलप्रमाणे.

''लागलेले लग्न

कोयता घेताना

चूर चूर झाले स्वप्न

धुतलेली हळद

मेंदीचा हाती थर

ऊसाने कापले

अंग अंग

चर चर''[२६]

(उचल कोयता तोडिला पृष्ठ ६)

ऊसतोड कामगार स्त्री लग्न लागले की दुसरा तिसरा विषय त्याच्या पाठीमागे नसतो. हळद धुण्याच्या पूर्वी मेहंदीच्या हातानेच ऊसतोडणीसाठी जावे लागते. केवळ ऊसतोडणीचा विचार करावा लागतो. त्यांना नव्या उमेदीचे स्वप्न बघण्यापूर्वी नव्या नवरीचे ऊसाने अंग कापले जाते. विवाह म्हणजे केवळ थोडंसं पडलेले स्वप्न आहे. परिश्रम, कष्ट याशिवाय जीवनच नाही अशी भावना या लोकांची होते.

ऊसतोड कामगार स्त्रिया कधीही सुरक्षित नाहीत. त्यांच्याकडे वाईट हेतू, नजरेने बघणारांचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात आहे. चारित्र्य संपन्न असणारांना अनेक प्रसंगी संकटांना सामोरे जावे लागते. त्यांच्याकडे ज्या परिसरात हे लोक ऊसतोडणीसाठी जातात त्या परिसरातील लोक त्यांना वाईट हेतूने बघतात. अशा परिस्थितीचे चित्रण सय्यद अलाउद्दीन यांनी पुढीलप्रमाणे केले आहे.

''तिच्या तरण्या देहावरून

बगळ्यांनी फिरवले डोळे

ऊस फडाच्या काठावरती

जमलेले सगळे कावळे''[२७]

(उचल कोयता तोडीला पृष्ठ २०)

ऊस तोडणाऱ्या स्त्रियांच्या कोपीवर केव्हा संकट येईल, केव्हा इज्जत लूटली जाईल हे सांगता येत नाही. सतत सावधगिरीने राहावे लागते. कुणी हल्ला केला तरी याठिकाणी ऊसतोड कामगार स्त्रिया आपला देह त्याग करतील परंतु इज्जत जाऊ देणार नाही अशी भावना पुढील ओवीत येते.

''अंगी बळजोरी झोंबा झोंबी

वासनेचा अघोरी घाला

पायाने करील ढकलून

सारा देहच अग्नीचा केला'' [२८]

(उचल कोयता तोडिला)

ऊसतोड कामगार स्त्रिया आपल्या इज्जतीसाठी देहच अग्निच्या हवाली करतात अशी भावना कवीने व्यक्त केली आहे. अब्रु वाचविण्यासाठी त्यांच्या स्वत:ला संपविण्याचा विचार कामगार स्त्रियांच्या मनात येतो.

ऊसतोड कामगार आपल्या मुलीचे 'उचल' घेऊन विवाह करतात. परंतु विवाह करण्याचा हेतू एक कामगार वाढविणे असते व हे लोक या नव तरुण स्त्रियांना विविध प्रकारे शारिरीक, मानसिक त्रास देतात आणि शेवटी तिला सोडचिठ्ठी देतात. या स्त्रियांच्या यातनांना या ठिकाणी प्रारंभ होतो अशा प्रसंगाचे चित्रण कवी सय्यद अलाउद्दीन पुढीलप्रमाणे करतात.

''त्यानं दिली सोडचिठ्ठी
तिला वांझोटी म्हणून
तशी आली माहेराला
दाद फिर्याद सोडून
भाऊ–भावजया संग
ऊस तोडणीला जाय
टोळीतल्या एका संगं
बहकले तिचे पाय''[२९]

(उचल कोयता तोडीला पृष्ठ ३७)

ऊसतोड कामगार तरुण स्त्रीला अनेकविध प्रकारे त्रास देवून वांझोटी समजून सोडले जाते. भाऊ–भावजयाबरोबर कामास जातात. टोळीतील तरुण पुरूषाबरोबर तिचे संबंध वाढतात आणि बाहेरखालीपणा तिच्यात वाढतो. अशी भावना कवीने व्यक्त केली आहे. ऊसतोड कामगार स्त्रियांचे असे हाल होतात. तोडीवाल्यांचा जन्म हा कोयता फडात जाणे जीवन आणि मरण हे दोन्ही त्यांचे ऊसतोडीतच आहेत.

ऊसतोड कामगारांच्या स्त्रियांचे जीवन कवितेच्या माध्यमातून अशा पद्धतीने चित्रीत झाले आहे. त्यांना माणसाप्रमाणे जीवन जगता येत नाही. स्त्रियांना घरातील पुरूष व बाहेरील लोकांच्या छळाला सामोरे जावून जीवन जगावे लागते. अनेक विधवा स्त्रिया आप्या मुलाबाळाकरिता या व्यवस्थेविरोधी लढा देवून

सामर्थ्य संपन्न अशा पद्धतीने संसार करतात.

अशा विविध घटना प्रसंग व अनुभवाच्या पातळीवर स्त्रियांचे चित्रण कवितेत येते.

५) सामाजिक शास्त्रातील ऊसतोड कामगार स्त्री :

ऊसतोड कामगारांचा सामाजिक, राजकीय, आर्थिक अंगाने संशोधनात्मक अभ्यास झालेला आहे. या ऊसतोड कामगारांतील कामगारांचे वर्गीकरण करताना पुरूष, स्त्री, बालकलाकार असे विविध प्रकार पाहता येतील. यातील सर्वांना त्यांच्या त्यांच्या परीने त्रास होतो. श्रम करावे लागतात. परंतु यांच्यातील सर्वात परावलंबी म्हणजे स्त्री ऊसतोड कामगार आहे.

स्त्रियांना सतत श्रम करावे लागतात. तसेच त्यांना घरातील व बाहेरील सर्व लोकांकडून त्यांना शारिरीक, मानसिक अशा प्रकारे त्रास होतात आणि स्त्री म्हणजे शोषणाचे केंद्रबिंदू होते. 'स्त्री ऊसतोड कामगार' या संशोधनात्मक ग्रंथात डॉ.कालिदास भांगे यांनी बीड जिल्ह्यातील स्त्री ऊसतोड कामगारांचा सामाजिक दृष्टिकोनातून अभ्यास संशोधन केले आहे. ऊसतोड कामगारांना महाराष्ट्रात सर्वकडे ओळखले जाते. हे सर्व हंगामी कामगार असून ते स्थलांतरित स्वरूपात असतात. त्याचा परिणाम त्याच्या कुटुंबातील सर्वांच्यावर आर्थिक, सामाजिक, राजकीय, कौटुंबिक, वैवाहिक व आरोग्यविषयक जीवनावर होतो.

स्त्री ऊसतोड कामगार या डॉ.कालिदास भांगे यांच्या ग्रंथात स्त्री ऊसतोड कामगारांसंबंधी ते पुढीलप्रमाणे मत मांडतात.

''महिला ऊसतोड कामगारांचा अभ्यास करताना हे स्पष्ट होते की या कामगार महिलांना सतत असुरक्षितता वाटत असते. त्यामध्ये शारिरीक आणि मानसिक दडपणाखाली आपले जीवन जगतात असे आढळून आले. बहुतांशी वेळेस पती–पत्नीच ऊसतोडणीसाठी गेलेले असतात. त्यामुळे गाडीचे वजन करण्यासाठी कारखान्यावर रिकामी करण्यासाठी पती जातो तर पत्नी कोपीवर (घरी) असते. त्यामुळे ती मानसिक दबावाखाली असते. तसेच ह्या कामाची वेळ रात्री–बेरात्री असल्याने विंचू–साप, ॲक्सीडंट इत्यादी कधी होईल व जीवाला धोका कधी निर्माण होईल याची शक्यता सांगता येत नाही. त्यांच्या मनामध्ये सतत असुरक्षितता वाटत असते''[३०]

सारांश रूपाने असे सांगता येते की, स्त्रियांचे जीवन हे असुरक्षितच आहे. स्त्रियांच्या अनंत गरजा असतात आणि त्या पूर्ण करण्यास त्यांना सर्व सोयी सवलती मिळत नाही. पुरूषाप्रमाणे स्त्रियांचे शिक्षणाचे

प्रमाण अत्यंत कमी आहे.

ज्या परिसरात कोरडवाहू, अल्पभूधारक शेतमजुरांचे प्रमाण जास्त राहण्यासाठी त्यांना कोणत्याही प्रकारच्या सोयी सवलती मिळू दिल्या जात नाहीत कारण या लोकांच्या सर्व गरजा सोयी–सुविधा मिळाल्यास यांना कामाच्या गरजा पडणार नाही. त्यामुळे प्रादेशिक विकासात असमतोल राखला जात आहे.

स्त्री कामगारांचे शिक्षणाचे प्रमाण त्यामुळे अत्यंत कमी आहे. त्यांना जीवनमान विकासासाठी सर्वांगीण सोयी सवलतीची गरज आहे.

६) स्त्री ऊसतोड कामगारांचे मुल्यमापन :

स्त्री ऊसतोड कामगारांचे कथा, कादंबरी, ललित लेखन, आत्मकथन, काव्य अशा आणि सामाजिक, आर्थिक स्वरूपात केलेले संशोधनाचा विचार करताना ऊसतोड कामगार स्त्रियांच्या काही बाजुचा लेखक, संशोधक यांनी विचार केलेला आहे. कथा, कादंबरीतील स्त्रियांना त्यांचे जीवन, समस्या, वेदनांचे स्वरूपा मांडण्यासाठी या साहित्य प्रकारातून काही प्रमाणात वाव मिळाला आहे.

१९७२ नंतर दुष्काळाचा परिणाम आणि जलसिंचनामुळे शेती व्यवसायात काही प्रमाणात परिवर्तन घडले आहे. याचा परिणाम समाज जीवनावर पडलेला आहे. जागतिकीकरणामुळे लोकांच्या उत्पन्नात व कामाच्या स्वरूपात परिवर्तन होऊ लागले असून मुकादम, बागायतदार, कारखानदार शोषण करताना कामगारांवर अन्याय करताना विचार करू लागले आहे.

शांता जोशी यांनी 'गव्हाणी' सारख्या कलाकृतीमधून बालकामगारच्या शिक्षण व स्त्रियांच्या शोषणाच्या विविध पैलूचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातून ऊसतोड कामगार आता साहित्यातील लेखन विषय होऊन विविध समस्याचे चित्रण होऊ लागले आहे.

रायभान दवंगे यांच्या कादंबरी व कथा काव्यातून स्त्रियांच्या विविध पैलूचा विचार केला जाऊ लागला आहे. आधुनिकतेचा विचार करताना विविध वर्तपत्रे, मासिके आणि दिवाळी अंकामधून या समाजाच्या विविध समस्या व त्यांच्या मनाला वाट मिळू लागली आहे.

श्रीराम गुंदेकर, भास्कर बडे, कैलास दौंड, सय्यद अलाउद्दीन यांच्यासारखे लेखक, कवी, ऊसतोड कामगार स्त्रियांच्या मनाता समस्यांचा विचार करू लागले आहे.

समारोप

ऊसतोड कामगारांचे साहित्यातील चित्रणाचे स्वरूप समजावून घेताना या प्रकरणात स्त्री ऊसतोड कामगारांचे मराठी ललित साहित्यात कोणत्या प्रकारचे प्रतिबिंब पडले आहे याचा विचार यात केला आहे. कथा, कादंबरी, ललित लेखन, आत्मकथन काव्य व सामाजिक संशोधनात या स्त्रियांना कोणत्या प्रकारचे स्थान आहे. त्यांना पती, कुटुंब, समाज, मुकादम बाहेरील पुरूषी अहंकाराचे बाहेरील लोक यांच्यापासून कोणता त्रास व असुरक्षित वाटते याचा विचार केला आहे.

स्त्रियांच्या भाव–भावनांचा विचार त्याच्या मनाच्या वाङ्मयीन संबंधाचे विचार या प्रकरणात केला आहे. पुढील प्रकरणात एकूण ऊसतोड कामगारांच्या संबंधी निष्कर्ष मांडले जाणार आहे.

संदर्भ

१)मनोहर सुरवाडे –१९८० नंतरची ग्रामीण कथा –बडेवंश प्रकाशन नांदेड– पृष्ठ क्र. १०९

२)सरदार जाधव –कोयता–जनशक्ती वाचक चळवळ– औरंगाबाद – प्र.आ. १९९४ – पृष्ठ क्र. ४०

३)दिनकर जायभाये – हिरवा डोंगर– सुमेरू प्रकाशन डोंबीवली–प्र.आ.२००० – पृष्ठ क्र. २१

४)तत्रैव –पृष्ठ ३९

५)योगीराज वाघमारे –धुराळा– हर्ष प्रकाशन सोलापूर–प्र.आ. २००५ –पृष्ठ क्र. ७७

६)भास्कर बडे –पाणकणसं– साहित्य सेवा प्रकाशन औरंगाबाद–प्र.आ. १९९०– पृष्ठ क्र.१८

७)प्रा.रायभान दवंगे –प्रहार –सुदिन प्रकाशन पुणे– प्र.आ. २००४ – पृष्ठ क्र. ८

८)बाळासाहेब गर्कळ – उचल– कैलास पब्लिकेशन औरंगाबाद–प्र.आ.२०१० – पृष्ठ क्र. ४१

९) शांता जोशी –गव्हाणी– स्वरूप प्रकाशान औरंगाबाद– प्र.आ.२००२– पृष्ठ क्र. १५

१०) तत्रैव – पृष्ठ क्र. ७७

११) तत्रैव –पृष्ठ क्र. ७८

१२)डॉ.नारायणराव मुंडे – मागे फिरा पतंगांनो –सत्संग प्रकाशन गेवराई– प्र.आ.२००१– पृष्ठ क्र.२२

१३)तत्रैव –पृष्ठ क्र. ५३

१४)तत्रैव – पृष्ठ क्र. १५४

१५)तत्रैव – पृष्ठ क्र. १५४

१६)योगीराज बागूल –पाचट–ग्रंथाली प्रकाशन मुंबई – प्र.आ. १९९९ –पृष्ठ क्र. ५५

१७) तत्रैव – पृष्ठ क्र. ८९

१८)कैलास दौंड – उसाच्या कविता– निलकंठ प्रकाशन पुणे– प्र.आ. २००१ – पृष्ठ क्र. १४

१९)तत्रैव – पृष्ठ क्र. ४८

२०) तत्रैव –पृष्ठ क्र. ५४

२१) प्रा. रायभान दवंगे –तांडा– स्वरूप प्रकाशन औरंगाबाद – प्र.आ.२००५– पृष्ठ क्र. ३

२२)तत्रैव – पृष्ठ क्र. २१

२३)तत्रैव – पृष्ठ क्र. २६

२४)तत्रैव –पृष्ठ क्र. ४९

२५)सय्यद अल्लाउद्दीन –उचल कोयता तोडीला –दिलजान प्रकाशन आष्टी– प्र.आ.२०१० – पृष्ठ क्र. ४

२६)तत्रैव – पृष्ठ क्र. ६

२७)तत्रैव – पृष्ठ क्र. २०

२८) तत्रैव – पृष्ठ क्र. २०

२९) तत्रैव – पृष्ठ क्र. ३७

३०) कालिदास भांगे– स्त्री ऊसतोड कामगार– चिन्मय प्रकाशन औरंगाबाद–प्र.आ.२०१२ – पृष्ठ क्र. १००

निष्कर्ष व समारोप

हे प्रकरण अत्यंत महत्वपूर्ण असून मराठी साहित्यातील ऊसतोड कामगारांचे चित्रण ; एक अभ्यास या विषया संबंधी विविध निष्कर्ष इथे नोंदविणार आहे. लघुशोध प्रकल्प अभ्यास विषयाचा फलितांचा हा विचार महत्वाचा आहे. हे अभ्यासपूर्ण व परिसरातील पाहणी,अवलोकनातून प्रकरणाची मांडणी केली आहे.

या प्रकरणा मधून अभ्यासांसी आलेले निष्कर्ष सांगता येतील या लघुशोध प्रबंधाची सुरूवात प्रस्तावनात्मक या प्रकरणातून केलेली आहे. या नंतरच्या पुढील तीन प्रकरणातून ऊसतोड कामगारांच्या कथनात्मक काव्यात्मक त्याच प्रमाणे या दोन्ही वाङमयप्रकारा बरोबर ललितलेखन आत्मकथन,वर्तमानपत्रातील लेखन ,दिवाळी अंक विविध नियतकालीके स्त्रियांचे चित्रण कसे झाले. याचा विचार केला आहे. हे प्रकरण या प्रकल्पाच्या निमित्ताने अभ्यासाच्या स्थुल व सुक्ष्म निरिक्षणातून पाहणीद्वारे ऊसतोडणी , कामगारांच्या गावापासून ते कारखाना परिसरातील जीवन यांचे केलेले निरिक्षण , साहित्यातून काय अभिव्यक्त झाले आहे याचे निरिक्षणात्मक निष्कर्ष मांडणी पुढील प्रमाणे आहे.

१– मराठी साहित्यातील ऊसतोड कामगारांचे चित्रण मराठीसाहित्याच्या विविध वाङमय प्रकारातून झालेले आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडाच्या शेती, व साखर उद्योग यांचा परिणाम शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकजीवनावर झालेला आहे परिणामी या वाङमयात हे समाजजीवन चित्रित झालेले आहे.

२– मराठी साहित्यात ऊसतोडकामगार एक समाजीवनातील महत्वाचा घटक म्हणून साहित्यातून अभिव्यक्त झाला आहे.

३–स्वातंत्र्योत्तर काळखंडात साखर उद्योग,व जलसिंचनामुळे, शेतीवर यांत्रिकीकरण याचा परिणाम शेतीवर झालेला आहे.शेतीवर अवलंबून असणारा कामगार कामाच्या कमतरतेमुळे या ऊसतोडणी कडे वळला असून यातून शेतमजूरांना रोजगार मिळाला आहे.

४– शेतीच्या उद्योगीकरण शिक्षणाचा परिणाम ग्रामजीवनातील लोकांनी आलुतेदारी,बलुतेदारी,गावकीची कामे बंद झाल्यामुळे नव्या रोजगाराकडे काही समाज वळले, ह्यातील शेतमजूर कामगारवर्ग साहित्यातून

आलेले आहे.

५– बागायती शेती, साखर उद्योगातील कारखानदार यांनी मुकादमाच्या माध्यमातून कोरडवाहू अल्पभूधारक शेतमजूरांना आकर्षित करून या कामाकडे व या लोकांची गरज म्हणून या उद्योगाकडे कामाकडे ,लोकांचा भरणा झालेला आहे.

६–ऊसतोड कामागाराचे लोकजीवन चित्रण हे प्रारंभी लघुकथेतून झालेले आहे.समाजातील गरजवंत कामगारांच्या हाल अपेष्टा कथेच्या माध्यमातून श्रीराम गुंदेकरांनी प्रारंभी समर्थ्यापणाने अभिव्यक्त केलेली आहेत.

७–ऊसतोड कामगार हंगामी कामगार आहे या लोकांच्या शेतीची काम संपल्या नंतर पूरक व्यवसाय म्हणून प्रारंभी प. महाराष्ट्रात श्रीरामपूरजळ बेलापूर कारखानासाठी प्रथम कामगार गेले त्यामुळे आता भारतात कोठेही ऊसतोडणीस गेलेतरी बेलापूरच म्हणतात. अशी पद्धती सुरू झालेली आहे.

८–महाराष्ट्रातील ऊसतोडकामगार पं. महाराष्ट्राच्या बरोबर, कर्नाटक, आंध्रप्रदेश,जुरात राज्यात ऊसतोडणी साठी जातो.

९–ऊसतोडणी कामगार म्हणून मराठा, वंजारा,बंजारा,धनगर, महार, मांग, मुस्लिम यासारख्या शेतीवर अवलंबून असणारे, कोरडवाहू अल्पभूधारक शेतमजूर कामगार म्हणून जातात.

१०–ऊसतोडणी कामगार पूर्वी आशिक्षिताचे प्रमाण होते. आज शिक्षण घेतलेले बेकारांचा भरणा ऊसतोडणी कामगार म्हणून भरपूर प्रमाणात पदवीधर कामगारांची संख्या वाढू लागली आहे.

११–ऊसतोड कामगार संपूर्ण कुटुंबासह तथा ,काही मुळे,म्हातारी, माणसे गावीच असतात,एक स्त्री–पुरूष म्हणजे एक कोयता समजतात.

१२–कथनात्मक साहित्या मधून कोरडवाहू शेतकरी निसर्गाच्या दुष्टचक्रात कोरडवाहू शेतकरी, निसर्गाच्या दुष्टचक्रात सापडलेले आणि निसर्गाची अवकृपा झालेले समाजजीवन आलेले आहेत. या समाजीवनातील मराठवाडा, अहमदनगर जिल्हा या परिसरातील पाथर्डी भागातील सर्वजातीचे धर्माचे शेतकरी, ऊसतोड कमगार आहेत.

१३–ऊसतोडण्याचे काम करणाऱ्याला मुकादमाच्या मार्फत कामगारांच्या अज्ञानपणाचा गैर फायदा घेऊन त्याना त्यांची आर्थिक कोंडी केल्यामुळे त्यांना सतत या कामात एकदा प्रवेश मिळाला की हे स्वत: यात

सहभागी होतात. त्यामुळे त्यांच्या मुलांचे शिक्षण होऊ शकत नाही.सतत कर्जबारजी पणा अज्ञानाचे प्रमाण व प्रामाणिक पणाचा भरणा जास्त प्रमाणात आहे. त्यामुळे त्यांची मुकादम फसवणुक करतात.

१४– दुष्काळाच्या चक्रात सापडलेला शेतकरी म्हणजेच ऊसतोड कामगार आहे. कारण निसर्गावर शेती असणारा, शेतकरी, त्यांची मजबूरीम्हणून ऊसतोड कामगार म्हणून उदयास आलेला आहे.

१५–मराठी कांदबरीतील ऊसतोड कामगार निर्माण होण्याच्या पाठीमागे त्यांची अंधश्रद्धा,जन्म विवाह, आणि मृत्यू या विधीसाठी केलाजाणारा खर्च, पाणकणस मध्ये भास्कर बडे चित्रित करतात.

१६– कादंबरी मधून लाचार, दरिद्री, अंधश्रद्धा, आगतिक, समाज जीवनाचे दर्शन घडते.बीड जिल्ह्यातील शिरूर कासार, लोणी, वारणी या परिसर निसर्ग समाज जीवन या समाज वास्तव मांडले आहे. पाणकणंस मधून येते.

१७– 'हिरवा डोंगर' मधून पारंपारिक ऊसतोड कामगार परंतु शिक्षणाला महत्व दिल्यामुळे कुटुंबाचे परिवर्तन घडते,असे कुटुंब आहे. या सारखे अनेक जिद्दी कुटुंबाचे प्रमाण भरपूर असून ऊसतोड कामगारांनी त्यांच्या मुलांना शिक्षण देवून स्वाभिमानाने जीवन जगण्याची संधी प्राप्त केलेली आहे. दिनकर जायभाये यांचे सामर्थ्यसंपन्न चित्रण हिरावा डोंगर मध्ये येते.

१८– 'पाणधुई' सारख्या कादंबरीतून पदवीचे शिक्षण घेतलेला शेतकऱ्याचा मुलगा किमान ऊसतोडणीवर अवलंबून असणाऱ्या समाजाचे कोयत्याचे काम त्यांना मिळणारे अन्न,पाणी, दारिद्यामुळे बंद पडते का ? असे प्रश्न निर्माण करतो. जीवन संघर्ष यातून कौलास दौंड यांनी चित्रित केले आहे.

१९–ऊसतोडणी कामगारांचे पुढारी, साखर सम्राट झाले पण ऊसतोड कामगारांचे प्रश्न त्यांना सोडवता आलेले नाही पुढारीच त्यांचे शोषण करू लागले आहेत.

२०– गद्य साहित्यातून या विक्रीकरणशचा परिणाम ऊसतोड कामगारांवर होत असल्यामुळे यांत्रिकीकरणाला विरोध दाखविलेला आहे.कारण बेरोजगार शेतमजूरांना दुसरा रोजगार उपलब्ध होणे अवगड झाले असे दिसते.

२१– 'रायभान दवंगे' यांच्या 'प्रहार' मधून ऊसतोडणी कामगारांच्या मजबूरीचा फायदा घेणारे बागायतदार, कारखानदार, यांच्या जुलमाचे चित्रण येते. ऊसतोड कामगारांच्या स्त्रियांना त्रास दिला जातो.

२२–ऊसतोडणी कामगारांच्या अनेक घातपात घडतात,निसर्गा ऊन,वारा,पाऊस, आपघात, त्याहून बैल

व मनुष्य प्राणी यांचे चित्रण कादंबरी मधून आलेले आहे.

२३–ऊसतोड कामगारा स्वत: शेती असणारा पण, मुकादमाच्या सांगण्यावरून शेती सोडून ऊसतोड कामगार होणारे आणि त्यातून कुटुंबाना त्रास झाले विस्थापित कुटुंब चित्रण धुराळा सारख्या कांदबरीत योगीराज वाघमारे यांनी शेतकरी कुटुंब चित्रण केले आहे.

२४– ऊसतोडणी कामगारांच्या वृद्ध आई–वडील यांच्या हाल आपेष्टाचे चित्रण मागेफिरा पतंगानो या ललीत लेखनामधून येते वारकरी विचारांचा माणसांना मजबूरी म्हणून ऊसतोडणी साठी जावे लागते. याहून विविध प्रश्न निर्माण होतात. कुटुंबातले उध्वस्थिकरण विचार झाला पाहिजे. हा संदेश गद्य लेखानातून येतो.

२५– गद्य साहित्यातून ऊसतोड कामगारांचे आंदोलन संप, याहून परिसर, कारखाना, कामगार या सर्वांच्या चित्रणातून समाजजीवन उभे राहते त्यांच्या समस्यांचे दर्शन घडते.

२६– पद्य साहित्यातून कवितेची निर्मिती झालेली असून ऊसातील निसर्ग समाजजीवन त्यांचा संघर्ष भाव–भावना यांची अभिव्यक्ती होते या कवितेतून ऊस व त्यांचे भाव–भावनेचे अतुट नाते येते.

२७–ऊसतोडणी कामगारांच्या व्यथा वेदना, प्रतिमा, प्रतिके, यांच्या माध्यमातून अभिव्यक्त झालेले आहे. ऊसाच्या थळातील सर्व घटना प्रसंग भावभावना कवितेमधून व्यक्त झालेल्या आहेत.

२८– 'ऊसाची कविता' कैलास दौंड यांनी ऊसतोड कामगारांच्या प्रणयभावना भविष्याच्या उज्वल कालखंडाची अशा आकांक्षा यांचा विचार केला आहे.

२९–ऊसतोडणी कामगारांच्या झोपड्यांना अनेक प्रसंगी आग लागते,उध्वस्त संसार या कवितेतून व्यक्त होतो– मानवतेचा हुंकार या कविता मधून व्यक्त होतो.

३०–ऊसाच्या कविता मधून मनत्याचे चिंतनात्मक विचार येतात, समाजजीवन त्याचे 'उचल' कुटुंबाजीवन या कवितेचा भाग झालेले आहे.

३१– ऊसतोडणी कामगारांच्या मुलांच्या व्यथा शिक्षण, वंचित अनुभव, त्यांच्या व्यथा शब्दाच्या माध्यमातून व्यक्त होतात. रायभान दवंगे यांच्या 'तांडा' मधून गावसोडण्यापासून कारखाना पर्यंत अनुभवांचे कथनात्मक काव्य येते. गाव हे साखर कारखाना या प्रवासातील भावनाविष्कार काव्याहून येतो

३३) ऊसतोड कामगारांचे दिव्य स्वप्न तांड्यामधून अभिव्यक्त होतात, तसेच त्यांचे भावबंधन त्यातून

अभिव्यक्त होतात.

३४)मुकादमाच्या नजरेने स्त्रियांवर काय परिणाम होतात. त्याची बघण्याची दृष्टी या कवितेमधून व्यक्त होते.

३५) ऊसतोडणीचे काम केलं परंतु उचल फिटत नाही रित्या हाताने पतरणारे तांडे याकाव्यातून अभिव्यक्त होतात. समर्थ्यपणाने या लोकांचे कुटुंबजीवन समाजीवन कवितेतून अभिव्यक्त होते.

३६)'उचल कोयता तोडीला' मधून सय्यद अलाउद्दीन यांनी ऊसतोडणी कामगारांच्या शेतकरी कर्जबजारी जीवन,निसर्गावर अवलंबून असणारा शेतकरी, त्यांची शेती, माती, तिची ओढ कवितेमधून व्यक्त केली आहे.

३७)शाळा बाह्य मुलांचा प्रश्न त्यांचे शिक्षण केवळ, ऊसतोडणी मुळे होत नाही ही समस्या कवितेमधून व्यक्त होते.अंधश्रद्धाळू समाज , त्यांच्या मुलांचे आरोग्याचे प्रश्न, त्यात होणारे करूण अंत यांचे चित्रण या कवितेमधून अभिव्यक्त होतात.

३८) खेड्यातील उध्वस्त खेडे, रिकामे गांव लाहानमुले,म्हातारी माणसे , रिकामी मने याचे चित्रण या कवितामधून येते पशुपक्षी प्राणी यांचे चिंतन कवितेतून येते.

३९) कवितामधून ऊसतोड कामगारांच्या हृदयविदारक जीवन शेतीमातीवरची कविता मजूरांची बिकट परिस्थिती ऊसतोड मजूरांची व्यथा, प्रखर, वास्तव, विद्रोही लोकजीवन या कवितामधून व्यक्त होते.

४०) ऊसतोड कामगारांची उदास भावना अस्वस्थ समाजजीवनाची,अनुभूती या कवितेतून अभिव्यक्त झालेली आहे. ऊसतोड कामगार समाजजीवन कुटुंबजीवन या कवितेमधून अभिव्यक्त झालेले आहे.

४१)ऊसतोड कामगारांच्या सर्वच साहित्य प्रकारामधून स्त्री अभिव्यक्त झालेली आहे. तिच्या शोषणाची कहाणी या साहित्या तून येते तिच्या घरात पती नातेवाईक तिचे विविध अंगाने शोषण करतात. मुकादम बागायतदार लैंगिक अभिलाषा असणारे या सर्वांच्या नजरा स्त्रियाकडे केवळ भोगाचा दृष्टीने बघतात. स्त्रियांना फूस लावणे ड्रायव्हार पासून सर्वच त्यांची फसवणूक करतात याचे दर्शन साहित्यतून घडते.

४२) सरदार जाधव यांच्या कोयता तील स्त्री सतत नवऱ्याला साथ देणारी आहे. कथानकातील स्त्री, मुळ होत नाही म्हणून नवऱ्याचा मार खाते नवरा छळतो मारतो बाळासाहेब गर्कळ च्या 'उचल' कादंबरीतील कजरा नवऱ्याच्या बाहेर ख्यालीमुळे तिचा छळ आणि अंत होतो. स्त्रियांच्या छळ त्यांनी अभिव्यक्त केले

गेले आहे.

४३) शांता जोशी यांच्या गव्हाणी मधून स्त्री प्रश्न ची चर्चा झालेली आहे. धर्यवान सामर्थ्य संपन्न स्त्री, शिक्षणाची ओढ असणारी, मुलींना शिक्षण व समान वागणूक मिळाली पाहिजे अशा ध्येय धोरणाने स्त्रियाच्या विविध प्रश्नांना वाचा फोडणारे लेखन या कादंबरीतून झालेले अहे. मुकादम, नवरा यांच्या कडून सातत्याने स्त्री, असल्यामुळे मुलगी असल्यामुळे कमीपणा सातत्याने दिसतो.

४४) स्त्रियांच्या भ्रणहत्या, गर्भपात, मुल न होण्यामुळे छळ, मुलगाच हवाय यामुळे, होणारा छळ, त्यांच्या आरोग्याचे प्रश्नाना या लेखनातून वाव मिळाला आहे. सतत गर्भपाताची घटना घडणे, मुलं मरणपावणे या घटना सातत्याने घडतात.

४७) ऊसतोड कामगारांच्या साहित्यातील स्त्रियांना अंधश्रद्धाचे बळी ठरलेल्या आहेत. त्यांना सतत् फिरतीवर राहवे लागत असल्यामुळे भूत,लागणे, देवाचा कोप होणे, अशा घटना या साहित्यातून येतात.

४८) योगीराज बागूल यांच्या पाचट मधून दलित जाणीव भूक, उपासमार, दुष्काळ, कर्जबाजारी पणा शिक्षणाचे धडपड घेऊन मार्गक्रमण करणारे कुटुंब आहेत.

४९)१९७२ च्या दुष्काळाने शेतकरी अल्पभूधारक कोरडवाहू शेतकरी, गावकीचे कामे नाकारणारे दलिती या सर्वांनी या ऊसतोडणी कामगाराचा स्विकार केला आहे त्यामुळे मुकादमाच्या सांगण्यावरून असे ऊसतोडणी कामगारांची निर्मिती झालेली आहे.

५०) मुकादम,बागायतदार, ड्रायव्हर यांच्या सारख्याकडून स्त्रियांना फूस लावली जाते. त्याहून स्त्रियांना वाईट कर्म करावे लागते परंतु कोणाच्याही, भूलथापाना या स्त्रिया बळी पडतात. संसारात साथदेवून संसार करणाऱ्या स्त्रिया साहित्यात दिसतात.

५१) तरूणी, आणि स्त्रियांकडे,वाईट वळणाऱ्या आसाव्यात म्हणून लैंगिक भावनेने बोलणारे बघणारे बोलणाराचे प्रमाण समाजात आहे. स्त्री चरित्र्याचे चित्रण मी वाङमय प्रकारातून येते.

५२)समकालीन मराठी साहित्या मधून, या समाजाच्या नवा कामगार वर्ग म्हणून त्याचे प्रश्न समस्या, दु:ख, दुस्काळीतल शेतकरी समकालीन समाज जीवन येते या साहित्यातून येते, ऊसतोड कामगारांचे प्रश्न याची चर्चा या साहित्यातून घडते.

५३)समकालीन राजकारणात ऊसतोड कामगारांची होणारी फसवणूक त्यांच्या फायदा, तांटा याचा विचार

न करता त्यांचे नेत्रत्व करणारे नेते, त्याचा विचार न करता, राजकारणाचा व स्वत:चा फायद्याचा विचार करून निर्णये घेतात. ऊसतोडणी कामगारांच्या पैशावर प्रश्नावर राजकारण करणारे भरपूर आहेत.

५४)ऊसतोडणी कामगारांच्या नेत्यामध्ये समकालीन समाजसेवक यांचे योगदान असून विविध वर्तमान पत्र व नियतकालीकातून या प्रश्नाचा संदर्भाने ऊसतोडणीला प्रारंभ काळात आंदोलने ,संप,होतात. यांच `चिंतन प्रश्नाच्या माध्यमातून येते.

५५)समकालीन मराठी साहित्यातील वाङमयीन प्रवाहातील स्त्रियांच्या जीवन चित्रणाचे बालकांच्या शिक्षणा संबंधी, शेतकरी व शेमजूरांच्या समस्या, वेदना, प्रश्नाची चर्चा या ऊसतोडकामगारांच्या विविध वाङमय प्रकाराच्या आधारे झालेली आहे.

५६) ऊसतोड कामगारांची चवळवळ ही राजकीय लोकांच्या माध्यमातून असल्यामुळे तसेच या कामगारांची पिळवणूक करणारे मुकादम हे कामगार चळवळीचे मुख्य सुत्रधार असल्यामुळे प्रत्यक्ष कामगारांच्या प्रश्नांना बगल दिली जाते या ऊसतोड कामगारांचे नेत्रत्व निर्माण झाले पाहिजे.

५७)ऊसतोड कामगार असंघटीत आणि हंगामी स्वरूपाचा कामगार आहे. तसे या कामगारांचे मुकादमात रूपांतर होते. किंवा ते कामगार प्रत्येक वर्षी ऊसतोडणी साठी जातीलच असे सांगता येणार नाही त्यामुळे त्यांच्यात संघटन होणे गरजेचे आहे.

५८) ऊसतोड कामगारांच्या आंदोलनातून प्रेरणा घेऊन त्यांच्या प्रश्नाच्या संबंधाने साहित्य निर्मिती कलाकृती निर्माण होणे गरजेचे आहे.

५९)साखर सम्राटाच्या ताब्यात कारखशने असल्यामुळे आणि त्यांच्यातील अमदार, खासदार,असल्यामुळे कामगारांच्या संबंधाने त्यांच्या हिताचे धोरण घेतले जातात, कामगारांच्या आरोग्य, शिक्षण निवारा यांच्या संरक्षणासाठी फायदे त्यांना विमा लागू करणे या सारख्या प्रश्नावर लेखन येणे गरजेचे आहे.

सूचनात्मक निष्कर्ष :

६०) स्त्री ऊसतोड कामगारांच्या प्रश्नाकडे साकारातमक दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. कारण नवऱ्या बरोबर किंवा त्यांच्या पेक्षा जास्त काम त्यांना करावे लागते त्यामुळे त्यांचे प्रश्नाकडे आभ्यासकांनी वळावे

६१)लहानमुळे,आणि वयस्कर लोंकाच्या समस्या गंभीर असून त्यांच्या अभ्यासाकडे संशोधक अभ्यासकांचे लक्ष जाने गरजेचे आहे त्यांच्या मनात असणारी अस्थिर भावान जाणे गरजेचे आहे.

६२) भूमीहिन शेतकरी, सर्वच कुटुंबासह या कामासाठी जातात, त्यामुळे त्यांचीमुले त्यांच्याबरोबर असतात त्यांच्यात शिक्षणाचे प्रमाण खूप कमी आहे.

६३) ग्रामीण भागात स्थिर असणारा दलित, शिक्षण घेतो परंतु महानगरातील झोपडपट्टीतील कारखाना परिसरातील कामगारांची मुले शिक्षणा पासून वंचित आहेत.

६४)ऊसतोड कामगारांना मोबदल्याचे स्वरूप निश्चित नसल्यामुळे तसेच हंगाम संपल्यानंतर गावी आल्यास त्यांना रोजगार मिळत नाही किंबहूना या काळात हे लोक कर्जबाजारी होतात व्यसन करतात परिणामी कर्जबाजारी होतात या प्रश्नाकडे लक्षदेणे आवश्यक आहे.

६५) ऊसतोड कामगारांना कामगार कायदा लागू करणे, सहा महिण्याचा अर्धपगारी, नौकर समजने त्यांना निवृत्त वेतन सारखे लाभ मिळणे गरजेचे आहे अशा प्रश्नाकडे लेखन विषय होणे गरजेचे आहे.

६६) निरावा, आरोग्य ,शिक्षण कारखाना परिसरात देणे बंधन कारक करावे, स्त्रियांना संपूर्ण संरक्षणाची हमी असणे गर्भधारणेच्या काळात पूर्ण वेळवेतन स्त्रियांना मिळावी पाहिजे. लहान मुलांच्या आरोग्याचे सुविधा असणे या प्रश्नाकडे लेखन विषयाचे लक्ष जाणे गरजेचे आहे.

६७)ऊसतोडकाम गारंचे उत्पन्न जीवनावश्यक खर्चात जाते. व्यवसनावर भरपूर पैसा खर्च होतो अर्थिक प्रगती होत नाही.

६८)ऊसतोड कामगारांचा संघटना पक्षीय आहेत त्यामुळे सत्ताधारी त्यांच्याकडे लक्ष देत नहीत त्यांची योग्य बाजू मांडलीजात नसते. त्यांना कामगार कायदा लागू झाला पाहिजे.

६९) ऊसतोड कामगारांच्या साहित्यामध्ये हे कामगार ऊसबागायतदार यांच्या कडून बऱ्याच प्रसंगी पैसा मागतात त्याशिवाय ऊसतोडणी करत नाहीत. कारण बागायतदार यांना ऊसतोडणीची गरज असते. या प्रश्नाची चर्चा साहित्यातून आली पाहिजे.

७०) मुकादमाच्या उचल घेऊन काय करावे असा संकेत असतो परंतु अनेक प्रसंगी मुकादमाचा पैसा एकदाचा काम दूसऱ्याचे घेतल्यामुळे त्यांचा अडचणीस सामोरे जावे लागते

७१)ऊसतोड कामगारांनी कामाच्या बळावर कष्टाच्या बळावर कधीही हार मानलेली नही. किंबहूना कर्जबाजारी पणामुळे ते आत्महत्या करतात त्यंचा कष्टावर भरवशा असतो सतत श्रम करणे मुलांना शिकवणे जगवणे हे काम परिश्रम पूर्वक हे लोक करतात, त्यांचीमुले गावांकडे राहून शिक्षण घेतात, परिश्रमाचे त्यांचे ध्येय

आहे.

७२) ऊसतोड कामगार स्त्रियांच्या चारित्र्याची चर्चा वाङमयात त्याचे विविध लोकांशी संबंध जुळवणे गौर आहे कारण असला बाहेरख्याली पणा तयंच्या अंगी नसतो. इज्जत व परिश्रमाने पैसा कमवणे हेच गुण त्यांच्या अंगी आहेत.

७३) बागायतदारांच्या मुलीही ऊसतोड कामगार मुला बरोबर प्रेमाच्या संबंधाने निघून येऊन त्याच्याशी संसार करतांना संशोधकास आढळल्या आहेत.

७४)ऊसतोड कामगार मराठवाड्यातील औरंगाबाद,जालना,बीड अहमदनगर मधील पाथर्डी परिसर खानदेश या भागातील लोकांचा भरणाजास्त आहे.

७५) ऊसतोड कामगारांच्या साहित्यातील प्रादेशिक बीडचा परिसर जास्त प्रमाणात येतांना दिसतो.

७६)ऊसतोड कामगारांमध्ये व्यसनाचे प्रमाण जास्त आहे. कारण त्यांच्यातील कर्जबाजारीपणा कायम आहे.

७७)ऊसतोड कामगारांची मुले मुळगांवी शासकीय योजनेतील भोजन व्यवस्थेचे लाभ घेत आहेत.

७८)ऊसतोड कामगार हा श्रमावर विश्वास ठेवणारा असल्यामुळे हे कामगार आत्महत्यासारख्या प्रकाराकडे सहजपणाने जात नाहीत.

७९)ऊसतोड कामगारांच्या ते काम करतांना साखर कारखाना परिसरात त्यांच्या मुलांसाठी साखर शाळांमध्ये त्यांची मुले शिक्षण घेत आहेत.

८०)ऊसतोड कामगारांची मुले शिक्षण घेवून विविध पदावर सन्मानाने काम करत आहेत.

८१)ऊसतोड कामगारांच्या फसवणुकीला बऱ्याच वेळेस मुकादमही बळी पडतात.

८२)ऊसतोड कामगारांना विमा निवृत्त वेतन त्यांचे संरक्षण होईल अश्या प्रकारच्या योजना त्यांना लागू करणे गरजेचे आहे.

समारोप :

मराठी साहित्यातील ऊसतोड कामगार याचे मराठी साहित्यात आलेले चित्रण या अनुषंगाने विचार करतांना या लघुशोध प्रकल्पात एकूण पाच प्रकरणात विभागणी केलेली असून पहिले प्रकरण प्रस्तावना आहे या प्रकरणात समकालीन मराठी साहित्य संकल्पना १९६० नंतरचे वाङमय प्रवाह, साहित्यतील चित्रण ऊसतोड कामगार संकल्पना स्वरूप त्यांची परिस्थितीची विविध वाङमय प्रकारातील चित्रण उचलीचे स्वरूप त्यांच्या कामगार संघटना , अभ्यास विषयाची आवश्यकता संशोधन पद्धतीच्या विचार केला आहे.

प्रकरण दुसऱ्या मध्ये कथानात्मक त्यात कथा,कादंबरी, लळित लेखन आत्मकथनाचा चित्रण विषय, संघर्ष, संवाद, भाषा, समाज वास्तव,व्यक्तरेखाटने प्रमुख कलाकृतीच्या आधारे विचार केला आहे.

प्रकरण तिसरे मधुन काव्याच्या आधारे कवितेतील अशय सौंदर्य भाषा, वातावरण ,सामाजिकता संघर्ष स्वरूप उदयमापन केले आहे.

चौथे प्रकरणा मधून ऊसतोड कामगार स्त्रीचे चित्रण यात अभिव्यक्त झालेले स्त्रीचे वेदना त्यांच्या व्यथा –वेदना दु:ख यांचे आधार कथांच्या आधारे विवेचन केले आहे.

पाचवे प्रकरणातून निष्कर्ष समारोप मधून एकूण अभ्यास आलेले गद्य ,पद्द स्त्री समकालीन कामगार चळवळ निरिक्षणतून आलेले निष्कर्ष मांडले आहेत.

लावणीसाठी ठुस्या करतांना महिला

ऊसतोडणी झाल्यानंतर ऊस वाहनात भरतांना

ऊसतोड कामगार

शेतील लागवड झालेला ऊस डोलताना

शेता ऊसतोडण करतांना ऊसतोड कामगार

उस तोडणी झाल्या नंतर ऊस वाहून नेताना वाहन

ऊसतोडणी झाल्यानंतर ऊसाची मोळी बांधतांना ऊसतोड महिला कामागार व

फावल्या वेळात मासेमारी करतांना ऊसतोड कामगाराचा मुलगा

ऊतोडणी तोडणी झाल्यानंतर साळनी करतांना ऊसतोड महिला कामगार

आपल्या आईला मतदत व्हावी म्हणून वाढे गोळा करतांना मुलगा

ऊन्हाची परवा न करता आपल्या चिमुकल्याला पाठीशी बांधून ऊसाची मोळी

बांधतांना

ऊसतोडणी करतांना तोडीशी उसंत काढून आपल्या छकुल्याला न्याहाळतांना

महिला

लेकराला पोटाशी धरून ऊसाची मोळी वाहताना महिला ऊसतोड कामगार

आपल्या माय–बापाची वाट बघतांना ऊसतोड मजुरांची मुले

वरील छायाचित्रात जळालेला ऊस दिसत आहे.

संदर्भ सुची :-

१) सुरवाडे मनोहर-१९८० नंतर ची ग्रामीण कथा,बळीवंश प्रकाशन नांदेड,आ.प. १७ सप्टेंबर २०१०

२) कांबळे ऋषीकेश - वादाजिये गावा, गोदा प्रकाशन औरंगाबाद प्र.सा. जानेवारी २०१०

३) भांगे कालिदास - स्त्री उसतोड कामगार चिन्मय प्रकाशन औरंगाबाद प्र.आ. जुलै २०१२

४) हांगे आबासाहेब श्रीरंग -बीड जिल्हातील ऊसतोड कामगारांचा आर्थिक परिस्थितीचा अभ्यास पीएच. डी. प्रबंध डिसेंबर २००५

५) गोरे दादा - पुन्हा सांहित्यरूप -गोदा प्रकाशन औरंगाबाद प्र.आ २०११

६)मुलाटे वासुदेव- ग्रामीण साहित्य स्वरुप व दिशा प्रकाशन औरंगाबाद दिव्तीय आवृत्ती डिसेंबर २००८

७) कर्णिक मधु मंगेश सपा सांस्कृतीक महाराष्ट्र १९६० ते १९१० भाग १ महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई प्र.आ. २०११

८) मुलाटे वासुदेव -ग्रामीण साहित्य चिंतन आणि चर्चा -स्वरूप प्रकाशन औरंगाबाद प्र.आ. डिसेंबर २००४

९) यशवंत राजीव- ग्रामीण साहित्य चळवळ प्रेरणा व स्वरुप- प्र.आ. १९ फेब्रूवारी २०१०

१०) जाधव जयद्रत,देशमुख भरत- संपा- १९८०नंतरचे मराठी साहित्य: स्वरूप आणि समीक्षा अरूणा प्रकाशण लातूर प्र.आ. २ऑगस्ट २०१२

११) काजुंरवे रामचंद्र -ग्रामीण कादंबरी आकलन आणि विश्लेषण कैलास पब्लिकेशन औरंगाबाद प्रआ. मार्च २०१३

१२) शेलार सुधाकर -ग्रामीण साहित्य चळवळीचे सामाजिक व सांस्कृतिक योगदान स्वरूप प्रकाशन औरंगाबाद प्र.आ. ऑक्टोंबर २००९

१३)देशमुख गणेश ग्रामीण समाजजीवन व साहित्य- स्वरूप प्रकाशन औरंगाबाद प्र.आ.५ सप्टेबर २००८

१४)पाटील मोहन -ग्रामीण साहित्य आणि संस्कृती- स्वरुप प्रकाशन औरंगाबाद दु.आ. ऑगष्ट २००८

१५) मुलाटे वासुदेव साहित्य समाज आणि परिवर्तन स्वरूप प्रकाशन औरंगाबाद प्र.आ. ५ सप्टेंबर २००७

१६) कदम जगदिश- साहित्य आकालन आणि आस्वाद- संगत प्रकाशन नांदेड प्र.आ. २०१३

१७)विभूते शंकर- स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीची वाटचाल- स्वरूप प्रकाशन बुलडाणा प्र. आ. २०१०

१८) जाधव गजानन-संपा पोशींद्याची कविता पैलू प्रकाशन बूलढाणा प.आ. एप्रिल २०१०

१९) नलगे चंद्रकुमार -ग्रामीण वाङमयाचा इतिहास रिया पब्लिकेशन कोल्हापूर व्दि.आ. मार्च २०१२

२०) चंदनाशिव भास्कर अंगार माती- साकेत प्रकाशन औरंगाबाद चौथी आवृत्ती २०१२

२१)कोत्तापल्ले नागनाथ - साहित्याचा अन्वयार्थ स्वरूप प्रकाशन औरंगाबाद दु.आ. २००८

२२) मेश्राम नंदा- दलित कादंबरी स्वरूप व समिक्षा डिंपल पब्लिकेशन ठाणे आ.प. १६ डिसेंबर२०१६

२३)भोळे भास्कर लक्ष्मण.- ऐकोणिसाव्या शतकातील मराठी गद्य खंड १ साहित्य अकादमी व्द.सा. २००८

२४) जोशी तर्कतीर्थ लक्ष्मणशासी संपा राजवाडे लेख संग्रह साहित्य आकादमी पुनर्र मुद्रण २००९

२५) लुलेकर प्रल्हाद- तुपे केशव- साहित्याचे सांसकृतीक संचित कैलास पब्लिकेशण औरंगाबाद प्रा.आ. नोव्हें२००५

२६) जाधव मनोहर संपा. समीश्रेतील नव्या संकल्पना स्वरूप प्रकाशन औरंनाबाद आ.प. मार्च २००१

२७) गिमेकर परशुराम साहित्य रंग आणि रूप गोरवाणी प्रकाशन औरंगाबाद आ.प.मार्च

२८)भोळे भास्कर लक्ष्मण -एकोणिसाव्या शतकातील मराठी गंद्य-खंड -२ साहित्य अकादमी पुनर्र मुद्रण २००८

२९) नलगे चंद्रकुमार संपा. महाराष्टातील समाजिक विचार मंथन -रिया पब्लिकेशन कोल्हापूर व्दि.आ. २०१२

३०)आगरकर गो.ग. केसतीतीळ निवडकानिबंध व विविध विषय संग्रह समन्वय प्रकाशन कोल्हापूर आ. २०१२

३१) आत्रे त्रिंबक नारायण -गाव गाडा -समन्वय प्रकाशन कोल्हापूर आ. डिसेंवर २०१२

३२) वाडकर धोडीराम नाथ संप्रदायाची परंपरा: लोकसाहित्य चिन्मय प्रकाशण औरंगाबाद प्र.आ. जानेवारी २०१३

३३)मुरवंडकर प्रेमला–मराठवाडेयातील कथेतील स्री चित्रण गोरा प्रकाशन औरंगाबाद प्र.आ. डिसेंबर २०१३

३४)देशमाने अशोक –मराठी कथा रु प आणि स्वरुप चिन्मय प्रकाशन औरंगाबाद प्र.आ. एप्रिल २००८

३५)कराटे मोतीराम –समकालीन साहित्य वेध– प्रतीभास प्रकाशन परभणी– आ.प. मार्च २०१०

३६) वास्कर आनंत संपा– वाङमय प्रकार संकल्पना व स्वरुप – अन्वय प्रकाशन पुणे –सुधारीत आवृत्ती जुन २००८

३७)सोनाळकर शिवकुमार – स्त्रियांचे : कथालेखन सामाजिकता आणि मासकिता प्रज्ञा प्रकाशन सांगली प्र.आ. मार्च २०१२

३८)पाटील संजय– महादेव मोरे यांचे साहित्य, दर्जा प्रकाशन पुणे प्र.आ. २००९

३९)करपे राजाभाऊ नारायणराव –मराठवाड्यातील शेतकरी चळवळ १९४८–२००६चिन्पय प्रकाशन औरंगाबाद प.आ. जून २०१२

४०) जंबोल विठ्ठल हरिभाऊ –ग्रामीण कादंबरी : मराठवाडी बोलीचे स्वरुप चिन्मय प्रकाशन औरंगाबाद प्र.आ.२०१०

४१) शिंदे संजय संपा– नागनाथ कोतापल्ले व्यक्ती आणि वाङमय ि चन्पय प्रकाशन औरंगाबाद प.आ. २०१०

४२) पुळावले सुभाष –मराठी कथा परंपरा आणि स्वरुप विशेष –चिन्मय प्रकाशन औरंगाबाद प्र.आ. २०१०

४३) जाधव रमेश ग्रामीण कथा वास्तव आणि रंजकता गौरवली प्रकाशन औरंगाबाद प्र.आ. मार्च २०१०

४४) सरफटे सदाशिव १९८० नंतरची स्त्रीवादी कविता चिन्मय प्रकाशण औरंगाबाद प्र.आ. २०११

४५) जाधव जयद्रत संपा.–जागतिकीकरण मराठी भाषा आव्हाणे आणी उपाय– चिन्मय प्रकाशण

औरंगाबाद प्र.आ. २०११

४६) लुळेकर प्रल्हाद पंचधाराचा प्रदेश. चिन्मय प्रकाशण औरंगाबाद प्र. आ. १७ सप्टेंबर २००४

४७)चिकाळा : दलित ग्रामीण साहित्याचे सीमोलंन संपा. प्रा. डॉ. अशोक घोळवे वावार प्रकाशण लातूर प.आ. २३ ऑगस्ट २००८

४८) निळू दामले : उस्मानाबादची साखर आणि जगाची बाजारपेठ – मौज प्रकाशण मुंबई द्वि–आ. जानेवारी २०१०

नियतकालीके/ दिवाळी अंक / विशेषांक

१) प्रतिष्ठाण –संपा.श्रीधर नांदेडकर मराठवाडा साहित्य विशेषांक औरंगाबाद मार्च एप्रिल मे जून २००८

२) प्रणाली –संपा.नलिनी हनुमंत रणखांब रौम्य महोत्सव विशेषांक जुलै२०११

३)जनसंवाद –संपा–नळिनी हनुमंत रणवाव दिवाळी विशेषांक लातूर नोहेबर २००४

४)सत्याग्रही विचारधारा–संपा. कुमार सप्तर्षी पुणे. डिसेंबर २००३

५)गोपिका संपा. के.टी.तांदळे धनोरा रोड बीड– वार्षीक दिवाळी अंक २००२

६) सत्याग्रही विचारधारा कविता विशेषांक संपा. डॉ कुमार सप्तर्षी जून २००१

७)गोरवाणी संपादक डॉ रमेश जाधव जुलै ते सप्टेंबर२०१३ ऑक्टोंबर डिसेंबर २०१३

८)गोरवाणी संपादक डॉ रमेश जाधव ऑक्टोंबर ते डिसेंबर २०१३

९)दैनिके : झुंजार नेता, ६ ऑक्टोंबर २०११

१०) दैनिक लोकमत – १ नोव्हेंबार २०१३

११)दैनिक दिव्य मराठी २७ ऑक्टोंबर २०१३

१२)दैनिक दिव्य मराठी २८ ऑक्टोंबर २०१३

१३)दैनिक आपला बळिराजा २ ऑक्टोंबर १३

आधार ग्रंथ

१)पाणकणसं – भास्कर बडे , साहित्य सेवा प्रकाशन औरंगाबाद प्र.आ. १९९०

२)कोयता – सरदार जाधव –जनशक्ती वाचक चळवळ औरंगाबाद द्वितीय आवृत्ती १५ आगॅस्ट२००८

३)हिरवा डोंगर – दिनकर जायभाये – सुमेरू प्रकाशन डोंबीवली प्र.आ. डिसेंबर २०००

४)गव्हाणी – सौ. शांता जोशी स्वरूप प्रकाशन –औरंगाबाद प्र.आ.जून २००२

५)पाणधुई – कैलास रा.दौंड – शांदी पब्लिकेशन्स पुणे, प्र.आ. २००४

६)प्रहार – रायभान दवंगे – सुदिन ग्रंथ प्रकाशन पुणे, प्र.आ. ऑक्टोंबर २००४

७)धुराळा – योगीराज वाघमारे हर्ष प्रकाशन सोलापूर–प्र.आ. २००५

८)उचल – बाळासाहेब गर्कळ – कैलास पब्लिकेशन्स,औरंगाबाद प्र.आ. मार्च २०१०

९)अंजीमाय (बालकादंबरी) भास्कर बडे– वावर प्रकाशन लातूर , तिसरी आ. २०११

१०)शिदोरी – व.ह.पिटके, मौज प्रकाशन प.आ. १९६९

११) मागे फिरा पतगां नो डॉ. नारायणराव मुंढे सत्संग प्रकाशन गेवराई, प्र.आ. नोव्हे २००१

१२)पाचट – योगीराज बागूल– ग्रंथाली प्रकाशन मुंबई, दुसरी आवृत्ती जुलै २००४

१३)चिकाळा – भास्कर बडे (कथा संग्रह) वावर प्रकाशन लातूर प्र.आ. जून २००६

१४)तिवढा –विठ्ठल जाधव – (कथासंग्रह) रजत प्रकाशन औरंगाबाद प्र.आ. डिसेंबर २००८

१५)उसाच्या कविता (कवितासंग्रह) कैलास –रा .दौंड

नीळकंठ प्रकाशन पुणे, प.आ. २००९

१६)तांडा (कवितासंग्रह)प्रा.रामभान दवंगे , स्वरूप प्रकाशन,आरंगाबाद–प्र.आ. १५ ऑगस्ट २००५

१७)उचल कोयता तोडीला (काव्यसंग्रह) सय्यद अलाउद्दीन,दिजान प्रकाशन आष्टी– प्र. आ. फेब्रु.२०१४

१८) बळी– एकबाल पेन्टर – प्रकाशन प्रा.मोतीराम राठोड, प्र.आ. १ मे २००६

१९)वावर भास्कर बडे–कवितासंग्रह वावर प्रकाशन लातूर प्र.आ.१९८६

कोयता

भर दुपार
उसांवर कोयत्याचे सपासप वार
ती ओली बाळंतीण
दोनच महिन्यांच्या लेकराची
काजळ नसलेल्या डोळ्यांची
शेवरीला बांधलेल्या धडप्याचा झोळा
आणि त्यात वळवळता एक
मांसाचा लालभडक गोळा
लुकलुकत्या डोळ्यांननी कुठलं भविष्य बघत
असेल या देशात..
कोयत्याच्या प्रत्येक घावाबरोबर
पाझरणारी तिची रतनं
आणि घामाच्या थेंबाथेंबातून झरणारी
शतकानुशकतताची पिळवणूक
त्या बाईने करावी कशी तिच्या आईपणाची जपणूक
उन्हातान्हात रापलेलं तिचं बाईपण
आणि ऊसचरख्यात पिळवटून गेलेलं आईपण
पोटाला कशाचीच पर्वा नसते
उसाच्या फडात नसतात बाळंतपणाची पथ्य
लेकरासाठी अंगाई किंवा बोबडे बोल
बऱ्याचदा ही लेकरं सरीतचं जन्म घेतात
आणि सहकाराच्या नावानं
पहिलंवाहिलं भोकाड पसरतात..
सहकाराच्याही कानावर पडतं कधी कधी
या लेकराचं भोकाड पसरणं
पण सहकार धूर्तपणानं
आपली बधिर बोटं कानात घालतं
मनातल्या मनात आनंदित होतं
एक नवा 'कोयता' जन्माला आला म्हणून

साभार...दिव्य मराठी